

# ऋतुगंध शरद

दिवाळी अंक | वर्ष ८ अंक ४

महाराष्ट्र मंडळ
सिंगापूरचे
साहित्यिक वार्तापत्र

# अनुक्रमणिका

२··· संपादकीय ... मुक्ता पाठक शर्मा

४··· ऋतुगंध समिती

५··· ममंसि वार्ता ... मंजिरी कदम

**कथा**

८··· तळयात मळयात··· वृंदा टिळक

**प्रतिमा आणि प्रतिभा**

२०... सिंधुताई सपकाळ... मुलाखत आणि शब्दांकन : मुक्ता पाठक शर्मा

**लेख**

१३··· इंद्रधनुषी दिवाळी··· शिल्पा केळकर उपाध्ये
१६... जिप्सी ... प्राजक्ता नरवणे

२७··· केल्याने देशाटन ... संध्या नरगुंद

३२··· माझा गाव, माझा देश, माझे विश्व ... प्रकाश मोराणकर

३७··· दंत यात्रा - पूर्वांचलची··· डॉ. प्रतिभा आठवले

४२··· माझं गाव, माझं देश, माझं विश्व ... मेघना असेरकर

४८··· पेपर क्विलिंग ... कल्याणी शाळिग्राम

५०··· प्राचीन भारतीय संस्कृतीची जगाव्याप्ती ... निरंजन भाटे

५५··· माती आपली आपली ... अरुण मनोहर

**कविता**

१९··· माती एक संकल्पना ... माधव भावे

३५··· काठावरची कविता ... कौस्तुभ पटवर्धन

४६··· माती ... सुगम काळे

५३··· मातीची परिक्रमा ... अजय मोकाशी

**बालजगत**

६१··· खादाड खाऊ जावई ... माधव देशिंगकर
६५... चित्रसंगती ... वर्धिनी पेंढारकर
...................... रिद्धिमा पाटील
..................... पालवी तडवळकर

६६··· माझे पहिले सुवर्णपदक ... वैदेह साठे

**खवय्येगिरी**

६९... बेबी कॉर्न कबाब ... मृणाल मोडक
**७०...स्पेनिश भात ... मृणाल मोडक**

७१··· खव्याच्या पोळया ... श्यामल भाटे
७२... ब्रोकोली पराठे ... मेघना असेरकर
७३... आलु टिकिया... मेघना असेरकर

**तिमिरातूनी तेजाकडे**

७४... महाभागवत पुराण... श्रीकांत जोशी

**दीर्घ कथा**

८४... विषाणू ... अरुण मनोहर

**प्रतिबिंब**

९४... अतुल तेमुर्णिकर ... शब्दांकन: निरंजन नगरकर

९७... राशी भविष्य

# संपादकीय



**मुक्ता पाठक शर्मा**
**ऋतुगंध संपादक**

नमस्कार !

दिवाळीच्या शुभेच्छा!!!

दीपावलीच्या दिव्यांची आभा आणि शरदाच्या चांदण्याचा चांदवा हे नुसते एका गावाला वा एका देशाला नव्हे तर साऱ्या विश्वाला तेजात न्हाऊ घालतात. म्हणुनच आपल्या अनुभवांच्या, जगण्याच्या रुंदावत जाणाऱ्या कक्षांना शब्दात व्यक्त करण्यासाठी ऋतुगंध "माझे गाव, माझा देश आणि माझे विश्व" ही संकल्पना सादर करीत आहे.

एखाद्या ठिकाणी कायमस्वरुपी आपल्या आवडीच्या विश्वाला बरोबर घेऊन स्थायिक होतांना वा एखाद्या ठिकाणी काहीही ध्येय नसताना, वेळ कसा घालवावा या विचारात जीवन जगतांना वा स्थानान्तराचा इशारा मिळताच रमलेले आयुष्य अचानक कलाटणी घेते. अशा वेगवेगळ्या मनोविकल्पातून "तळ्यात मळ्यात" होणाऱ्या अवस्थेचा अचूक वेध वृंदा टिळक आपल्या कथेत घेतात.

संकल्पनेला धरून असलेल्या लेखांत आपल्याला खूप विविधता वाचायला आणि अनुभवायला मिळेल. अनिवासी भारतीयाची जगाच्या पाठीवर दिवाळी साजारी करण्याचा अनुभव "इंद्रधनुषी दिवाळी " मध्ये शिल्पा केळकर उपाध्ये मांडतात. तर स्थलांतरीत होणाऱ्या पक्षांसारखे "जिप्सी" आयुष्य प्राजक्ता नरवणे आपल्या लेखात व्यक्त करतात. मनात

दाटलेल्या भीतीच्या सीमारेषा, खऱ्या सीमा पार केल्यावर पुसल्या जातात हे वास्तव "केल्याने देशाटन" मध्ये संध्या नरगुंद सुंदररीत्या मांडतात. या व्यतिरिक्त निरंजन भाटे "भारतीय संस्कृतीची जगव्याप्ती" या लेख मालिकेत अफाट अशा भारतीय संस्कृतीचा आढावा घेत आहेत. आपल्याच देशाच्या एका कोपऱ्यात अनेक सुविधांपासून वंचित असणार्या पूर्वांचल भागात सातत्याने दंत सेवा देणाऱ्या डॉ. प्रतिभा आठवले "दंत यात्रा पूर्वांचलची" आपल्या वेचक अनुभवांद्वारे घडवून आणतात.

रुजण्यासाठी आणि घट्ट मुळ रोवण्यासाठी माती लागतेच. त्या मातीची विविध रूपे माधव भावे, कौस्तुभ पटवर्धन , सुगम काळे आणि अजय मोकाशी आपल्या काव्यातून व्यक्त करतात.

"स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" वा "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसि" ह्याची वेदना ज्याना आईचे सुख लाभले नाही अशांनाच कळते. अशा अनेक अनाथांची यशोदा झालेल्या सिंधुताई सपकाळ यांची मुलाखत "प्रतिमा आणि प्रतिभा" मध्ये आपण वाचाल.

लहानग्या वर्धिनी, रिद्धिमा आणि पालवी आपल्या चित्रजगतात आपल्याला रंगवून टाकणार आहेत तर वैदेह त्याला मिळालेल्या पहिल्या सुवर्णपदकाचा अनुभव सांगत आहे. देशिंगकर आजोबा "खादाड जावई" ही हसवून टाकणारी बालकथा खास आपल्या छोट्या दोस्तांसाठी घेऊन आले आहेत.

खाण्याची आवड असलेल्यांसाठी खास "खवय्येगिरी" मध्ये मृणाल मोडक, श्यामल भाटे आणि मेघना असेरकर वेगवेगळया पाककृती घेऊन आल्या आहेत.

वेगळ्या जगाचा प्रवास अरुण मनोहर घडवून आणणार आहेत "विषाणू" या दीर्घ कथेत!

भागवतपुराण निर्मिती मागच्या हेतूची "तिमिरातूनी तेजाकडे" मध्ये श्रीकांत जोशी काका उकल करून दाखवणार आहेत.

"प्रतिबिंब" या सदरात अतुल तेमुर्णिकर यांची मुलाखत आपण वाचाल.

भविष्यात काय आहे? त्यासाठी आगामी वर्षाचे राशी भविष्य वाचा!!

हा अंक आपल्याला नक्कीच आवडेल!

धन्यवाद !

मुक्ता पाठक शर्मा
ऋतुगंध संपादक

# ऋतुगंध समिती



**मुक्ता पाठक शर्मा: ऋतुगंध संपादक**









नितीन मोरे | हेमांगी वेलणकर | निरंजन नगरकर | मृदुला सोमण | राहूल नेरकर | अंजली लोटके | अजित मुंगरे

(ममंसि कार्यकारिणी सदस्य)



मुखपृष्ठ चित्रकार- प्राची वर्तक

पेज टेम्प्लेट : अजित मुंगरे
ऋतुगंध अंक सजावट आणि पानांची रचना - मुक्ता शर्मा

अंकामधील चित्रे महाअन्तरजालावरून घेतली आहेत. मुलाखती मधील विचार तसेच अंकामधील लेख यांच्याशी समिती सहमत असेलच असे नाही.

# ममं वार्ता

मंजिरी कदम

नमस्कार,

गेल्या दोन महिन्यांतील मंडळाच्या कार्यक्रमांचा हा गोषवारा.

कला महोत्सव २०१४ - १३ व १४ सप्टेंबर, सिंगापूर चायनीज गर्ल्स स्कुलचे सभागृह व सोटा (S O T A) चे नाट्यगृह

सिंगापूरमध्ये हल्ली पावलागणिक मराठी बांधव जरी आपणाला भेटत असले तरी १९९४ मध्ये, म्हणजे २० वर्षांपूर्वी मात्र चित्र नक्कीच वेगळं होतं. त्यावेळी अवघ्या ४० उत्साही मंडळींनी एकत्र येउन महाराष्ट्र मंडळ (सिंगापूर) ची स्थापना आणि सुरुवात केली. आज २०१४ मध्ये या रोपट्याचा महावृक्ष झालाय हे आपण पहातच आहात.

आपली माणसं, आपला देश सोडून नोकरीच्या, शिक्षणाच्या निमित्ताने आपण परदेशात येतो तेव्हा काही अडी-अडचणीला, दुखल्या-खुपल्याला मन मोकळं करावंसं वाटतं ते आपल्याला समजून घेणाऱ्या मराठी मित्र-मैत्रिणीजवळच! आणि गुढी पाडवा, गणेशोत्सव, दसरा-दिवाळी हे आपले सण तर अक्षरशः एकत्र साजरा केल्यावरच सण वाटतात, खरं न?

अशा लोकांना भेटण्याचं उत्तम ठिकाण म्हणजे महाराष्ट्र मंडळ, हे ओघाने आलंच. तर अशी ही मैत्रीची, लोभाची, सौहार्दपूर्ण २० वर्षे साजरी करण्यासाठी १३ व १४ सप्टेंबर २०१४ रोजी महाराष्ट्र मंडळाने कला महोत्सवाचे आयोजन केले होते. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवामध्ये एक संगीताची मैफिल, दोन नाटकं, दिवाळी बाजार आणि चित्रांचे कला प्रदर्शन असा भरगच्च कार्यक्रम होता.




नमूद करण्यास आनंद वाटतो की वीस वर्षांच्या या यशस्वी वाटचालीचा आनंद, सिंगापुरातील भारतीय राजदूत श्रीमती विजय ठाकूर सिंह यांच्या उद्घाटनासाठीच्या उपस्थितीने नक्कीच द्विगुणीत झाला.



तसेच, डॉ उमा राजन, भारतीय उप राजदूत श्रीमती परमिता त्रिपाठी, श्री प्रमोद गोपालन यांचीही उपस्थिती कला महोत्सवाला लाभली.

भैरव ते भैरवी हा पंडित विजय कोपरकर, दत्तप्रसाद रानडे अशा नामांकित गायकांचा सहभाग असलेला, शास्त्रीय रागांवर आधारित उपशास्त्रीय गाण्यांच्या कार्यक्रमाने महोत्सवाला सुरुवात झाली. विविध रागांचं स्वरूप सहजरीत्या मांडून त्यांवर आधारित चित्रपट संगीत व गझला सादर झाल्याने कार्यक्रम रसिक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आणि पुन्हा एकदा हा कार्यक्रम मंडळात व्हायला हवा अशा अनेक प्रतिक्रियाही मिळाल्या.





'तरुण तुर्क म्हातारे अर्क' हे अतिशय लोकप्रिय, खट्याळ आणि प्रेक्षकांना खो खो हसायला लावणारं नाटक सादर करण्यात आलं. विशेष नमूद करण्याचा मुद्दा हा की हे नाटक पूर्णपणे स्थानिक कलावंतांनी बसवलेलं होतं. महाराष्ट्र मंडळाच्या वार्षिक नाटकांच्या उज्ज्वल परंपरेला साजेसंच हेही नाटक अतिशय नेटकं झालं. दिग्दर्शक होते श्री भानुदास दुसाने आणि श्री अमित जोशी.



सुप्रसिद्ध कलाकार मोहन जोशी व माधवी गोगटे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'थोडंस्सं लॉजिक थोडंसं मॅजिक' या व्यावसायिक नाटकाने कला महोत्सवाची सांगता झाली. नावावरून हलकं फुलकं वाटणारं हे नाटक, generation gap, या अतिशय भावस्पर्शी विषयाला हात घालणारं होतं आणि कसलेल्या कलाकारांच्या अभिनयामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आल्यावाचून राहिलं नाही!



कला महोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे १३ तारखेला गाण्यांचा कार्यक्रम व नाटकाच्या मधल्या वेळात कला प्रदर्शन भरविण्यात आलं ज्यात स्थानिक कलावंतांची चित्रं प्रदर्शित करण्यात आली होती.



त्याचप्रमाणे, सणासुदीचे दिवस असल्याने एक दिवाळी बाजारही आयोजित केला गेला. यात प्रामुख्याने लघु उद्योजकांची व सभासदांची



उत्पादने, उदा. शोभेचे दागिने, गृह सजावटीच्या वस्तू त्याचप्रमाणे साड्या, व इतर उत्पादने प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध होती. या बाजाराला उत्तम प्रतिसाद लाभला.

कला महोत्सवासाठी साधारण ६०० ते ७०० प्रेक्षकांनी हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

<u>नवरात्रोत्सव</u> - २९ सप्टेंबर २०१४, वडपथिरा कलिअम्मन मंदिर येथे साजरा होणाऱ्या नवरात्रोत्सवात नृत्य व भक्तीसंगीत सादर



करण्यासाठी महाराष्ट्र मंडळाला आमंत्रण देण्यात आले.

<u>दिवाळी प्रभात २०१४</u> - सिंगापूर पॉलीटेक्निकचे सभागृह
वाद्यवृंद - महाराष्ट्राचा सांगीतिक प्रवास

आजमितीला सिंगापूरात साधारण २ ते ३ हजार मराठी कुटुंबं आहेत, त्यामुळे सहाजिकच मराठी संगीताची अवीट गोडी जाणणारे श्रोते आणि गाता गळा असलेले संगीताचे चाहते इथे खूप आहेत.




अशा आपल्या सभासद मित्र मैत्रिणींनी खूप मेहनत घेऊन बसवलेला आणि नरक चतुर्दशीच्या मंगल प्रभाती सादर झालेला उत्तम दर्जाचा 'सांगीतिक प्रवास' रसिक प्रेक्षकांची मने जिंकून गेला. १०-११ वादक व १८-२० गायकांचा हा ताफा जवळ जवळ तीन महिने नेटाने तालमी घेत होता.




संगीत संयोजक होते सीमा ओवळेकर व राहुल पारसनीस. कार्यक्रमाची संहिता लिहिली संतोष अंबिके यांनी व निवेदक होते वरुण अंबिके व नंदिनी नागपूरकर. कार्यक्रमाची संकल्पना अर्थात महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणीची.

दिवाळीच्या सकाळी ९ वाजता सुरु झालेल्या या कार्यक्रमाला व त्यानंतरच्या सहभोजनाला ३०० च्या वर प्रेक्षकांनी उपस्थिती लावली आणि महाराष्ट्रीय संगीताची जादू आजही किती परिणामकारक आहे हे सिद्ध केलं.

# तळ्यात ... मळ्यात ...



वृंदा टिळक

**ब**चत गटातल्या बायका मीटिंग संपवून घरी जात होत्या. थोडा वेळ त्यांच्याशी ख्यालीखुशालीचे बोलून झाल्यावर नीरजा पुढे चालू लागली. ऑफिस ते घर, चालत जायला अवघी दहा मिनिटं लागतील एवढेच अंतर. पण ते पार करायला, वाटेत भेटणाऱ्या लोकांशी चार शब्द बोलत येत, नीरजाला अर्धा तास तरी लागायचा. त्या लहान गावात सगळेच एकमेकांना ओळखणारे, एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी असणारे. नीरजावहिनी, नीरजाताई, नीरजा मावशी, काकू, आत्या, नीरजा, नीरु... किती नावांनी तिला बोलावणारे आणि तिच्याशी जोडले गेलेले हे सगळे लोक तिचे आप्तच बनले होते. सतत ‘नीरजा’ नाव ऐकताना तिला अधूनमधून आपल्या आजीची आठवण यायची. आजीच्या ‘नीरा’ ह्या नावाची आठवण म्हणून तर तिचे नाव नीरजा ठेवले गेले होते ना!


नीरजाच्या आजीचे, 'नीरा'चे, सगळे विश्व म्हणजे तिचे घरच होते. एकत्र कुटुंबात ३५/४० माणसे. सगळे काम करताकरता दिवस उगवला कधी आणि मावळला कधी हे देखील कळत नसे. बायकांनी घराबाहेर पडायची पध्दत नव्हतीच. लग्नानंतर सुरुवातीची काही वर्षे सोडली तर माहेरी जाण्याचीही संधी क्वचितच मिळायची. वयाच्या आठव्या वर्षी नीराचे लग्न झाले. मात्र त्या आधी तिच्या भावाने तिला लिहायला वाचायला शिकवले होते. सासरी आल्यावरही जमेल तेव्हा, जमेल त्या

मार्गाने लिहिण्याचा सराव तिने चालू ठेवला. एवढेच नव्हे तर आपल्या तिन्ही जावांना आणि नणंदेला वाचायला शिकवले. त्या सगळ्याच रोजची पोथी असेल किंवा क्वचित मिळणारे वर्तमानपत्र असेल, वाचू शकत होत्या. त्या काळात हे फारच कौतुकास्पद होते.

घराजवळ गर्दी दिसली आणि नीरजा आजीच्या आठवणीतून जागी झाली. तिच्या लक्षात आले - आज मंगळवार, म्हणजे मोहनचा 'प्रदिप्ता'चा दिवस. 'प्रदिप्ता' ह्या संस्थेच्या माध्यमातून शेणापासून इंधन आणि त्यावर स्वैपाकाच्या चुली, सोलर ऊर्जेपासून दिवे आणि पंखे, तसेच गरम पाण्याचे नळ घरोघरी लागले होते. वीज फक्त कॉम्प्यूटर्स आणि टी.व्ही. साठीच वापरली जात होती. ती वीजदेखील आसपासच्या तालुक्यांचे मिळून एक जलविद्युत केंद्र उभारून निर्माण करायची आणि सगळा परिसर स्वयंपूर्ण करायचा असे नीरजा आणि मोहनचे स्वप्न होते. कोणतीही गोष्ट एका ठिकाणी तयार करून ती लांबपर्यंत वाहून नेण्याचा खर्च कमी झाला की आपोआपच ती स्वस्त होईल असा त्यांचा विचार होता. एकूणच भाज्या, धान्य, उद्योग, कपडे सगळ्याच बाबतीत जर का प्रत्येकाने शक्य तेवढा स्थानिक माल विकत घेतला तर अनावश्यक खर्च व त्यामुळे वाढणाऱ्या किंमती कमी होतील व जीवनमान सुधारेल ह्या ठाम विचारसरणीवर त्यांनी आपल्या आयुष्याचा मार्ग बेतला होता.







मागे ठेवायची ती फक्त सत्कृत्ये, कार्बन फुटप्रिंट्स नाहीत असे मोहन नेहमी म्हणायचा.

माणसे जोडण्याची, टिकवण्याची शैली आणि व्यवस्थापनकौशल्य या दोन्हीचा पुरेपूर उपयोग करत ती दोघे गावात कल्याणकारी कामे उभी करत होती.

फेसबुकवरील त्यांच्या वर्गातल्या मित्र-मैत्रिणींच्या ग्रुपला ह्या दोघांचे फार नवल वाटायचे. आपापल्या विषयातले सुवर्णपदक विजेते असून, जगभरातल्या अनेक संस्थांच्या भरपूर मान आणि पैसे देणाऱ्या ऑफर्स नाकारून ह्या दोघांनी एका लहान गावात आपले आयुष्य घालवायचा निर्णय कसा आणि का घेतला असेल आणि मुख्य म्हणजे आता ह्या निर्णयाचा त्यांना पश्चाताप होत असेल का ह्या विषयी त्या साऱ्यांनाच कुतूहल वाटत होते.

नीरजा आणि मोहनने मात्र वेगळ्या आयुष्याचा कधी विचारच केला नव्हता....

----------------------------------------

आपल्या न्यूयॉर्क मधील घरात रानी बसली होती. डोळे कॉम्प्यूटरच्या स्क्रीनवर होते पण कान मात्र रोबो vacuum cleaner शेजारच्या खोलीत कशाला आपटत नाहीये ह्याकडे लागले होते. परवापासून त्याच्या image mapping system मध्ये काहीतरी गोंधळ झाला होता.

तितक्यात Google Hangout ची रिंग वाजली.

"आईचा video call आलेला दिसतोय. आईला विडियो call करायला फार आवडते." आईला तसे म्हणताच आई म्हणाली, "हो ग, स्क्रीनवर तू प्रत्यक्ष दिसलीस आणि तुझा आवाज ऐकला की समाधान होते बघ. तुम्ही मुले लांब जाता, आपले नवे विश्व वसवता. आईसाठी मात्र आजुबाजूला कितीही गोष्टी बदलोत, तिची मुलेच तिच्या विश्वाचा अविभाज्य भाग राहतात." नातेवाईक, आईचे लिखाण, तिचा ज्येष्ठ नागरिक संघ, योगा क्लास, भजनी मंडळ, भाजीवाल्यांसाठी तिने सुरु केलेले साक्षरता वर्ग, आईच्या जगात नित्य नव्या घडामोडी घडत असायच्या. एवढ्या सगळ्याविषयी आईशी बोलून झाल्यानंतर रानीला रोजच्यासारखेच नवल वाटले. जगण्याचा किती उत्साह आहे हिच्याकडे आणि जगण्याजोगी कारणेही! आपल्याला तर आत्ताच कंटाळा यायला लागलाय.

" मकरंदच्या फोनची पण वेळ झालीच आहे. अरे, आज आपल्या मनात त्याचे मकरंद हे नाव कसे काय आले? नाहीतर गेली अनेक वर्षे - म्हणजे त्याने नाव बदलून Mak केल्यापासून - आपणही त्याला Makच म्हणतो. प्रत्यक्षात आणि मनात पण! त्याच्या कामाच्या शांघाय, सिंगापूर, लंडन, टोरांटो अशा नानाविध ठिकाणी सगळीकडे चालेल असे नाव हवे असे त्याला वाटले आणि त्याने मकरंदचे MAK करून घेतलेसुध्दा. रजनीचीदेखील रानी झाली. इथे न्यूयॉर्कला आल्यावर मात्र व्हिसाच्या तरतुदीनुसार आपल्याला काम सोडून घरी बसावे लागलेय. आता त्या सगळ्या कायदेशीर बाबी पूर्ण होऊन परत काम सुरु करायला किती दिवस लागणार आहेत कोणास ठाऊक?" नेहमीप्रमाणेच दिवसातून शंभराव्यांदा तिच्या मनात येऊन गेले .

कामाशिवाय घरी नुसते बसायची तिला सवय नव्हती. कायद्यामुळे काम करता येत नाही, मुलगा होस्टेलवर, नवरा सतत बाहेर. ह्या एवढ्या मोठ्या दिवसाचे करायचे तरी काय असा प्रश्न रानीला पडायचा.

कुठेही न आपटता रोबोने खोली साफ केली आणि तो पुढच्या खोलीत जाण्याआधी चार्जिंग स्टेशनला जाऊन चार्ज होऊ लागला. रोबोच्या image mappingचे सेटिंग ठीक करताना वेळ कसा गेला रानीला कळले नाही आणि जेव्हा एवढा वेळ गेला असे तिच्या लक्षात आले तेव्हा तिला वाटले, "चला, दिवसाचा बराचसा वेळ तर संपला. आता अजून काही तास काढले की संपलाच म्हणायचा एक दिवस."

*********************************

"दादर सीट आहे का कोणी?" त्या बाईंच्या मोठ्या आवाजाने अवनी भानावर आली. "घाटकोपर गेलेसुद्धा इतक्यात? मनात रेंगाळत असलेले आणि इतस्तत: विखुरले जाणारे लेखनाचे दुवे जोडता जोडता कसा वेळ गेला कळलेच नाही. आता दाराजवळ जाऊन उभे रहायला हवे. ऑफिसमध्ये पोचल्यावर दिवसभर आपल्या कथेचा विचार करायला देखील वेळ व्हायचा नाही. दिवाळी अंकासाठी कथा द्यायला उशीर होतो आहे. लवकर पूर्ण करायला हवी कथा. कोणत्या दिशेने चालले आहे आपण लिहितोय ते कथानक?"

"आपल्या कथेतील पात्रे ह्या पुढे काय करणार आहेत? काय घडणार आहे त्यांच्या आयुष्यात पुढे? आपल्या कथेतील नीरा ही व्यक्ती तर आता भूतकाळात जमा झाली. रानी आणि नीरामधला स्थळ-काळाचा फरक सोडला तर त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटतात. दृश्य आणि अदृश्य बंधनात जखडल्या गेलेल्या आणि पर्याय निवडण्याचे फारसे स्वातंत्र्य नसलेल्या पण एक मोठा फरक हा की रानीच्या आयुष्यात निष्क्रियतेचा शेवाळलेला अंधार आहे तर नीरेच्या आयुष्यात मात्र बंधनातही प्रकाशाकडे जायची ओढ आहे.

नकळत आपण त्या पात्रांची नावे पण एकमेकांचे प्रतिबिंब असावे अशीच निवडली आहेत आणि हे आत्तापर्यंत आपल्या साधे लक्षातदेखील आले नाही! म्हणजे मग आपण लिहित असतो तेव्हा आपले सुप्त मनच आपल्याही नकळत कथेची मांडणी करत असते की काय? आणि मग ही नीरजा कोण? नीरा आणि रानीला जे करायचे होते आणि करता आले नाही अशा त्यांच्या इच्छांचे तर ते मूर्त रूप नव्हे?




नीरजा असणे कितीही आदर्श असले तरी प्रत्यक्षात शक्य आहे का? नीरजाच्या तेजाची आदर्श उजळण तिला कोणी 'मोहन' भेटण्यावरच अवलंबून आहे किंवा 'मोहन' भेटला तरच शक्य आहे असे तर आपल्या कथेतून प्रतीत होत नाहीये ना? रानीला व्हिसाच्या तरतुदींमुळे नोकरी करता येणार नाही पण मग बाकी काय करता येईल ह्याचा का नाही ती विचार करत? ती नुसतीच भौतिक सुखे उपभोगत, कंटाळत, निष्क्रिय आयुष्याचे दिवस ढकलते आहे. स्वत:च्या क्षमतांची जाणीव आणि त्यांचा समाजासाठी उपयोग करण्याचे भान हे कोणतेही मानवी आयुष्य अर्थपूर्ण असण्यासाठी आवश्यक नाही का?

कोणी कुठला पर्याय निवडावा हे ज्याच्या त्याच्या समजशक्ती, आवश्यकता, वृत्ती आणि जगण्याच्या रेट्यानुसार ठरेल. पण आयुष्यातील सकारात्मकतेचा ग्राफ नेहमी उंचावत नेला तरच त्या जगण्याला अर्थ आहे ना? रानीच्या आयुष्यातील संभ्रम मिटवायला ती एखाद्या संस्थेचे सेवाभावी काम करायला सुरुवात करते असे कथेत पुढे दाखवावे की काय?" विचारांचा चक्रव्यूह अवनीची पाठ सोडत नव्हता.

दादरला उतरून अवनी ऑफिसच्या दिशेने जात असतानाच तिचा फोन वाजला. रोहनचा फोन!

"काय म्हणतेय सिंगापूर? आज बरी बायकोची आठवण झाली? नाहीतर एरवी ऑफिसच्या टूरवर गेलास की तिकडचाच होऊन जातोस? कधी येतोयस परत?"

" अगं, हो, हो. जरा मला बोलू तर दे. आधीच तुझी प्रश्नांची बरसात सुरु."

"अरे, मग बोल ना!

"मी तुला म्हणालो नव्हतो, तसेच झाले आहे. इथल्या ब्रांचने हेड ऑफिसला सांगून मला इथे पोस्टिंग दिले आहे. मला इथे येण्यासाठी चांगले दणदणीत आमिष ठेवले आहे समोर. Asia Pacific Head ही पोस्ट!! खूप challenging आहे गं! इतके दिवस मी जी एवढी

मेहनत केली तिचे फळ आहे हे. सांग ना, काय करू या? मला हे पद आणि इथली नोकरी दोन्ही फार फार आवडणार आहे. ड्रीम जॉब आहे. माझ्या करीयरच्या दृष्टीने तर फारच छान. एकदम ग्लोबल एक्स्पोजर मिळणार आहे. मला तर 'हो' म्हणावे असेच वाटते आहे. तुझे काय मत आहे? तू म्हणशील ते मला मान्य आहे. पण तू इथे येणार असशील तरच मी ह्या नोकरीला हो म्हणेन हं. तुझ्याशिवाय, एकटे राहून, कितीही मोठी ऑफर असेल तरी मला नकोय ती.” रोहन उत्साहाने बोलत होता .

"अर्रे ग्रेट न्यूज! यू डिझर्व इट! तसे तर जेव्हा मी तुला लग्नासाठी ‘हो’म्हणाले ना, तेव्हाच हे नक्की झाले होते की तू खूप लकी आहेस म्हणून!! आज त्याच्यावर शिक्कामोर्तब झाले एवढेच!! जोक्स अपार्ट, मला खरंच खूप अभिमान वाटतो तुझा. एवढ्या लहान वयात एवढी मोठी पोस्ट ,ग्रेटच!"

“Thanks! मग काय 'हो' सांगू ना त्यांना?” अवनी भांबावली. जरी रोहनला कधीतरी सिंगापूरला शिफ्ट व्हावे लागेल अशी कुणकुण आधी लागली होती तरी आत्ताच, ह्याच ट्रीपमध्ये एवढे सगळे होईल असे वाटले नव्हते.

“अरे थांब थांब ... ज़रा वेळ मागून घे त्यांच्याकडून. आपण विचार करून ठरवू या ना, काय करायचे ते आणि हे बघ आता आलेच माझे ऑफिस. गेल्या गेल्या लगेच मीटिंग आहे मला. मी तुला करते मीटिंग संपल्यावर परत फोन. बाय."

फोन बंद करून अवनी लिफ्टमध्ये शिरली. सिंगापूरला गेलो तर आपल्या इथल्या कामाचे काय? फर्म आपला क्लेम ठेवेल का? आपण किती दिवसांनी परत येणार हे तरी कुठे माहिती आहे? तिथे जाऊन आपण काय करणार? आपल्याला नोकरी करता येईल का तिथे? इथले सगळे आप्त, सुहृद ... त्यांना सोडून जायचे? आणि "निवारा" अनाथाश्रमात आपण आठवड्यातून एकदा गंमतशाळा घेण्यासाठी जातो त्याचे काय? रोहन बरोबर राहणे सर्वात महत्त्वाचे आहेच ह्यात काही शंकाच नाही. पण हे सगळे प्रश्नही महत्वाचेच आहेत. नीट विचार करून निर्णय घ्यायला हवा. सिंगापूरमध्येही नवे विश्व उभारता येईलच, नक्की उभारता येईल हा विश्वास आहेच पण तरीही ... ”

# इंद्रधनुषी दिवाळी



**शिल्पा केळकर-उपाध्ये**

"Are you saying that you enjoyed blowing up things when you were young? - That is kind of scary your know.."

"Intro to Law" आणि "Speech and Debate" अश्या दोन्ही क्लासेसला नुकतीच एडमिशन घेतलेल्या माझ्या मुलीनं मला खाडकन माझ्या तंद्रीतून भानावर आणलं. दरवर्षीप्रमाणं माझं तिच्याबरोबर दिवाळीच्या आठवणींना उजाळा आणणं सुरू होतं. प्रत्येकवर्षी लहानपणीची एक नवीन आठवण सांगून मी तिला माझ्याविषयीचा आदर वाढवण्यासाठी मदत करत असे. पण आजचा माझा प्रयत्न चांगलाच फसला होता. किल्ला बनवण्याची सगळी प्रोसेस तिला सांगून झाली. मग दिवाळी संपल्यावर, किल्ल्याच्या भुयारात (जे प्लान करुन त्याच कारणासाठी बनवलेले असे) लक्ष्मी तोटा ठेवून तो कसा उडवून द्यायचा याचं वर्णन करुन सांगत होते. या अगदी साध्या-निष्पाप एक्सप्लोजनचा संदर्भ या काळातल्या मुलांना बॉम्ब आणि टेररिझमचीच आठवण करून देईल हे माझ्या लक्षातच न आलेलं. मग मी तिचा नाद सोडून दिला. आणि माझी मी एकटीच दिवाळीचे सगळे रंग मनात रंगवू लागले.



दिवाळी एकच पण आत्तापर्यंत किती वेगवेगळ्या रंगात साजरी केली.

अगदी लहानपणी काहीच कळत नव्हतं त्यावेळी नवीन फ्रॉक, खाण्या-पिण्याची चंगळ आणि आईनं तेल चोपडून चांगली आंघोळ घालून दिली की दिवाळी साजरी होत असे. एकदम सरळ-साधी सुगंधी दिवाळी. मग नंतर मोठं होवू लागल्यावर हळुहळू फटाक्यांची भीती नाहिशी झाली. मग मात्र दिवाळीच्या आदल्या होलसेल मार्केटमधून फटाके आणायला गेलेल्या बाबांची अगदी वाड्याच्या दाराशी बसून वाट पहात असलेल्यांच्या आठवणी अगदी आजही झगझगीत आहेत मनात - अगदी शोभेच्या झाडाच्या प्रकाशाइतक्या. मग ते आले की त्या फटाक्यांचं वाटप. सगळयांना एकसारखे मिळण्याचा माझा अट्टाहास असत असे. त्यापायी मी अगदी लवंगी फटाक्याची माळही अर्धी कापून घेत असे. हळूहळू त्या दारुच्या वासाचा आणि फटाक्यांच्या आवाजाचा नशा उतरून गेला. आणि मग दिवाळीला रंग चढला तो रांगोळीचा. चार दिवस वेगवेगळया किती मोठ्या आणि कुठल्या रांगोळया काढायच्या याची खलबतं चालत असत. मग अगदी पर्फेक्ट रांगोळी मिळवण्याचा खटाटोप. जास्त बारीक नाही पण अगदी भरड नाही, बोटाच्या चिमटीत धरून रेघ काढून पाहिल्याशिवाय रांगोळीची खरेदी होत नसे. "इतकी चिकित्सा मी जेंव्हा भाजी आणायला सांगते तेंव्हा करत जा", असं आईचं कायमचं पालूपद ऐकावं लागे दिवाळीच्या दिवसात. एकदा सगळं जमलं की मग अगदी गुडघे अवघडून आणि पाठ मोडून येईपर्यंत रांगोळया काढण्याचं काम चालत असे. इतके कष्ट करून काढलेली रांगोळी पुसायची का आणि मग जर पुसायचीच असेल तर इतके कष्ट का करायचे असे प्रश्न कधीच पडत नसत त्यावेळी.

दिवाळीवर असलेला फराळाचा खमंग रंग मात्र कितीही लहान-मोठं झालं तरी अगदी पक्का ऑईलपेंट असल्याप्रमाणं कायमचा बसलेला. आई आणि वाड्यातील सगळ्या काकू-मावशी एकत्र फराळाचे करत असत. त्याची तयारी सुरु असली त्यांच्या गप्पामधून त्या साऱ्या कामांची होणारी उजळणी मनात एक वेगळाच आनंद निर्माण करायची. एकदा फराळाचे बनले की मग फराळाच्या ताटांचं वाटप हे काम अगदी ठरलेलं असे. मग कोणाचं ताट आलं की त्याचं पूर्ण एनालिसिस होत असे. कोणाच्या चकल्या अलवार होतात, शंकरपाळी कोणाची खुसखुशीत असतात. जाळीदार अनारसे कसे कोणालाच जमत नाहीत. आणि शेजारच्या एक काकू फराळाचं विकत आणतात पण घरी बनवल्याचं क्रेडीट घेतात. या आणि अशा अनेक बातम्यांची देवाणघेवाण फराळांच्या ताटांबरोबर चाले. मग प्रत्येकाचं आलेलं ताट रिकामं द्यायचं नाही म्हणून त्यात घालून देण्यासाठी फराळाचं सोडून आणखी काही पदार्थ आई करत असे. मग आपलं वेगळं ताट देण्याऐवजी त्यांच्याच ताटात आपण आपलं फराळाचं का नाही द्यायचं याचं समाधानकारक उत्तर मला कधीच नाही मिळालं.



मग दिवाळीचे हे सारे परिचयाचे रंग उतरून जाऊन तिला एक वेगळाच रंग चढला, जेंव्हा घर, आपली माणसं आणि देश यासर्वांपासून लांब

जाऊन दिवाळी एकट्यानं साजरी केली तेंव्हा. साऱ्याच गोष्टी लुटुपुटिच्या वाटलेल्या. आईनं केलेल पदार्थ आठवून आठ्वून तसेच करण्याचा केलेला असफल प्रयत्न. मग इथल्या इनग्रेडिएंटसमधेच काहितरी गडबड आहे असं म्हणून मनाची काढलेली समजूत. लक्ष्मीपूजनाला साळीच्या लाह्या मिळत नाहीत म्हणून वापरलेल्या राईस क्रिस्पीज, बत्तासे नाहीत म्हणून वापरलेली शुगर कँडी. आणि मग मात्र या परदेशी दिवाळीला सबस्टीट्यूशनचा रंग चढू लागला. गुलाबजामसाठी खवाच हवा, नरकचतुर्दशीला उटणंच हवं हे सगळे अट्टाहास कमी होवू लागले. स्वत:ची आणि इतरांची कल्पकता वापरून जे मिळेल त्यात दिवाळी साजरी करण्यात वेगळाच आनंद वाटू लागला. खरं तर परदेशात साजरी केली जाणारी दिवाळी ही भारतीय पाककलेसाठी फार मोठा माईलस्टोन बनायला हवा. विविध पर्याय शोधून केले जाणारे अत्यंत चविष्ट फराळाचे पदार्थ या दिवाळीचा मानबिंदू असतात. इटालिअन रिकोटा चीजचे गुलाबजाम, फ्रेंच पेस्ट्रीशीटस वापरून बनणाऱ्या करंज्या-चिरोटे. मेक्सिकन टॉरटीआजचे बनणारे शंकरपाळे - अश्या विविध देशातली सामग्री एकत्र येऊन भारतीय दिवाळीचा फराळ बनवते त्यावेळी 'हे विश्वची माझे घर' याचा साक्षात्कार मला त्या फराळाच्या ताटात होतो.



इथं अमेरिकेत दिवाळीच्या सुमारासच हॅलोविनही येऊ घातलेलं असतं पहिल्या-पहिल्यांदा मी अगदी आवेशानं दिवाळी सुरू असताना हॅलोविनचं डेकोरेशन करायला विरोध करत असे. कसल्या त्या अभद्र चेटकीणी आणि भूतं लावायची दिवाळीला? मग माझ्या मुलीला जेंव्हा नरकासुराची गोष्ट सांगायला लागले तेंव्हा वाटलं अरे - हे तर सगळे नरकासुराचे भाऊबंदच की मग दोन्हीही डेकोरेशन सुखानं एकत्र नांदू लागली. विविध क्लुप्त्या लढवून आकाशकंदील बनवणे हाही पाककलेसारखाच इथल्या दिवाळीचा मानबिंदू असतो. इतकी रिसोअर्सफुल लोकं घरी कंदील पणत्या बनवताना पाहूनच माझ्या मनात खरं तर दिवाळी साजरी झालेली असते आधीच.



आईच्या हातच्या खमंग भाजणीच्या चकल्या, सुगंधी तेल्-उटण्याचा वास, अभ्यंगस्नान- ओवाळणं या साऱ्या मागे सोडलेल्या आठवणींचे तरंग तर उठतच रहातात प्रत्येक दिवाळीला. त्या आठवणींनी मन भुसभुसशीत मातीप्रमाणं मोकळं होतं. पण मग त्या मातीला ओलावा मिळतो तो अनुभवाच्या मुठीतील क्षणांचा. मग त्याच मातीतून एका वेगळ्याच वैश्विक दिवाळीचे हिरवे कोंब तरारून येतात आणि मग माझ्या मनातल्या इंद्रधनुषी दिवाळीचे रंग सुवासिक होवून जातात.





# जिप्सी



प्राजक्ता नरावणे

**हात छूटे भी तो रिश्ते नही छोडा करते**

**वक्त की शाखसे लम्हे नही तोडा करते**

गारूड घातलं आहे या गझलेनी काही दिवस माझ्यावर! स्थलांतराच्या पक्ष्यांचे संकेत काही निराळेच असतात. हे पक्षी आपल्या विविक्षित स्थळी परत येतात...अगदी न चूकता. काय असतात हे संकेत? कुठे जुळलेली असते ही नाळ? आणि आपली?





गाव सोडलं, देश सोडला, माती सोडली. नव्या मातीत मुळं रुजू लागली. अगदी तिथलीच असल्यासारखी. पण बालपणीचा गाव मात्र मनात तसाच्या तसा राहीला...मनाचा एक कोपरा व्यापून. पण एक दिवस असा आला की आता हा ही गाव सोडायचा! इथली रोजीरोटी संपली आपल्यावाटची! आता नवीन गाव...नवीन माती...नवीन संधी...नवीन क्षितिज! माझ्या जिप्सी जगण्याचा पुढचा पडाव!

या जिप्सी जगण्यानी एकीकडे जगणं उन्नत होत असतांना, अनुभव समृद्ध होत असतांना जगण्याच्या कक्षा रुंदावत असतांना कुठेतरी अश्वत्थामापण सुद्धा मागे लागलं आहे का? जन्मगाव सोडला तेंव्हा ती नाती मागे राहीली, रक्ताची, जिह्याळ्याची! या गावात सगळी नवी नाती जोडली, मैत्रीची! कधी कधी रक्ताच्या नात्याहून समृद्ध, समजून घेणार

आता तीही दूरावणारं...ह्या दूरावणाऱ्या नात्यांची भळभळणारी जखम घेऊन फ़िरणारं अश्वत्थामापण या जिप्सी जगण्याची दुसरी बाजू. तेंव्हा ही गझल माझ्या मनावर किंचीत फ़ुंकर घालते.

शहद जीने का मिला करता हैं थोडा थोडा

जानेवालोंके लिये दिल नही थोडा करते

माझ्या साठी थोडी बदलून,

शहद जीने का मिला करता हैं थोडा थोडा

जानेवाले, दिल नही थोडा करते


हात छूटे भी तो रिश्ते नही टूटा करते

वक्त की शाखसे लम्हे नही तोडा करते

या नात्यांचा गंध सदा माझ्या आसपास दरवळत रहीलचं, नवी नाती निर्माण झाली तरी भूतकाळाचे दोर असे थोडेच तोडता येतात? स्थलांतराच्या पक्ष्यांसारखे माझेही संकेत निर्माण झाले आहेत. फ़क्त त्यांच परतीच स्थान एकच असतं, माझी एकाहून जास्त!

पण परत मन कातर होतं. माझं त्या स्थलांतराच्या पक्ष्यांसारखं झालं तर? तर हे पक्षी दरवर्षी एका विविक्षित ठिकाणी एका विविक्षित झाडावर परत यायचे. पण नागरीकरणाच्या फेऱ्यातही निसर्ग जपणाऱ्या माणसंनी, ते झाड उचलून दुसरीकडे लावले. झाड वाचले पण पक्षी? ते परत आले तर संकेताशिवाय भांबावून गेले बिचारे, सैरभैर झाले आणि शेवटी मरून गेले!

काळाच्या ओघात भौतिक संकेत तर बदलणार आहेतच. भौतिक संकेत शोधत बसणे हा आता मूर्खपणा ठरेल. माझ्या मनात ठसलेला माझा जन्मगाव असाच हरवतांना बघितला आहे. ते होण अटळ आहे. पण मनाचे संकेतही असेच हरवले तर? मनाच्या हाकेला प्रतिसाद मिळालाच नाही तर?....मी ही त्या पक्ष्यांसारखीच भांबाऊन तुटून जाईन का? दोर तुटलेल्या पतंगासारखी भरकटत जाईन का? कारण या संकेतांना न मिळणारा प्रतिसाद ही त्या मृतनात्याची लक्तरे नाहीत का? मग परत मी नातं जोडू शकेन का? इथे परत त्याच गझल मधील पुढचा शेर मदतीला येतो.



जिसके आवाज मे सिलवट हो, निगाहोंमे शिकन

ऐसी तसवीर के टूकडे नही जोडा करते

इंटरनेट, मोबाईल मुळे जवळ आलेल्या जगातही जी नाती भौतिक अंतरामुळे टिकणार नसतील, अश्या नात्यांचे संकेत निर्माणच कशाला करायचे? माणसात आणि पक्ष्यात इतकातरी फ़रक नको का, संकेत निर्माण

करण्यात? शहाणपणानं संकेत निर्माण करण आपल्या हातात...पुढचे पुढे. जर हे जिप्सी जगण्याचं प्राक्तन असेल तर ते मान्य केलेच पाहीजे आणि जे होईल ते सोसायचं बळ एकवटलं पाहिजे. मला खात्री आहे की माझे हे काही मोजके संकेत मला नेहमी प्रतिसाद देतील. असे काही जन्मगाव सोडतांना जपलेले संकेत प्रतिसाद देतातच की!! माझ्या जिवाभावाच्या दोन मैत्रीणी. काही वर्ष काही संवाद नसलेल्या, पण मनाच्या तारा जुळलेल्या. काही



वर्षांनी भेटल्यावरसुद्धा मधल्या दूराव्याची जाणीव न होता, आमचा चिवचिवाट परत पुर्वीसारखाच सुरु होतो. आणि आता व्हॅाट्स ॲप वर तर रोजचा संवाद! पण हेच मला जन्मगावातील प्रत्येक नात्याबद्दल नाही म्हणता येत. म्हणूनच संकेत शहाणपणानं निर्माण करण महत्वाचं ! बाकी...

लगके साहिल से जो बहता हैं, उसे बहने दो

ऐसे दरियां का कभी रुख नही मोडा करते

हात छूटे भी तो रिश्ते नही टूटा करते

वक्त की शाखसे लम्हे नही टूटा करते

Three cheers to my "Jypsey Life”

# माती, एक संकल्पना



**माधव भावे**

माती, कुंभार, चिखल, थापटणं, चाक, मडकी, साठवण

माती, कुंभार, चिखल, माप, विटा, इमारती, निवारा

माती, आजोबा, कुंडी, पाणी, रोप, फूल, हर्ष

माती, कारागीर, भेसळ, रापी, कुंचला, मूर्ती, पूजा, भक्ती

माती, शेतकरी, बियाणं, पाणी, पीक, धान्य, जीवन

माती, मजूर, खणती, खड्डा, कबर, ताजमहाल, स्मृती

माती, अभियंता, यंत्रं, बांध, धरण, विद्युन्निर्मिती, कारखाने, उपकरणं, आधुनिकता

माती काळी, माती लाल, साराच असे धन्याचा माल

माती कोणी खात नाही, माती कोणाला खात नाही

सगळ्यांची होते मूठभर माती, पण खंडीभर मातीची हांव ठेवती

एकमेकांचा जीव घेती, अंती कोसळून पडती

लगेच दुसरे फावडे घेती आणि युद्ध सुरू करती

मातीची ही इतकी आस, जरी शेवटी सगळी मिळून एक मोठी रास

# प्रतिमा आणि प्रतिभा
# सिंधुताई सपकाळ



**मुलाखत आणि शब्दांकन: मुक्ता पाठक शर्मा**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करायचे धैर्य आणि ऊर्जा आपल्याला कुठून मिळाली? आपला पहिला परिस्थिती विरुद्ध लढा कोणता?



माझ्यात लढवय्या वृत्ती पहिलेपासूनच होती. तिचा वारसा मला माझ्या वडिलांकडून आला. जेव्हा लहानणी आम्ही कधी रडायचो किंवा रडत घरी यायचो तेव्हा ते उलट आम्हाला मारायचे. ते नेहमी म्हणायचे, "सामना करायला शिका ! रडत बसू नका."

जेव्हा जंगल परिसरातून शेण सरकारी अधिकारी घेऊन जायचे तेव्हा ते उचलायची मजुरी सुद्धा सरकारी अधिकारी आम्हाला देत नव्हते. एकतर शेण घेऊन जाता त्यावर शेण उचलण्याची मजुरी सुद्धा नाही जो खरे तर अधिकार होता आमचा. म्हणून आवाज उठवला. अन्याय होऊ दिला तरच अन्याय होत रहातो. अन्यायाविरुद्ध तोंड द्यायला शिकले पाहिजे.

जेव्हा ओलेती बाळंतीण असतांना तुम्हाला घर सोडून जाण्याची वेळ आली तेव्हा भीती नाही का वाटली की आता माझे वा माझ्या बाळाचे काय होईल?

तसे बघता सासरी माझी खूपच ओढाताण होती. पोरं झाली ती सासूबाईंनी माझ्यापासून हिरावून घेतली. मला त्याना भेटण्यासही बंदी होती. माझ्या पाठीशी कोणीच नव्हते. आणि तिथे फार मोठ्या सुखातही नव्हतेच . त्यामुळे तशी भीती नाही वाटली. पण माणसांची भीती वाटायची, कारण जेव्हा घर सोडल तेव्हा वय अवघे वीस वर्षांचे होते आणि त्यात लहानसे ७-८ दिवसाचे बाळ बरोबर. अशा अवस्थेत जर चार माणसांनी मला उचलून नेले तर मी एकटी काय करणार

आणि मदतीची हाक कुणाला मारणार? कोण माझ्या मदतीला येणार? आणि त्या भीतीपोटीच मी स्मशानाचा आश्रय घेतला.

**जी मायेची उब आईकडून अपेक्षीत होती ती उब चितेवर जळणार्या अग्नीने दिली असे म्हणता येईल का?**

हो ना, तेव्हा थंडीही खूप होती त्यामुळे ती उब बरी वाटायची. जेव्हा प्रतिकूल परिस्थिती येते तेव्हा स्मशानातले वातावरणही आपलेसे वाटायला लागते. मी त्या स्मशानाचे खूप आभार मानते कारण मला जगण्याची उपरती स्मशानात झाली. जेव्हा मी स्मशानात बसलेले होते आयुष्याचा कंटाळा आणि वीट आल्यामुळे मी जोर - जोरात रडत होते आणि एव्हडेच बोलत होते की, “मज जवळ काही नाही, मला कोणीपण नाही” आणि त्याच वेळी मला स्मशानात भास झाला की कोणीतरी मला काहीतरी सांगत आहे आणि रडता रडता मी थांबले. मला स्पष्ट ऐकू आले की , ‘बरोबर काहीच घेऊन जायचे नसते. दोन हस्त आणि तिसरे मस्तक’ आणि मला स्पष्ट ऐकायला आले की, ‘ सिंधू कफन को जेब नही होती है और मौत कभी रिश्वत नही लेती”, जेव्हा मरायचे तेव्हा मरा ना. तेव्हा मी जोरात ओरडले, “ मरणे रद्द मरणे रद्द’. मला जगण्याची ताकद आणि जीवनाकडे बघण्याचा रस्ता स्मशानात मिळाला.

**पुढची वाटचाल कशी होत गेली?**



मला देवाचे एक वरदान होते, मला गाणे गाता येत होते. मग मी रेल्वेत गाणे म्हंटले की मला खाणे मिळायचे. मी भिकारीणच होते. माझा खरा परिचय म्हणजे ‘रेल्वेत भिक मागणारी बाई” मी रेल्वेत गाणे गाऊन जी भिक मिळायची ती मी वाटून द्यायचे. मी शोधायचे कोण भुकेले आहे आणि मग त्याना खाऊ घालायचे. ज्यांना ज्यांना खाऊ घातले त्यांनी साथ नाही सोडला. “अकेली निकाली थी मगर कारवा कब बन गया पता ही नही चला!”

**इतक्या स्वार्थी लोकांमधून येऊनही ही आत्मियता कशी काय शिल्लक राहिली?**

आईचे काळीज होते ना! आईचे काळीज असेच असते. देवाने बाईच्या जातीला घडवताना नक्कीच overtime केला असेल. आई बदलू नाही शकत. आई ही अशीच असते मग ती कोणाचीही असो. आई होते त्यामुळे मला भूक काय असते ते माहित होते .

असे करता करता अनाथ आणि बेसहारा लोकांची भुकेची गरज पहाता पहाता त्याना सहारा का द्यावासा वाटला?

जेव्हा घर सोडले तेव्हा अंगावर धड कपडेही नव्हते. मी स्मशानात फेकून दिलेले कपडे घालायचे. त्यामुळे मला जाण होती कुडकुडणे काय असते. रात्री मी स्टेशनवर फिरायचे, एखादा कुडकुडत झोपलेला म्हातारा पाहिला की मी त्याच्या अंगावर कपडा टाकायचे.



कपडे आणायचे मी इकडून तिकडून उचलून. एखादे पोरगं कुडकुडतांना दिसले की त्याला मी पदराखाली घ्यायची. मी फक्त माया दिली आणि ती लोकं माझ्या सोबत आले. आणि मला जे मिळाले नाही ते दुसर्याला

द्यावे हाच एक उद्देश होता. मला मिळाले नाही, मला मिळाले नाही अशी खंत करत बसण्यापेक्षा दुसर्याला देऊन मी माझे काळीज भरून काढले माझे.

तुमचा हा परिवार वाढत गेला त्याला पहिला मदतीचा हात तुम्हाला कोणाकडून मिळाला?



मला कुणाकडूनच मदत नाही मिळाली. लोकं सहजा सहजी मदत करायला तयार होत नाही. मी गाणं म्हणायचे आणि खाणं मिळावायचे. मग मी भाषण द्यायला लागले नंतर. "भाषणं केले की राशन मिळते". 'मी अनाथांची माय झाले तुम्ही गणगोत तरी व्हा ! द्या मला मदत करा', असे भाषणात सांगायचे. मला बोलता यायचे, मला व्यक्त करता यायचे. त्या माझ्या बोलण्यावर आजही माझे विश्व उभे आहे. मला आजही grant नाही. हजारो लेकरांची माय, २८२ जावई आणि ४२ सुनांची सासू आणि गोठ्यातल्या एका गायीने वाचविले म्हणू पावणे दोनशे गायी आणि ८० वासरे सांभाळते मी.

जेव्हा घरातून मला हाकलून दिले होते तेव्हा मी गोठ्याचा आश्रय घेतला होता आणि गाईच्या गळयात गळा घालून खूप रडले. तिथेच प्रसूत होत असतांना त्या प्रेमळ गाईने माझ्यावर उभे राहून मला इतर गाईपासून वाचविले. तेव्हाच मी तिला वचन दिले की तू गाय असून माय झालीस मी माय व्हायचा प्रयत्न करेन. आणि आता तिचीही परतफेड करीत आहे. वर्धा जिल्ह्यात, माझ्या सासरी पावणे दोनशे गाई आहेत.

तुमचा परिवार वाढत होता तेव्हा तुम्हाला तुमच्या पोटच्या मुलीला वेगळे का करावे लागले?

रात्र झाली की जिथे कुठे देवाचे भजन सुरु असेल तिथे मी जायचे. भजन गाण्यासाठी माझा काही नंबर लागायचानाही. कोण माझ्या सारख्या बाईला ओळखणार? मग मी विचारायचे मी एक भजन म्हणू का? तर लोकं म्हणायचे बाई बाजूला हो. पण मी पिच्छाच पुरवायचे सारखी म्हणत राहायचे की आता म्हणू का? आता म्हणू का? मग एखाद्याला दया यायची आणि म्हणायचा, 'अरे म्हणू द्या की" मग मीही जीव तोडून गाणे म्हणायची. कारण मला माहित होते की गाणे म्हंटले की मला खाणे मिळणार. आणि भजनवाली बाई म्हणून मला जेवायलाही मिळायचे. मात्र मी दुसर्या दिवशी गाव बदलायचे. माझा एक नंबरचा शत्रू म्हणजे रेल्वेचा टीसी. मला पाहिले रेल्वेत की ते मला खाली उतरवून द्यायचे आणि मीही म्हणायचे ये नही तो और ही सही असे म्हणून ती गाडी बदलायची.

एकदा असेच टी सी ने गाडीतून खाली उतरवले तेव्हा त्या रात्री एका देवळात भजन गाऊन खाणे मिळविले आणि दुसर्या दिवशी मी एसटी पकडली. मी जास्त लांबची गाडी पकडायची नाही. आभाळ भरून आलेले, गाडीला भरगच्च गर्दी आणि गाडी खचाखच भरलेली. माझी वेळ आली तेव्हा कंडक्टरने माझ्या कडे तुच्छतेने पाहिले कारण माझा अवतारच असा होता. डोक्याला फणी नाही अंगाला पाणी नाही. त्याने मला खाली उतरायला सांगितले. माझ्या जवळ पैसे होते मी म्हंटले मी उतरणार नाही. तो म्हणाला मी तिकीटही देणार नाही आणि गाडीही सोडणार नाही. मला तेव्हा नेहमी कोणाशीही भांडावेसे वाटायचे आणि आता नेमका कंडक्टर सापडलेला. त्याच आणि माझं भांडण सुरु असतांना एक फाटका माणूस आला. त्याने एसटीचे गेट पकडले, त्याच्या हाताची बाही फाटलेली होती

आणि लोंबकळत होती. तो मला म्हणाला बाई काल रात्री देवाचे गाणे तुम्हीच म्हंटले का? लई चांगलं म्हंटलं बाई ! मी म्हंटले, 'हो मीच म्हंटल ना 'तो म्हणाला मी तिथेच होतो. माझ्या गरीबाकडून एक घोट चहा पीता का? एव्हड्या सन्मानाने कोणी चहा नव्हता पाजला. मी उतरले खाली. कंडक्टरने संधीच पाहीली . मी उतरल्याबरोबरच त्याने डबल बेल मारली आणि गाडी सुटली. गाडी माझ्यापासून दहा फुट दूर गेली आणि कडाडून आभाळ गरजले आणि त्याच गाडीवर वीज पडली. माझ्या समोर गाडी राख झाली. आगीचे लोळ आमच्यापर्यंत आले. तेव्हा माझे जळालेले केस परत वाढलेच नाही. ड्रायव्हर आणि कंडक्टर जळून कोळसे झाले. मी चहा प्यायला खाली उतरले म्हणून वाचले. विशेष म्हणजे चहा पाजण्यासाठी ज्या माणसाने मला खाली उतरवले तो माणूस मला सापडलाच नाही. मी खूप शोधले त्याला पण तो सापडला नाही. आयुष्यभर एक प्रश्न आहे की जर मला त्या दिवशी खाली उतरवले नसते तर मी मेले असते. मला त्या दिवशी वाचविणारा कोण? त्या दिवशी मी विचार केला, ' सिंधूताई सपकाळ आज तू संपलीस , आता दुसर्यांसाठी जगायला शिक ! तुला दुसर्यांसाठी जगायचे असेल तर स्व:ताची मुलगी जवळ ठेवू नकोस. खूप दिवस विचार केला. शेवटी आईचं काळीज . सांभाळलेल्या लेकराला गाण म्हणून, पाणी पाजून निजवशील आणि स्व:ताच्या



पोरीला अंधारात नेऊन खाऊ घालशील. त्यावेळेस मी विचार केला की मी अनेकांची आई होईल माझ्या मुलीचीच नाही. आणि पहिला निर्णय घेतला की मुलीला जवळ ठेवायचे नाही आणि मुलीला पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांच्या ट्रस्टला दिली. ती तिथे वाढली शिकली आणि एका मुलीची माय झाली आणि मी हजारोंची माय झाले.

विशेष म्हणजे माझ्या मुलीनेही मी ज्यांना ज्यांना आपलेसे केले त्याना आपले मानले. एकदा तिला शाळेत विचारले की तुला किती भाऊ बहिण आहेत तर ती बोटावर मोजून सांगत होती की एक , दोन , तीन ,...... आणि सगळी शाळा तिला हसत होती. कारण तिला एक आणि दोन भाऊ असतात हे माहीतच नाही. मला नेहमीच ममताचे कौतुक वाटते कारण तिचे योगदान सगळ्यात मोठे आहे. कारण जर तिने म्हंटले असते की माझी आई फक्त माझीच आहे असे म्हंटले असते तर मी काय करू शकले असते? ज्या लेकराना मी पदराखाली घेतले त्या सगळ्याना तिने आपले मानले.

जेव्हा शाळेतील इतर मुलांबरोबर त्यांचे पालक असायचे तेव्हा ती एकटीच असायची. ती माझी वाट पहात नसेल असे नाही पण मलाच जमले नाही. मला आता आता भीती वाटायची की हिला आपल्या बद्दल काय वाटत असेल ? पण जेव्हा तिला पत्रकारांनी प्रश्न विचारला की तिला माझ्याबद्दल काय वाटते तेव्हा ती म्हणाली, " मला माझ्या आईची आई व्हायचं " तेव्हा मला दिलासा मिळाला. माझ्यात असलेल्या अपराधी भावनेला माफी मिळाली आणि मन भरून आले.

<u>तुमच्या निवार्याखाली तुम्ही अनाथांना घेत गेलात तेव्हा सुरुवातीला कितीजण होती ?</u>

ममताला माझ्यापासून वेगळे केल्यावर पहिला जवळ केलेला दीपक ! मग ज्याला गरज असेल त्याला जवळ घेत गेले. ज्याला कोणी नसेल त्याला आपलं मानलं. आजूबाजूच्या गावातून लोकं आई बाप नसलेल्या मुलाना माझ्याकडे घेऊन येत आणि माझ्या

हवाली करत आणि त्याच बरोबर थोडीफार मदतही करत. असे होता होता हळुहळू परिवार वाढत गेला. आज हजारो लेकरांची आई झाले.

वाढत जाणार्या परिवाराचा उदरनिर्वाहाचा प्रश्न कसा काय सोडविलात?

जेव्हा कोणी गाववाले माझ्याकडे त्यांच्या गावात अनाथ झालेले मुल घेऊन यायचे आणि म्हणायचे माई याचे आई वडिल वारले ह्याचा सांभाळ



तुम्ही करा. ते लोक त्या मुलाला ओळखतात असे लिहून द्यायचे तसेच संगोपनासाठी मदतही द्यायचे. एका गावाने असे केले की आपसूकच आजूबाजूच्या गावातील लोकही मदतीचा हात घेऊन यायचे. दुसरे म्हणजे माझा माझ्या भाषणांवर प्रचंड विश्वास! माझी भाषणं खेडोपाडी व्हायची त्यामुळे लोक भेटायला यायचे आणि मदत करायचे. तसेच मी शाळा कॉलेजात जायचे आणि मुलांना आव्हान करायचे. कॉलेजच्या मुलांना म्हणायचे तुमच्या एका सिनेमाचे आणि बटाटेवड्याचे पैसे माझ्या लेकरांसाठी द्या आणि मुले खुशीने द्यायची. शाळेत जाऊन मुलांना पसाभर धान्य मागायचे आणि आश्चर्य म्हणजे पालकही किलो किलो धान्य पाठवायचे मुलांच्या हाताने. मला धान्य पुरविणारे केंद्र म्हणजे शाळा आणि आर्थिक मदत देणारे केंद्र म्हणजे कॉलेज. आजही त्याच बोलण्यावरच सगळ सुरु आहे. मला grant नाही. सरकार कडे मागून मागून थकले आता नाही मागणार. आता माझे सरकार म्हणजे जनता! मी त्याना म्हणते मी शब्द दिले मला जेवायला द्या आणि माझी झोळी भरते!

तुमच्या संस्थांबद्दल काही सांगाल का?

आमच्या संस्थांमध्ये आम्ही मुलांचे संगोपन आणि शिक्षण करतो.



चिखलदरा, अमरावती जिल्ह्यातील माझी पहिली मुलींची संस्था आहे “सावित्रीबाई फुले संस्था” त्यात आदिवासी मुले आहेत आणि अनाथाही आहेत. आदिवासी लोकांमध्ये नवरा बायकोला सोडतो, बायको नवर्याला सोडते तेव्हा त्यांच्या मुलींची खूप फरफट होते . अशी मुले त्या संस्थेत आहेत.

ममता बालसदन : दीपक ज्याचा मी सांभाळ केला त्याचा जमीन जुमला होता गावाकडे. जेव्हा तो मोठा झाला तेव्हा मी त्याला सांगितले की तुला उभे रहायला तूझी स्व:ताची जागा आहे. पण त्याने ते मानले नाही आणि त्याने त्या जमिनीवर ममता बालसदन उभे केले. कारण ममताने तिची आई सोडली म्हणून आम्हाला आईची ममता मिळाली म्हणून त्याने ममताच्या नावाने त्याचे नाव “ममता सदन” असे ठेवले . ही पहिली संस्था सुरु झाली पुरंदर तालुक्यात. इथे मुली आहेत

सन्मति बालनिकेतन - मिळालेल्या पुरस्काराच्या पैशातून मांजरीला ही जागा घेतली आणि नंतर कर्ज काढून आणि आलेल्या मदतीवर ही संस्था काढली. या संस्थेत मुले आहेत. मी इथे रहायला असते. हे आमच्या संस्थांचे मुख्यालय आहे.

वर्धाजिल्ह्यात “गोरक्षण केंद्र” आहे .

तुम्हाला मदतीचा ओघ कुठून मिळला आणि मिळतो?

मला मिळालेल्या पुरस्कारातून मी मांजरीला जागा घेतली पण त्यावर बांधकाम करायला पैसा नव्हता. तेव्हा योगा योगाने बाणेर पतसंस्थेचे दिलीप मुरकुटे मला भेटले आणि त्यांनी विचारले की तुमच्याकडे जागा आहे तर त्यावर बांधकाम का नाही करत? तेव्हा त्याना सांगितले की एव्हडी जमीन सोडल्यास बँके कडून कर्ज घेण्यासाठी माझ्याकडे काहीच नाही आणि ती पुरेशीही नाही. तेव्हा त्यांनी स्व:ता आपली मालमत्ता गहाण ठेवून सन्मति संस्था उभारण्यास मोलाची मदत केली.

तुमच्या मुलांचे काही अनुभव सांगा ना ?

मुल हे मुलच असते. एखादे व्रात्यही असते.



असाच माझा एक मनिष नावाचा मुलगा आहे. लहानपणी त्याच्यासाठी मी माझ्या फाटक्या पातळाचा झोपाळा करून दिला होता. त्याने पाय घालून घालून तो अजून फाडला आणि त्यातून तो पडला. तो पडला तर मी त्या अजून दोन धपाटे घातले. आता तोच मनिष मोठा झाला आहे त्याने हॉटेल मेनेजमेण्टचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे आणि सध्या पावणे दोनशे गाईंचे संगोपन तोच करीत आहे. तसेच शेणापासून इलेक्ट्रिसिटी निर्णाण करण्याचे प्रयोग करीत आहे. त्याने आता खास नागपूरवरून खास स्टीलचा झोपाळ करून माझ्यासाठी पाठवला आणि म्हणाला माई तू मारलेले धपाटे अजून मला लक्षात आहे. हा झोपाळ खास तुझ्यासाठी तो फाटणार नाही.

जो पहिला दीपक जेव्हा माझ्या बरोबर होता तेव्हा दिवस खूप कठीण होते. तेव्हा आम्ही बारदानावर झोपत असू. आता आई थकायला लागल्यावर त्याने आई बारदानावर झोपली म्हणून बारदानाचेच एक युनिट सुरु केले. तसेच त्याचा संस्थेला मदत म्हणूनही फायदा असा त्याचा विचार ! अशीच माझी मुले आहेत.

श्याम नावाचा माझा मुलगा आता माझ्यावर पीएचडी करीत आहे. काही माझी मुले प्राध्यापक आहेत, डॉक्टर , इंजिनिअर आहेत. मी भाकरीची आणि नोकरीची दोन्हीचीही भिक्षा मागते. लेकर मोठी झाली आहेत पण आईची नाळ अजून त्यांनी तोडली नाही आहे. येतात भेटतात आणि मदतही करतात. असा हा माझा संसार आहे.


आपल्याला मिळालेल्या पुरस्कारांबद्दल काही सांगाल का?

माझा भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम, प्रतिभा ताई पाटिल आणि प्रणव मुखर्जी यांच्यातर्फे सत्कार करण्यात आले. अनेक संस्था द्वारे ५०० च्यावर पुरस्कार आणि मानचिन्हे देण्यात आली आहेत. पण थोडे वाईट असे वाटते की अजूनही महाराष्ट्र सरकारने काहीच दखल घेतलेली नाही.

ज्या सासर माहेर ने मला परके केले त्यांनीही माझा सत्कार केला. जेव्हा मी घर सोडले तेव्हा मी रडत होते आणि जेव्हा सासरने माझा सत्कार केला तेव्हा माझा नवरा रडत होता. तेव्हा त्याना मी म्हंटले तुम्ही रडू नका. तुम्ही मला सोडले म्हणून तर मी एव्हडे काम करू शकले. तुम्ही मला मोठे केले. मला जेव्हा तुम्ही सोडले तेव्हा माझ्या पातळाला गाठी होत्या पण आज तुमच्या धोतराला गाठी आहेत तेव्हा आता माझ्या बरोबर चला. पण आता पती म्हणून नाही तर माझे लेकरू म्हणून या. मी आई होईल तुमची!




मी अमेरिकेला झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला गेले आणि त्यामुळे माझ्या जीवनावर “मी सिंधुताई सपकाळ” हा चित्रपट निघाला.




आता नुकताच माझ्या लेकरांवर अनुबोधपट निघाला आहे “अनाथांची यशोदा “

तुमच्या भविष्यातील योजना काय आहेत?

या पुढे मी कोणतीच नवीन संस्था उभी करणार नाही. ज्या संस्था आहेत त्याच सांभाळणे महत्वाचे आहे. संस्था स्थापन करणे सोपे आहे पण ती टिकविणे कठीण आहे. जे उभे केले आहे ते टिकावे हाच प्रयत्न करत रहाणार आहे. ही परंपरा अशीच सुरु रहावी , ज्याला घर नाही त्याला घर मिळावे हीच अपेक्षा आहे. अन्न वस्त्र निवारा आणि शिक्षण माझ्या लेकरांना मिळावे हीच इच्छा !. लोकांपर्यंत हे कार्य पोहोचावे आणि त्याद्वारे अव्याहत मदत होत राहावी हीच आणि त्याच साठी माझी तडफड आहे.


जर कोणाला मदत करायची असेल तर खालील बँक खात्यावर मदत पाठवू शकता

IDBI Bank , Hadapsar Branch.Pune 28.

Sanmati Bal Niketan

A/C No. 102104000077288

IFSC-IBKL0000102.



# केल्याने देशाटन



**संध्या नरगुंद**

समजायला लागल्यापासून भारत हेच माझं जग होतं. आपण भारतातच रहाणार याविषयी काही शंका देखील मनात नव्हती. त्या वेळी फौरीनला जाण हे फारच कमी लोकांच्या नशिबी असायचं. बहुदा कोणी गेलच तर वर्षानुवर्ष परत येत नसत. त्यामुळे सर्वसामान्य मुलांची झेप भारतापुरतीच मर्यादीत होती. इतकच काय आमच्या शेजारी राहणाऱ्या काकांची मुंबईहून चेन्नईला बदली झाली तरी आम्हाला त्याचे फारच अप्रूप वाटले होते. काकू तर पार खचून गेल्या होत्या. नवीन भाषा, नवीन गाव यामध्ये कसा निभाव लागणार ही काळजी लागून राहिली होती. पण हळुहळू जग जवळ येत होत आणि भारत सोडून जाणार्यांची संख्याही वाढू लागली होती. भारत सोडून जाणारे अधून मधून भारतात परत येत आणि मग त्यांचा थाट, रुबाब आणि एकंदरीत राहणीमान पाहून भारत फारच मागे राहिला आहे अशी जाणीव हमखास होत असे.

अशाच परिस्थितीत अचानक आमचाही परदेशी जायचा नंबर लागला आणि पहिल्यांदाच भारताच्या बाहेर पाऊल पडले. अर्थातच मग भारतातील अस्वच्छता, भ्रष्टाचार, अर्थ व्यवस्था इत्यादी गोष्टींवर टीका करायचा हक्कच प्राप्त झाला. सिंगापूर मधील सुविधा, आर्थिक धोरणे, सुखसोयी अशा अनेक बाबतीत भारत फार मागे आहे याची अधिक तीव्रतेने जाणीव होऊ लागली आणि कदाचित ही समजूत कायमच राहिली असती जर कामानिमित्त मी इतर अनेक देशात गेले नसते तर. केल्याने देशाटन येते शहाणपण अस म्हणतात आणि एका दृष्टीने मला ते पटले आणि त्याचे महत्वाच कारण होते माझी

पाकिस्तान आणी बांगलादेश भेट!

खर तर मी पाकिस्तानला जाईन अस स्वप्नातही कधी वाटल नव्हतं. पण कामानिमित्त जाण्याची संधी मिळाली आणि एका आवेशात ती घेण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी फार विचार केला असता तर कदाचित मी गेलेच नसते आणि निश्चितच एका अत्यंत रोमांचकारक अनुभवला मुकले असते. सुदैवाने विसा व इतर गोष्टींनाही विशेष त्रास झाला नाही आणि जास्त विचार करायला वेळच न मिळाल्याने निर्णय बदलायला अवधीच मिळाला नाही. १२ दिवसांच्या काळात अर्थातच फार काही अनुभवणे शक्य नाहीच. पण जो अनुभव मला आला तोच आपल्यासमोर मांडत आहे.

बांगलादेशला जाणे त्या मानाने फारच सोपे होते. न विसाला त्रास होता ना पाकिस्तानला जाण्याइतकी भीती, त्यामुळे हा दौरा तसा सोपा होता.

भारत, पाकिस्तान, बांगलादेश खरतर एकेकाळी एकाच देशाचे तीन भाग होते आणि आज इतक्या




वर्षानंतर जेव्हां या तीनही देशांची तुलना केली तर निश्चितच 'मेरा भारत' खूप महान वाटतो. प्रगतीच्या ज्या वाटा भारताने अवलंबिल्या आणि ज्या मेहनतीने आणि जिद्दीने भारत देश पुढे आला हे मला प्रकर्षाने तेव्हांच जाणवले जेव्हां एकेकाळी भारताचा एक भाग असणाऱ्या या दोन देशांची परिस्थिती स्वत: बघितली.

या दोनही देशांच्या भेटीमागे उद्देश हा कामाचाच होता त्यामुळे तुलनाही त्याच अनुषंगाने झाली. खरतर तुलना करणे हा या लेखाचा उद्देशही नाही पण कळत नकळत अशी तुलना होणे स्वाभाविक आहे कारण अनेक गोष्टीमध्ये या तीनही देशात साम्यही खूपच आहे.




पाकिस्तान .... नाव ऐकूनच मनात भीती वाटते ना? कराची विमानतळावर विमान हळुहळू उतरत होते आणि माझा जीव मात्र वरवर येऊ लागला होत. विमानातच आजूबाजूला सगळे पाकिस्तानी पाहून थोडी हुरहूर लागली होती. आपण भारतीय आहोत हे सहसा कोणाला कळू नये अशा तऱ्हेचा पेहराव केला असला तरी केवळ विमानातच नव्हे तर प्रत्येक ठिकाणी एका सेकंदात मी भारतीय आहे हे त्यांना लगेच कळत असे. मात्र त्यावर त्यांची प्रतिक्रिया मात्र अगदी अनपेक्षीत होती. फक्त विमानतळावरील इमिग्रेशन अधिकारी सोडले तर प्रत्येक ठिकाणी माझं स्वागतच झालं. सुरवातीला वाटणारी भीती त्यामुळे लवकरच अगदी कमी झाली आणि मग मी भारतातून आली आहे हे न बिचकता सांगू लागले

अनेकांना खूप कौतुक वाटले की एकटी महिला पाकिस्तान सारख्या देशात येते. 'ये तो सिर्फ इंडिअन ही कर सकते है !' अशी प्रतिक्रिया ऐकली की छान वाटे. कामानिमित्त मी या १०-१२ दिवसात कराची व लाहोर या शहरातील अनेक खाजगी कचेऱ्या,

विद्यापीठे, सरकारी कचेऱ्याना भेटी दिल्या. एकंदरीत परिस्थिती १५ वर्षांपूर्वी भारत जसा होता तशी म्हणता येइल. अपुऱ्या व्यवस्था, अपुरे फंड यामुळे आधुनिक उपकरणे आणि इतर आवश्यक साधनांचा अभाव प्रत्येक ठिकाणी दिसत होता. अनेक पाकिस्तानी संशोधक परदेशात शिकून केवळ आपल्या देशासाठी काही करावं या हेतूने परत आले आहेत मात्र इथे करण्यासाठी न प्रोजेक्ट्स मिळतात, ना प्रोजेक्ट्स साठी लागणारे फंड्स! एकंदरीत डळमळीत अर्थव्यवस्थेमुळे बाहेरील देशातील कंपनीज देखील collaboration करायला तयार होत नाही. हे सर्व बघितल्यावर भारताचे चित्र निश्चितच खूप आशादायी वाटे. सुरक्षितता म्हणजे नेमक काय हे मला कराचीला जाऊनच कळले. पावला पावलावर जिथे बंदुकधारी



सर्रास फिरत असतात, TV वर तर केवळ बॉम्ब हल्ले आणि गन फायरिंगच्या बातम्या सतत चालू असतात आणि बाहेर मात्र तशातही सामान्य जनजीवन सुरळीत [?] चालू असते.




ढाका, बांगलादेशची राजधानी इथेही परिस्थिती फारशी वेगळी नाही. ढाका मध्ये प्रत्येक गाडीला ड्रायव्हर असणे जवळपास अनिवार्य आहे याचे मला आश्चर्य वाटले. चौकशी केली असता असे कळले की चालक नसलेली गाडी पार्किंग मध्ये २ तासापेक्षा जास्त राहिली तर नक्कीच चोरीला जाणार ही खात्री असल्याने ड्रायव्हर ही चैन नसून गरज आहे. अर्थात बेकारी आणि गरिबी यामुळे चालक मिळणे आणि ठेवणेही सोपे आहे ही गोष्ट वेगळी.

ढाका मध्ये प्रथमत: नजरेत भरते ती प्रचंड लोकसंख्या, गरिबी आणि अत्यंत अस्वच्छता. मुख्य शहरांचे हे हाल आहेत तर गावांमध्ये काय परिस्थिती असेल याचा विचारच नाही करता येत. खचाखच भरलेल्या बसेस,



टपावर, खिडकीवर जिथे जागा मिळेल तिथे चिकटलेले लोक बघून माझ्या मनात एकाच विचार आला की इतकी धडपड आणि क्रांती करून स्वतंत्र देश बनवून यांनी नेमक साध्य काय केल? अगदी अलीकडे म्हणजे गेल्या १० वर्षात भारताने केलेली प्रगती मला अचानक खूप प्रकर्षाने जाणवली. विज्ञान, IT , औद्योगिक, तांत्रिक, कुठे नाही आहे भारत? आणि नेमकी अशीच प्रतिक्रिया मला या दोनही देशात मिळाली. जितक्या लोकांशी मी बोलले त्यापैकी ९०% लोकांना भारत, भारतीय आणि त्यांच्या क्षमतेविषयी प्रचंड आदर दिसला. बांगलादेश तर अनेक क्षेत्रात भारताच्या पावलावर पाऊल टाकून पुढे येण्याचा प्रयत्न करत आहे. गेल्या २-३ वर्षात राजकीय स्थैर्यता

आणि योग्य धोरणे अवलंबिल्याने बांगलादेश निश्चितच प्रगती करत आहे. कामानिमित्त तेथील काही औषधी कंपन्यांना भेटण्याचा योग आला आणि एकंदरीत त्यांचे लक्ष्यही भारतासारखेच आहे हे सहज समजून येते.

भारत, पाकिस्तान आणि बांगला या देशांमध्ये काही बाबतीत प्रचंड समानता दिस्ते. सर्वप्रथम आर्थिक विषमता अर्थात अत्यंत गरीब आणि अत्यंत श्रीमंत यामध्ये असलेली दरी, जी भारतातही आहे आणि जी झपाट्याने वाढत आहे तीच या दोनही देशात तितक्याच प्रमाणात दिसून येते यामुळे एकीकडे हलाखीची गरिबी आणि दुसरीकडे कुबेरपुत्रांची रेलचेल हे दृष्य सारखेच आहे. अर्थात यावर उपायही कोणाकडे नाही

क्रिकेटप्रेम ही एक अनोखी समानता मला फारच भावली त्यातही उल्लेखनीय वाटले ते 'सचिन तेंडूलकर' वरचे प्रेम व आदर. पाकिस्तान दौर्याच्या वेळी 'वर्ल्ड कप' चा मौसम होता. सचिनचा बहुदा शेवटचा 'वर्ल्ड कप' असणार हे माहीत असल्याने अनेक कट्टर पाकिस्तानी लोकांनी 'ये 'वर्ल्ड कप' इंडिया ने जितना चाहिये सिर्फ सचिन के लिये' अस आवर्जून सांगितलं तेव्हा मनात ज्या भावना होत्या त्या शब्दात व्यक्त करणे शक्यच नाही. अर्थात सचिन सोडता इतर वेळी मात्र भारत-पाक सामना हा युद्ध पातळीवर बघितला जतो. गल्लोगल्ली TV च्या दुकानांसमोर जमलेली गर्दी, हॉटेलात, दुकानात सर्वत्र चालू असलेले क्रिकेट अगदी मुंबईचीच आठवण करून देत होती.



ढाका मध्ये देखील सचिन ची Bating असेल तेव्हां रस्त्यावर शुकशुकाट असतो अस म्हणतात. माझ्या ढाका भेटीत एक असाच क्रिकेटप्रेमी मला [मी सचिनच्याच गावाची असल्याने] खास भेटायला आला होता आणि अनेक किस्से ऐकवत होत. एकदा सचिनचे शतक जवळ आले असताना या 'सचिन fan ' ला आईचा फोन आला आणि नेमके सचिनचे शतक हुकले तेव्हांपासून त्याने आईला सचिन खेळत असताना फोन करायला सक्त मनाई केली आहे. हे ऐकून सचिनच्या लोकप्रियतेचा अंदाज तर आलाच आणि हेही जाणवलं की खर्या कलेला आणि कर्तृत्वाला कुठल्याच सीमारेषा विभागू शकत नाहीत.

क्रिकेट प्रमाणेच तीनही देशात कलेची आवडही कमालीचे साम्य दाखवते. पुन्हा एकदा 'bollywood' बाजी मारून जातो. पाकिस्तान मधील अनेक कलाकारांना भारतानी संधी दिली व आज ते कलाकार जगप्रसिद्ध झाले याची जाणीवही दिसून आली. पाकिस्तानी कलाकारंचे 'कॉमेडी टायमिंग' सुप्रसिद्ध आहेच. आणि त्याचा प्रत्यय सहसा बोलताना देखील येतो. अस्खलित उर्दू आणि त्याला मिश्किल विनोदी झालर असलेले बोलणे ही माझ्यासाठी मेजवानीच होती. तेथील वास्तव्यात रात्री हॉटेलमध्ये



रोज स्थानिक कलाकारांचे गाणे होत असे. बहुतेक सर्वच गाणी जुनी bollywood गीते असत पण या स्थानिक कलाकारांची प्रतिभा मात्र खूपच चांगल्या दर्जाची होती. दररोज नवीन चेहरा व नवीन आवाजाची मेजवानी ही पाकिस्तान भेटीत विशेष लक्षात राहीली.

त्यामानाने ढाकामध्ये हा अनुभव फारसा मिळाला नाही मात्र 'bollywood चे चाहते मात्र अगदी तसेच आहेत.

तिसरे आणि महत्वाचे साम्य अर्थातच खवय्येगिरी. तीनही देशात 'आधी पोटोबा मग विठोबा' ह्या म्हणीची प्रचिती येते. कराची आणि लाहोर मधील चाट,



अद्रकवाली चाय आणि पकोडे यांचा स्वाद अगदी भारताची आठवण करवणारा



तर ढाका मधील खास हिलसा मासे आणि मछारझोल एकदम आगळे. ढाका मधील हॉटेल मध्ये सकाळच्या नाष्ट्या सारखाच संध्याकाळी देखील नाश्ता उपलब्ध असतो. कुतूहल म्हणून मी पाहायला गेले आणि गरम गरम पकोडे, काही स्थानिक पदार्थ, वाफाळलेला चहा आणि जिलबीचा येथेच्छ समाचार घेऊनच आले. मेहमान नवाझी ही देखील दोन्ही देशात खूप जास्त अनुभवली. दुर्दैवाने अलीकडे भारतातच याचा अभाव आढळू लागला आहे.



अर्थात माझी ही भेट अगदी सामान्य पातळीवरची असल्याने यात कुठलाही राजकीय, सामाजिक दबाव नव्हता याचमुळे मला सामान्य जीवन आणि सामान्य जनतेशी बोलता आले आणि एक गोष्ट नक्की जाणवली की सामान्य माणसाला न हे वैर जाणवते नाही त्यांच्या मनात काही वितुष्ट आहे. पाकिस्तानमध्ये तर सामान्य जनतेल खरी गरज कशाची असेल तर ती आहे सामान्य आणि सुरक्षित जगण्याची. भारत हा त्यांचा आदर्श आहे हे सांगणे महत्वाचे वाटते .

हे तीन देश विभागले गेले नसते तर काय झाले असते हा विचार करणे अशक्य आहे आणि त्याची गरजही नाही मात्र विभागले जाऊनही कित्येक गोष्टीत कमालीचे साम्य दाखवणारे हे तीन देश मला मात्र जगाकडे बघण्याचा एक नवीन दृष्टीकोण देऊन गेले.

# माझा गाव, माझा देश, माझे विश्व



**प्रकाश मोराणकर**



आज, अतिशय रम्य अशा सायंकाळी, मॅकरिची येथे निसर्गाचा आनंद घेत बसलो होतो. आकाशाकडे बघता बघता मनाने गावाकडे धाव कधी घेतली हे कळालेच नाही. मन बालपणीच्या आठवणींना उजाळा देत होते.

नदीकिनारी बसलेले माझे छोटेसे गाव. वडील नोकरीसाठी मुंबईला आले आणि गाव सुटले. बालपणीच्या सर्व आठवणी मनात तरंगत होत्या. शाळेला सुटी कधी सुरू होते आणि गावी कधी जातो असे कायम वाटत असे. गावाच्या ओढयाने मन आनंदी होत असे.





शाळेला सुटी सुरू होताच मी गावी पळत असे. रेल्वे स्टेशनवर आजोबा, आते भाऊ, बहीण इत्यादी मंडळी हजर असत. बैलगाडी व माझी आवडती खिल्लारी जोडी स्टेशनवर तयार असे. बैलगाडीत बसण्यासाठी मन अगदी बेचैन असायचे.

पळत पळत जाऊन बैलगाडीत बसायचे आणि गावाचा रस्ता धरायचा.

घरी पोहोचल्यावर प्रथम आंब्यानी भरलेल्या खोलीत जायचे आणि पाहिजे तेवढे आंबे घ्यायचे. आवडता खाऊ तयार असायचा. तो खाता खाता आणि गप्पा मारत मारत उद्याचा कार्यक्रम ठरवायचा. सकाळी उठून नदीवर पोहायला जायचे, न्याहरी (नाश्ता) करून शेतात जायचे, भरपूर खेळायचे - अशा भरगच्च कार्यक्रमाची आखणी करायची.

जेवण करायचे आणि अंगणात खाटेवर गप्पा मारत बसायचे - मुंबईला सर्व कसे आहे, शाळेतल्या गमती जंमती, सुटीत कुठे कुठे जायचे, वगैरे वगैरे गप्पा रंगत असत. गप्पा मारता मारता खाटेवर लोळायचे आणि चांदण्या मोजत मोजत डोळा कधी लागायचा ते कळायचेच नाही. रात्री बैलांच्या गळ्यातील घंटांचा आवाज, गुरांचा चारा खाण्याचा आवाज, शेणाचा दरवळणारा वास, जवळच्या मंदिरात चालू असलेल्या भजनाचा गोड स्वर अशा वातावरणात गाढ झोप लागायची. अशी झोप आजच्या वातानुकूलित बेडरूममध्येही लागत नाही.

रोज पहाटे गावातील महिला प्रभात फेरी करीत असत आणि संपूर्ण गावामध्ये अतिशय भक्तिमय वातावरण होत असे. मी मात्र गोधडी डोक्यावर ओढून खाटेवर लोळत पडायचो. मनाला वाटेल तेव्हा उठायचे आणि मग नदीवर जाऊन पोहायचे, खेळायचे. घरी परत आल्यावर न्याहरी करायची, भाजीभाकरीचे गाठोडे घ्यायचे आणि शेतात जायचे. बैलगाडीतून शेतात जाताना "मी गाडी हाकणार" असा हट्ट करायचा आणि दोर आपल्या हातात घ्यायचा. खरं तर बैल त्यांच्या रोजच्या वाटेवर आपोआपच चालायचे, पण मला उगाचच गाडी हाकण्याचा आनंद मिळायचा. सायंकाळी घरी आल्यावर "मी आज गाडी हाकली" असे ऐटीत सांगायचे. त्यावर कौतुकाने सर्व म्हणायचे "अरे, बैलगाडी काय हाकतो, आम्ही मुंबईला आल्यावर तू तुझ्या मोटार गाडीतून आम्हाला मुंबई दाखव." मी आपले "हो, हो, नक्की दाखवीन" असे म्हणायचो. योगायोगाने भविष्यात तसेच घडले याचे समाधान वाटते.

रोज संध्याकाळी गाय घरी परतायची आणि दारात येऊन उभी राहायची. तिला रोज स्वत:च्या हाताने भाकरी देण्यात विशेष आनंद मिळायचा. त्यानंतर ती आपल्या जागेवर जात असे. तिथे तिला बांधून, चारा घालून, मग दूध काढायचे. मला ते जमत नसे पण उगाचच मधे मधे लुडबूड करण्यात वेगळा आनंद मिळत असे.

आजूबाजूच्या खेडयांवर आठवडयाचा बाजार भरत असे. त्या खेडयांवर बैलगाडीतून ज्वारी, बाजरी, आंबे, केळी इत्यादि सामान न्यायचे व ते विकून रात्री परत यायचे. त्या त्या खेडयातील प्रसिध्द खाऊ खायचा व मजा करायची.



" कुठेतरी फिरायला जाऊ या" असे म्हटले की आमची सहल ‘पद्मालय’ येथे जायची. तेथे एक सुंदर तळे व गणपती मंदिर आहे. याच ठिकाणी ‘बालकवी ठोमरे’ तळ्यात पाय सोडून बसायचे आणि या सुंदर व शांत ठिकाणी त्यांनी अनेक कविता केल्या आहेत. घरून बांधून नेलेल्या दशम्या, भाजी, ताजे लोणचे इत्यादि खायचे व खूप खेळायचे. या सहलीच्या आठवणींनी मन अजूनही फुलून येते.

गोट्या, भोवरा, विटीदांडू, लगोरी, इत्यादि खेळ खेळत खेळत दिवस कसे जायचे व सुट्टी कधी संपायची ते कळायचेच नाही. वडील घ्यायला आले की त्यांना भेटण्याचा आनंद होत असे. पण त्याचबरोबर "आता मुंबईला परत जायचे, पुन्हा शाळेत जाण्याचे संकट" इत्यादि विचारांनी मन खट्टू होत असे.

संपूर्ण गावातील माणसांचे नि:स्वार्थी प्रेम, लाड, तो जिव्हाळा, ते आपलेपण हे सर्व आजच्या काळात कुठे हरवले आहे असा प्रश्न नेहमी पडतो व मन उदास होते.

वडिलांच्या नोकरीमुळे गाव सुटले, आपल्या नोकरीमुळे देश सुटला या विचाराने मन खिन्न होते. पण महाराष्ट्र मंडळ, सिंगापूर हे आपल्या विविध उपक्रमातून या आठवणी ताज्या ठेवते व आपली संस्कृती जपण्याचे प्रशंसनीय कार्य करीत आहे.

वसुधैव कुटूंबकम् - हे विश्वची माझे घर हे कितीही सत्य असले तरी गावाचा ओढा तो निराळाच…

अचानक मोबाइल वाजतो, मन भानावर येते आणि पावले वर्तमान काळात चालायला लागतात…

# काठावरची कविता



कौस्तुभ पटवर्धन

समोरच्या जलाशयात

चैतन्याचा जल्लोष चालू असताना

स्वतःच्या सावलीत सुखावलेला मी

हा असा काठावर ठणठणीत कोरडा

काठावरून ऐकू येणारी

लाटांची खळखळ साद घालतीये

येऊन अलिंगन देण्याची

सार्द्र होण्याची

मधेच एखादी लाट माझ्या काठापर्यंत येऊन

हात धरून घेऊन जाण्यास

पुढाकारही घेतीये.

पण मी माझे हात सोडाच

पायही उचलून बसलोय काठावर

ओलाव्याशी अलिप्त राहून

ती समोरची ओली माती

माझ्या पायांचे ठसे तिच्यात

उमटवण्यास खुणावतीये,

म्हणतीये, " ये, कितीही पायदळी

तुडवलंस तरी मी मऊ होऊन बिलगेन

तुझ्या पायांना, ये"

आणि मला हेच नकोय.

जलाशयातल्या जल्लोषात सामील व्हायला

माझी ना नाहीच्चे  मुळी.

पण काठावर परतताना

पायांना लागणारे, सलगी करून बसणारे

ते मृत्तिकाकण मला सलत राहतात


कितीही झटकून टाकलं तरी सोबत करतात,

इतस्ततः विखुरतात, मधेमधे टोचत राहतात,

आठवण करून देतात जल्लोषाची.

म्हणूनच मी असा ठणठणीत कोरडाच काठावर

पाय कोरडे ठेवण्यासाठी आणि मनही.



# दंतयात्रा - पूर्वांचलची



डॉ.प्रतिभा आठवले



**मी** हिमालयाच्या खूप प्रेमात आहे. गेली कैक वर्षे हिमालयात ट्रेकिंग करते आहे पण तरीही माझ्यासाठी त्याचे आकर्षण कमी झालेले नाही.

१९९५ मध्ये मी कैलास मानस सरोवराला गेले होते, तेंव्हा मी एकटीच वैद्यकीय क्षेत्रातली होते. रोज संध्याकाळी जेंव्हा "ठय" पहाडावरील कॅम्प साईटवर पोचत असे तेंव्हा मी तिथे जाण्याआधीच आमचे घोडेवाले, पोर्टर्स तिथल्या जवळच्या वस्तीतल्या लोकांना, BSF किंवा आर्मीच्या जवानांना " batch मध्ये डॉक्टर आहे " अशी माहिती देत असत. त्यामुळे ती मंडळी माझ्याकडे सर्दी- ताप- खोकला - पोटदुखी इ. तक्रारींसाठी औषध घ्यायला येत असत.

त्यांना औषधोपचार करताना माझ्या लक्षात आलं की आपल्या देशाच्या सीमेवरील उंच पहाडावर राहणाऱ्या लोकांच्या मुलभूत गरजाही पूर्ण होऊ शकत नाही. विशेषतः वैद्यकीय सुविधांपासून तर ते वंचितच राहतात. तेंव्हा मला जाणवलं की या दुर्गम भागातील लोकांसाठी आपण काही केलं तर आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग योग्य ठिकाणी होईल. माझे वडील मला नेहमी म्हणायचे - You can serve your nation through your own profession. मला विचार करत असताना एका दिवस माझा मार्ग सापडला.





२००० सालापसून भारताच्या अतिपूर्वेकडील दुर्गम आणि दुर्लक्षित अशा पूर्वांचलातील अरुणाचलला विवेकानंद केंद्राच्या शाळेतील मुलांसाठी "डेंटल कॅम्प" घ्यायला सुरुवात केली. त्यांनतर विद्यार्थी परिषदा आणि सेवाभारतीच्या साहाय्याने पूर्वांचलातील इतर सगळयाच राज्यांमध्येही (म्हणजे आसाम, मेघालय, मणिपूर, नागालेंड, मिझोराम, त्रिपुरा) डेंटल कॅम्प्स घ्यायला लागले. गेली १४ वर्ष सातत्याने दिवाळीच्या सुमारास २१ दिवसांसाठी स्वखर्चाने हे कॅम्प्स मी घेते आहे.

मला पूर्वांचलालाच जाऊन काम करावंसं वाटलं कारण पूर्वांचल हा नैसर्गिक आपत्तींबरोबर मानवनिर्मित आपत्तींनाही तोंड देत आहे. चीन, बर्मा, बांगलादेश आणि भूतान अशा चार राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय सीमा लाभलेला हा पूर्वांचल उर्वरित भारताशी केवळ २० कि.मी. च्या "सिलीगुडी ग्रीवा" या चिंचोळ्या पट्टीने जोडला आहे ज्याला "चिकन नेक" असंही म्हणतात. जर ही चिकन नेक आवळली गेली तर पूर्वांचल भारतापासून तुटायला वेळ लागणार नाही.



स्वातंत्र्यानंतर यावर संरक्षणाच्या दृष्टीने काही उपाययोजना केली गेली नाही. पहाडी भाग, घनदाट जंगलं आणि ब्रह्मपुत्रा पार करून लांबवर पसरलेली ही सरहद्द ओलांडून आतंकवादी घुसखोरी करत आहेत आणि आपल्या भूमीवर कब्जाही करत आहेत.



पूर्वांचल म्हंटलं की डोळयासमोर येतो नेहेमी कोसळणारा पाऊस आणि ब्रह्मपुत्रेचा विनाशक पूर. भारतातील हा सर्वात मोठा २५०० कि.मी. नद ("नदी" नव्हे ) आहे. त्याच्या विशाल पात्रात अमाप जलसंपदा आणि सर्व जलचर प्राणी आहेत. त्याच्या बदलत्या पात्रामुळे त्यावर पुल बांधणे शक्य होत नाही. त्यामुळे फेरबोटींचा उपयोग नदी पार करण्यासाठी करावा लागतो. इथली घनदाट जंगले, साग-बांबूची वने, भातशेती, विविध वृक्षवल्ली, ऑर्किड्स, पानं-फुलं-फळं-





पक्षी यांनी नटलेली आहेत.

एकशिंगी गेंडे, हत्ती, वाघ, चित्ते असे वन्य प्राणीही इथल्या जंगलात आढळतात.

पूर्वांचल ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी ही अरुणाचलची. अर्जुनपत्नी उलूपी आणि भीमाची पत्नी हिडींबा ह्या नागलेंडच्या. प्रमिला मेघालयची तर चित्रांगदा ही मणिपूरची! श्रीरामाचे गुरु वशिष्ठ यांचा आश्रम आसाम मध्ये आहे तर ५१ शक्तिपीठांपैकी एक कामाख्या आसाम मध्ये आहे. उषा आणि अनिरुद्ध यांचा गांधर्व विवाह आसाम मधेच झाला. संपूर्ण पूर्वांचलमध्ये कितीतरी जागी केलेल्या उत्खननांमध्ये मंदिरे, राजवाडे यांचे भग्नावशेष सापडले आहेत. पूर्वांचलाला निसर्गाने मुक्तहस्ताने अमाप सौंदर्य बहाल केले आहे. अरुणाचल



मधले तवांग हे बर्फाच्छादित हिमशिखरांनी वेढलेले आहे तर परशुरामकुंड ब्रह्मपुत्रेच्या निळ्याशार मखरात आहे. आसामच्या काझीरंगा जंगलात एकशिंगी गेंडे आहेत तर आशिया खंडातील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे बेट - माजुली - हे पण आसाम मध्ये आहे. मणिपूरच्या लोकताक सरोवरात "तरंगती शेती" पाहायला मिळते तर नागलेंड मध्ये वेगळ्याच पद्धतीची नागा घरं बघायला मिळतात. त्रिपुरामध्ये पिलक आणि उनाकोटिला भव्य दगडांवर कोरीव काम बघायला मिळते. मिझोरामच्या निळ्या पहाडांमध्ये अडकलेल्या ढगांचा समुद्र उसळलेला दिसतो. मेघालयातील शिलॉंग हे सरोवर आणि धबधब्यांनी नटलेले आहे, तर चेरापुंजीला चुनखाडीच्या



गूढ गुंफा आहेत. चेरापुंजीजवळ शोरा नदीवर १५० वर्षांपूर्वी खासी जमातीच्या लोकांनी तयार केलेला "living Root Bridge" म्हणजे कल्पकतेची जणू उंच भरारी आहे. झाडांच्या मुळांपासून बनवलेला हा पूल इतका मजबूत आहे की १५० वर्ष झाली तरीही तसाच आहे, माणसं तर पुलावरून ये-जा करतातच पण हत्तीही जा-ये करतात.



पूर्वांचलाच्या या सात राज्यांची स्वतःची अशी वेगळी संस्कृती आणि परंपरा आहे. जवळ जवळ १५० जनजातीचे वनवासी लोक येथील जंगलातून रहात आहे. त्या सगळयांच्या भाषा, वेशभूषा, संगीत, अलंकार, उत्सव,



चालीरीती, पद्धती यांच्यातील वैविध्य अप्रतिम आहे. सरळ, साध्या कमी गरजा असलेल्या आणि अल्पसंतुष्ट अशा या लोकांची चेहेरेपट्टी मंगोलियन छाप आहे. त्यामुळे भारतातील इतर राज्यातील लोक त्यांना चीनी-नेपाळी (चिंकी) समजतात आणि हे त्यांचे फार मोठे दु:ख आहे.

हे सगळं वाचल्यावर तुम्हाला वाटेल की या डॉ. तिथे दरवर्षी "सेवा" करायला का जातात? मी आधी सांगितलं तसं पूर्वांचल हा उंच पहाड आणि खोल दर्यांनी व्याप्त आहे. रेल्वेची शंभरी उलटली तरी आसाम शिवाय रेल्वे कुठेही नाही. नैसर्गिक आपत्तींमुळे या भागाचा बऱ्याच वेळा उर्वरित भारताशी संपर्क तुटतो.



अजूनही विजेचा अभाव, शिक्षणाची सोय नसणे, गरीबी यामुळे हा प्रदेश मागासलेलाच राहिला आहे.

प्रायमरी हेल्थ सेंटर्स खूपच कमी. डॉक्टर्स फारसे नाहीत. शिवाय मेडिकल स्टोरची पण कमतरता आहे. जेमतेम २-३ मेडिकल स्टोर्स आणि एकच डेंटल कॉलेज या साती राज्यांना मिळून आहे. तेंव्हा विचार करा कोणी आजारी असेल तर ब्रह्मपुत्रा पार करून, डोंगर-दऱ्या ओलांडून डॉक्टरापर्यंत पोहोचणं किती अवघड आहे. शिवाय गरोदर महिला, लहान मुलं -वृद्ध यांचे हाल विचारूच नका. त्यात भर म्हणजे वारंवार होणारे बॉम्ब ब्लास्ट्स, दंगली, आतंकवादींचे अत्याचार, त्याला विरोध म्हणून पाळले जाणारे बंद ... प्रजा खरोखर त्रस्त झाली आहे. यावर कळस म्हणजे भ्रष्टाचार! Central Govt.कडून मिळणारी मदत त्यांच्या पर्यंत पोचतच नाही.

अशा अनेक कारणांमुळे तिथे जाऊन काम करण्यासाठी मी उद्युक्त झाले. मी डेंटल सर्जन असल्यामुळे फक्त चेक करून औषध देणे हे शक्य नव्हते आणि आधीच तिथे औषधं मिळत नाहीत आणि मिळाली तरी "dental Treatment" त्यांना मिळणारच नाही. म्हणून मी माझ्या पहिल्या visit मध्ये (सन २०००) औषधं तर नेलीच शिवाय माझ्या दवाखान्यातली काही इन्स्ट्रुमेण्ट्स - compressor extraction, forceps, scalers - घेऊन गेले आणि नंतर तिथेच ठेवली.


हळू हळू माझ्या कामाविषयी माझ्या मित्र मंडळीना समजत गेलं आणि त्यांनीही मदतीचा हात पुढे केला. दर वर्षी थोडी थोडी इन्स्ट्रुमेण्ट्स नेत गेले.



Folding light, spiton, इतर सामुग्रीही नेली. एका वर्षी डेंटल चेअर पण नेली. चेअरचे वेगवेगळे पार्टस केले आणि ब्रेक व्हेन मध्ये घालून गोहत्तीला नेले. तिथे पुन्हा ते सर्व पार्टस स्वतः जोडून चेअर तयार केली. खरंच एक वेगळाच रोमांचक अनुभव होता तो!

मी जेंव्हा तिथे जाते तेंव्हा सेवाभारती तर्फे मला एक मेडिकल व्हेन, चालक आणि मदतनीस देण्यात येतो. त्यांच्या बरोबर सुमो-बोलेरोमध्ये गप्पा मारत मारत

मी कॅम्प पर्यंतचा प्रवास करते. तिथे तास दोन तासात एखाद्या रूम मध्ये मी माझे make shift clinic उभे करते. साधारणपणे प्रत्येक कॅम्पच्या गावी ३-४ दिवस असते आणि मग पुन्हा आमची गाडी दुसऱ्या कॅम्प साठी प्रस्थान करते.




या कॅम्पच्या वेळी स्थानिक लोकं मदत करतात. पुष्कळदा भाषेचा प्रश्न असतो. त्यावेळी कुणीतरी चुणचुणीत तोडकं-मोडकं हिंदी/इंग्लिश जाणणारा मुलगा दुभाषी म्हणून मदत करतो. तसेच काही उत्साही मुलंमुली पण मला माझी अवजारं साफ करायला, निर्जंतुक करायला, लाईट दाखवायला, पेशंटची नोंदणी करायला किंवा मी दिलेल्या सूचनेप्रमाणे औषधांचे डोस द्यायला मदत करतात. हे काम मी करत असले तरी हे टीम वर्क आहे आणि काम करताना त्यांच्या बरोबर मारलेल्या गप्पा हा एक आनंददायी अनुभव असतो. २१ दिवसाच्या माझ्या दौऱ्यानंतर परततांना आठवणींचा भरपूर साठा माझ्याबरोबर असतो.

हे कॅम्पस करत असताना वाटलं की जर एखाद्या टिकाणी कायम स्वरूपाचे डेंटल क्लिनिक स्थापन केले तर उर्वरित भारतातून अधून मधून डेंटिस्ट्सना बोलावून इथल्या लोकांना जास्त लाभ मिळू शकेल. म्हणून माझ्या जवळ तयार झालेला " डेंटल सेट अप "आम्ही मेघालयातील बरकोना इथे वसवला आणि सेवाभारती तर्फे दातांचा दवाखाना सुरु केला. त्यांनतर पुन्हा मी एक वजनाने हलका डेंटल सेट बनवला आणि माझे कॅम्पस घेणं चालू ठेवलं.

२०१२ मधे पूर्वांचलातील १२ वर्षांच्या अनुभवांवर आधारित असे माझे मराठी पुस्तकं "पूर्वरंग - हिमारंग" प्रकाशित झाले आणि या माझ्या पुस्तकाला वाचकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. त्यातून देणग्या आल्या आणि आम्ही २०१३ मधे आसाममध्ये ४ ठिकाणी आणि मणिपूर मधे १ अशी ५ कायमस्वरूपी डेंटल clinics चालू केली. सध्या तिथलेच स्थानिक डेंटल सर्जन तिथे जाऊन सेवा देत आहेत.

यंदा म्हणजे २०१४ मधे मी आसाम आणि मणिपूर मधे दोन डेंटल lab सुरु करीत आहे. त्यासाठी technicians ची आवश्यकता असल्यामुळे दोन आसामची मुलं आणि दोन मणिपूरच्या मुलींना मी अहमदाबादला बोलावलं आणि इथे त्यांना ट्रेनिंग देत आहे. या कामात उर्वरित भारतातील जनतेने सहभाग घ्यावा ही माझी इच्छा आहे. पूर्वांचल मधील बांधवांचा आपण विश्वास संपादून करून त्यांना उर्वरित भारताशी जोडणे गरजेचे आहे. पूर्वांचल हा भारताचा अविभाज्य भाग आहे याची जाणीव आपण ठेवणे आणि पूर्वांचल मधील जनतेला पण करून देणे ही काळाची गरज आहे. भारताची अखंडितता अबाधित राहण्यासाठी प्रत्येकाने सहभागी व्हावे आणि तुम्हाला शक्य असेल ती मदत पूर्वांचलींना जरूर करावी.

अशी आहे माझी दंतयात्रेची दंतकथा.

# माझं गाव, माझा देश, माझं विश्व



मेघना असेरकर

"ऋतुगंध"नी लेखाकरता दिलेलं हे शीर्षक इतकं इंटरेस्टिंग आहे की काय लिहू आणि काय नको असं झालं. माझं गाव म्हणाल तर मी पक्की पुणेकर. पुण्यनगरी, पुणे तिथे काय उणे, pensioners' paradise, विद्येचे माहेरघर अशा अनेक नावांनी ओळखलं जाणार पुणं. मी तिथेच लहानाची मोठी झाले, शिक्षण झालं. पुण्याचं शिक्षणाचा दर्जा उत्तम आहे. पुण्याचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे तिथे वाढलेल्या माणसाला बऱ्यापैकी आत्मविश्वास असतो. इतर कुठल्याही गावात किंवा देशात सहज राहता येईल असं कौशल्य पुणं त्याला नक्कीच देतं. "निंदकाचे घर असावे शेजारी" ही म्हण काही बाबतीत पुणेकरांना लागू पडते. अर्थातच मी हे चांगला गुण या अर्थी लिहिलंय.

कारण टीपिकल पुणेकर हे बोलायला स्पष्टवक्ते असतात. आपलं खरं मत द्यायला ते मागेपुढे पाहत नाहीत. अगदी साधी गोष्ट. माझ्या लहानपणापासूनच्या मित्रमैत्रिणी एखादा ड्रेस आवडला नाही किंवा परीक्षेत कमी मार्क पडले तर तोंडावर सांगत असत. खूपदा परप्रांतातल्या लोकांना पुणेकरांचा स्पष्टपणा हा



तितकासा आवडत नाही. पण मी मात्र त्याला पॉजीटिवली घेते कारण असं वाटतं की आपल्याला स्वतःत सुधारणा करायची असेल तर खोट्या स्तुती पेक्षा खरी टीका जास्त

महत्त्वाची ठरते.

माझ्या लहानपणचं प्रभात रोड, डेक्कन जिमखाना, एफ. सी. रोड, सदाशिव पेठ एवढ्यात मर्यादित असलेलं पुणं, आणि आत्ताचं पुणं ह्यात जमीन-



अस्मानाचा फरक झालाय. हिंजवडी आय. टी. पार्क, अनेक मोठ्या कंपन्या, industries आल्यानी पुण्याचं रूपच बदलून गेलंय. आता ते तितकं अस्सल मराठी शहर नसून बरंच कॉस्मोपॉलिटन झालंय. पूर्वीचं पुणं काही आता राहिलं नाही असं म्हणणाऱ्यांपैकी मी सुध्दा एक आहे. पुण्यात वाढलेल्या घराच्या किंमती ह्या वर तर एक वेगळा लेख लिहिता येईल. हे सगळं असूनही इतर शहरांच्या तुलनेमधे पुणं आजही स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि हिरवंगार आहे.




वैशाली, वाडेश्वर, जोशी वडापाव, तुळशीबाग, लक्ष्मी रोड इथे वर्षातून एकदा जरी चक्कर मारली तरी जी धमाल येते त्याचं वर्णन शब्दात करणं कठीण आहे. असं हे माझं पुणं! It is really close to my heart.

माझं सासर इंदोरचं असल्यामुळे लग्नानंतर खूप वर्ष इंदोरला राहण्याचा योग आला. तिथली "खाना



और खिलाना" ही संस्कृती खूप वर्षं एन्जॉय केली. अतिशय प्रेमळ लोकांचं शहर असलेलं इंदोर. आता सुटलं असलं तरी तिथले नातेवाईक आणी मित्रमैत्रिणी ह्यांच्या मुळे आत्ताही इंदोर खूप आपलंसं वाटतं.माझा देश म्हणाल तर "सारे जहाँ से अच्छा हिंदौस्ताँ हमारा" किंवा "East or West, India is the best" ह्या विचार धारणेची मी आहे. पण यजमानांच्या नोकरीच्या निमित्ताने गेली दहा वर्षं



आम्हाला दुबई आणि सिंगापूर ह्या दोन्ही देशात राहण्याचा योग आला. दोन देशांमधला संसार असं मी गमतीने म्हणते. हे दोन्ही देश सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय वेगळे आहेत. दुबई खूप glamorous



आहे. दुबई चे मॉल्स, डेझर्ट सफारी, बुर्ज खलीफा, बुर्ज अल अरब, दुबई shopping फेस्टिवल, तिथली ५ स्टार, ७ स्टार हॉटेल्स हे सर्व जगप्रसिद्ध आहे. तिथे वर्षभर प्रवासी असतात आणि खास shopping करता जगभरातून

लोक तिथे येतात. दुबईचे इलेक्ट्रॉनिक्स सामान, dry fruits, खजूर, कपडे, हे उत्तम दर्जा आणि योग्य किंमतीकरता प्रसिध्द आहे. दुबईला ७०% लोकसंख्या भारतीय आहे. आणि भारतापासून खूप जवळ असल्यानी (जेमतेम ३ तासांची direct flight) it's a home away from home. तिथल्या बरदुबई मधलं देऊळ आणि मीनाबाजार मधली दुकानं बघताना आपण दुसऱ्या देशात आहोत असं वाटतच नाही. दुबईला हिंदी भाषा जास्त बोलली जाते. It's a street



language. दुबईला जाण्याकरता थंडीचे दिवस उत्तम. कारण त्याच दिवसांमधे दुबई shopping फेस्टिवल असल्यानी दुबईला नवरीसारखं सजवलं जातं.

सिंगापूर मात्र मला मनापासून आवडतं. हा एक अतिशय स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित देश आहे. इथे तुम्ही कितीही वाजता आणि कुठेही भटकू शकता. ही गोष्ट युरोप, अमेरिकेत शक्य नाही. दुसऱ्या देशांमधलं गुन्हेगारीचं प्रमाण पाहता सिंगापूर खूपच सुरक्षित आहे. दुसरी इथली वाखाणण्याजोगी गोष्टं म्हणजे लोकांमधली शिस्त. कितीही मोठी रांग असली तरी लोकं शांतपणे उभे असतात. कधीही धक्काबुक्की किंवा ढकलणे प्रकार पाहिला नाही. इथल्या MRT आणि बसेस मधल्या priority seats, व्हील चेअर वाल्यांकरता वेगळी राखून ठेवलेली जागा ह्याचं जेवढं कौतुक करावं तेवढं कमी आहे. सिंगापूर कम्युनिटी क्लब, SG Cares, SINDA अशा अनेक संस्था इथे आपलं काम उत्तम रीतीनी करतात. सरकार इथे राहणाऱ्या लोकांना किती सोयी देते हे बघून छान वाटतं. आणि सिंगापूर महाराष्ट्र मंडळ ही संस्था मराठी लोकांना एकमेकांना भेटायची, सणवार साजरे करायची, उत्तम मराठी नाटकं - सिनेमे बघण्याची संधी पण देते. एकूण म्हणजे सिंगापूरला राहताना खऱ्या अर्थानी एका प्रगत देशात राहण्याचा आनंद मिळतो. हे शहर महाग असलं तरी सार्वजनिक वाहतूक उत्तम आहे. भरपूर भारतीय किराण्याची दुकानं, भारतीय restaurants आहेत. देवळं आहेत, Little India आहे. सर्व सणवार आपण उत्तम रीतीनी साजरे करू शकतो. त्यामुळे सिंगापूरला राहणं हा नक्कीच एक सुखद अनुभव आहे.



आता माझं विश्व म्हणाल तर एका गृहिणीकरता तिचं घर आणि कुटूंब हेच तिचं विश्वं असते. पण आपल्या ऊबदार घरट्यातली चिमणी पाखरं केंव्हा मोठी होतात आपल्याला कळतंच नाही. कारण तो काळ खूप लवकर निघून जातो. आता मुलगा अमेरिकेत, मुलगी बेंगलोरला. दोघांची लग्नं झालेली आणि आम्ही सिंगापूरला अशी त्रिस्थळी यात्रा आहे. पण त्यातही वेगळीच गंमत आहे. थोडंसं आपल्या कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून परदेशात राहण्याचा आनंद आगळाच आहे. नवीन जागेचे अनुभव, नव्या लोकांना भेटणे व प्रवास ह्याची भरपूर आवड असलेल्या

आमच्या कुटुंबामध्ये आम्ही ही संधी खूप एन्जॉय करतो. कारण प्रत्येक देशाचा, गावाचा वेगळाच चार्म असतो. तुम्ही आयुष्यात नवीन अनुभवातून जितकं शिकता ते कुठल्याच वर्गात शिकता येत नाही. त्यामुळे मला तर "हे विश्वची माझे घर" ही म्हण अगदी योग्य वाटते.

# माती



सुगम काळे

**मा**तीची ओढ किती चिवट असते ते जमीन सुटल्यावर लक्षात आलं

आत्ताच कानी पडलेल्या बातमीने मन गावच्या मातीला भेटायला गेलं

माझ्या गावच्या मातीचा रंग मूळचा म्हणे लाल होता

लाल दुमजली गाड्या धावताना डांबराखाली लपला होता

काळ्या डांबराने बघता बघता गावातून माती हद्दपार केली

माणसांची पावलं माती सोडून आकाशाकडे भरकटत गेली

लाल मातीशी फारकत घेतलेल्या काही पावलांना एक ठिपका दिसला

हा लाल ठिपका चीनी मातीच्या जवळ लहानग्या बेटावर वसला

लाल ठिपक्याला इतर जमिनींचा मनापासून दुस्वास करायची सवय

हजारो वर्षांचे मातीचे पाश कळायचा नाही पाचपोच, नाही प्रगल्भ वय

लाल ठिपक्यावर वेगात धावत होत्या परक्यांच्या शर्यतीच्या गाड्या

गावाच्या मातीत मात्र भन्नाट कल्पना रुजून फोफावत वर आल्या थोड्या

कल्पनांच्या पंखांवर बसून गावची मंडळी अवकाशात झेप घेती झाली

वर नाक केलेल्या लाल ठिपक्याला गोऱ्या मातीच्या नंतरच जाग आली

जाग आली तेव्हा लाल मातीने आभाळातल्या परग्रहावर नाते जोडले होते

माणशी चार पैशाच्या गंगाजळीतून अस्मानी स्वप्न भुईवर साकारले होते

बातमी ऐकताच ठिपका विसरून मन गावच्या वेशीवर जाऊन ठेपलं

मंगळाच्या नजरेच्या टप्प्यात शिरलंय अवकाश यान आपलं

सगळीकडे एकाच चर्चा अभिमानाच्या रित्या होती घागरी

पाय पुन्हा जमीन शोधत फिरू लागले ठिपक्यावरच्या घरी

ठिपक्या वरच्या उंच घराचा पाया तसा खुजा होता

लाल मातीचा आपलेपणा नसल्यामुळे खुपत होता

हजारो कोटी मैलावरच्या मातीशी सोयरिक जुळवत्येय माझी माती

मातीच्या गर्वाने भारून जाऊन दूर देशात फुगून आली छाती

माती आपलीच असते, आपल्या आईसारखी दुरूनही तितकीच जवळ

लाल ठिपका पायाखाली असूनही चपलेला आधारच काय तो केवळ .



# पेपर क्विलिंग



**कल्याणी शाळिग्राम**

'**क**ला' आपल्या आयुष्यात गोडी निर्माण करणारी असते. माणसाला आनंदी ठेवणारी असते. माणूस आनंदी असला की त्याला त्याचे काम व्यवस्थित करता येते वे त्यामुळे त्याची मानसिक व आर्थिक परिस्थिती उत्तम राहते. सर्वांनी कलागुण आत्मसात केले पाहिजेत असे मुळीच नाही, पण सौंदर्यदृष्टी निर्माण करून कलेचा आस्वाद तरी नक्कीच घेता आला पाहिजे. मग ती कला कोणतीही असो - गाणे, चित्रकला, स्वयंपाक, रांगोळी इ. आता रोजच्या आयुष्यातच बघान रेडिओ वरचे एखादे गाणे, पेपर मधील व्यंगचित्रे, छान मांडलेले खाद्यपदार्थ किंवा सजवलेली भेटवस्तू आपल्याला किती प्रसन्न करते, हो ना? ही सगळी कलेचीच तर रूपे आहेत!

अशाच विविध कलांमधील जगभर प्रसिद्ध झालेली कला म्हणजे पेपर क्विलिंग. कागद आणि डिंक अशा सामान्यपणे आढळणाऱ्या वस्तू वापरून, नाजूक व सुंदर नक्षी व ३D मॉडेल्स बनवायची ही कला. ही कला "पेपर फिलीग्री" या नावाने पण ओळखली जाते. Renaissance च्या दरम्यान फ्रान्स व इटली मधील साधविंनी या कलेला सुरुवात केली. पुस्तकांच्या कडेच्या पट्ट्या कापून, त्याची गुंडाळी करून बोटांनी नाजुक आकार द्यायला सुरुवात झाली. त्या काळातील इतर लोखंडात बनलेल्या कलाकृती बघून त्यांच्या प्रतिमा बनल्या. हळुहळू संपूर्ण युरोप व अमेरिकेत ही कला पसरली. पुरातन काळातील इजिप्त मध्ये क्विलिंगचा शोध लागला असावा अशा पण कथा आहेत. हळुहळू रंगीत कागद व सुयांचा वापर झाला

आणि कलेची विविधता वाढत गेली. धार्मिक पुस्तकांवर फुलांच्या नक्षीपासून सध्याच्या युगातील दागिने,fashionable purses व modern art murals असा लांबचा प्रवास क्विलिंगनी पार पाडला आहे. या प्रवासात ‘युलिया ब्रोद्स्काया’ या रुसच्या कलाकाराचे योगदान नक्कीच बघण्यासारखे आहे.

पुरातन काळात सोनेरी, चॉकलेटी व लाल रंगाचा वापर जास्त प्रमाणात होता. सध्या २००+ रंग बाजारात उपलब्ध आहेत. आधुनिक यंत्रणा वापरून २ ते १० mm च्या कागदी पट्ट्या सहजपणे कापल्या जात असल्यामुळे क्विल्लेर्सना काम करणे अगदी सोपे झाले आहे. या पट्ट्या निरनिराळ्या लांबीत कापून, क्विलिंग सुईच्या आधारे सहज गुंडाळी करता येतात. या वर्तुळाला विविध पद्धतीने नाजूक रित्या दाबून अनेक सुरेख आकार होऊ शकतात. मनात असलेले चित्र व रंगसंगती साधून कलात्मक पद्धतीने सर्व आकारांची रचना करून उत्तम कलाकृती बनू शकते. हो पण चिकाटी मात्र नक्कीच हवी! हल्ली बाजारात कागदासाठी अनेक प्रकारची द्रव्य सुद्धा उपलब्ध आहेत ज्याने कलाकृतीला अधिक ताकद मिळते व पाण्यापासूनही काहीप्रमात सौरक्षण होते.

पेपर क्विलिंगची लोकप्रियता वाढण्यामागे ४ प्रमुख कारणे आहेत - १) सहज उपलब्ध असणाऱ्या वस्तूंपासून निर्मिती २) अधिक जागेची आवश्यकता नाही ३) कुठल्याही प्रकारची कल्पना / चित्र यांना न्याय द्यायची क्षमता ४) सृजनशीलता व Motor Skills विकसित करायला प्रचंड वाव. अनेक वैद्यांचे असे म्हणणे आहे की आपल्या हातांच्या बोटांमधील बारीक स्नायू व पेशींचा वापर नाही झाला तर कालांतराने त्या बारीक बारीक कामे करणे विसरून जातील. आता त्या अनुशंगाने हस्तकलेचा वापर शाळांमध्ये वाढवला जात आहे. पेपर क्विलिंगच्या प्रसाराला याचा नक्कीच उपयोग होत आहे.

इतकी प्राचीनकालीन अदभुत आणि जगभरात प्रसिद्ध झालेल्या या कलेला सिंगापूर सारख्या देशात मात्र जास्त अनुयायी कसे मिळाले नाहीत हा प्रश्न मात्र अजून मला सुटला नाही.







# प्राचीन भारतीय संस्कृतीची जगव्याप्ती



निरंजन भाटे

**या** वेळच्या "ऋतुगंध" द्वैमासिकाच्या विषयावर विचार करत होतो - " माझा गाव, माझा देश, माझे विश्व".... आणि "हे विश्वची माझे घर."

चिंतन व संशोधन करता काही मुलभूत विचार सुचले आणि काही अतिशय ज्ञानरंजक माहिती मिळाली तीच आपल्यासमोर ठेवत आहे.

आपली भारतीय संस्कृती हीच "वसुधैव कुटुंबकम" म्हणजेच "हे विश्वची माझे घर" या संकल्पनेवर आधारलेली आहे. किंबहुना "भारत साऱ्या विश्वाचे घर" असं म्हणणं जास्त संयुक्तिक ठरेल.

पूर्व युरोप, मध्य आशिया, ग्रीस आणि आफ्रिका अशा विविध प्रांतांतून मानवसमूह भारतात स्थलांतरित झाले आणि त्यांनी भारत हीच आपली भूमी मानली. भारताच्या "सुजलाम सुफलाम" भूमीने सर्वांना प्रेमाने जवळ केलं आणि आपली जगावेगळी भारतीय संस्कृती जन्माला आली.

आपल्या भारतीय संस्कृतीचा मध्य आशिया, दक्षिण पूर्व आशिया, चीन, जपान, कोरिया अशा दूरदूरच्या देशांपर्यंत प्रसार झाला. या लेखांमधून मी आपल्याला हाच रंजक प्रवास घडवणार आहे.

मुख्य म्हणजे हा प्रसार कुठलेही राजकीय आक्रमण न करता झाला आणि अनेक वेळा देशोदेशींच्या राज्यकर्त्यांनीच भारतीय विद्वानांना आपल्या संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी निमंत्रण दिले असेही दिसून येते.

एक काळ असा होता की इतर देश आणि प्रदेशांबरोबर व्यापार हे भारतीयांच्या अर्थार्जनाचे व उपजीविकेचे एक मुख्य साधन होते असे दिसून येते. ख्रिस्तपूर्व ३०० ते १०० या काळापासून भारतीय व्यापारी पश्चिमेकडील आशियातील अरबस्तान, युरोपमधील रोम ते पूर्वेकडील चीनपर्यंत व्यापारासाठी ये-जा करीत असत.

कंबोडिया (कम्हुज किंवा कम्बोज), जावा (यव द्वीप), सुमात्रा आणि मलाया (मलेशिया) या ठिकाणी असलेल्या सोन्याच्या खाणी आणि त्यातून मिळणारे सोने हे मुख्य आकर्षण होते. त्यामुळेच या बेटांचा उल्लेख "सुवर्ण द्वीप" असा होत असे. हे व्यापारी काशी, मथुरा, उज्जयनी, प्रयाग आणि पाटलीपुत्र अशा त्याकाळच्या संपन्न शहरांतून येत असत आणि भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील मामल्लापुरम (तमिळनाडू), ताम्रलिप्ती (तामलूक - मेदिनीपूर पश्चिम बंगाल), पुरी (ओदिशा) आणि कावेरीपट्टणम (तमिळनाडू) या बंदरावरून जहाजांची वाहतूक होत असे. जिथे जिथे हे व्यापारी गेले तिथे तिथे त्यांनी भारतीय संस्कृतीची बीजे रोवली.

प्राचीन काळातील भारतीय विश्वविद्यालये ही सांस्कृतिक देवाण-घेवाणीची महत्त्वाची केंद्रे होती. या विश्वविद्यालयांमध्ये असलेल्या ग्रंथसंपदेमुळे देशोदेशींचे अभ्यासू आणि विद्वान येथे आकर्षित होत असत. नालंदा विश्वविद्यालयाचे ग्रंथालय ही सात मजल्यांची इमारत होती असे म्हंटले जाते.

अर्थात याबद्दल अतिगर्व करण्याची आपल्याला संधी नाही, कारण अशी विश्वविद्यालये इतर ठिकाणीही



उपलब्ध होती. ती म्हणजे प्लेटोनिक अकॅडमी (अथेन्स, ग्रीस) - स्थापना ख्रिस्तपूर्व ३४७ – लय ख्रिस्त पश्चात ५२९ (९१६ वर्षे), प्लेटोचा शिष्य अरीस्टोटल याने स्थापन केलेले पेरीपॅटेटिक स्कूल (अथेन्स) -ख्रिस्तपूर्व ३३५,



आलेक्झांड्रिया विश्वविद्यालय ही याची उदाहरणे आहेत. आलेक्झांड्रियाचे ग्रंथालय देखील असेच प्रचंड होते असे म्हणतात. हान राज्यकर्त्यांनी चीनमध्ये ख्रिस्तपश्चात ३०० मध्ये असेच राजविद्यालय चीनी शहर "ताई स्च (Tai xue)" येथे स्थापन केले होते. त्यापाठोपाठ कोरियामध्ये देखील ताएहाक (ख्रिस्त पश्चात ३७२) आणि गुकहाक (ख्रिस्त पश्चात ६८२) येथे देखील अशी विश्वविद्यालये स्थापन झाली होती. असेच विद्यापीठ इराणमधील गुंदिशापूर येथेही स्थापन झाले होते.

या सर्व विश्वविद्यालयांमधून तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, राज्यशास्त्र, स्थापत्यशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, विज्ञान, रसायनशास्त्र आणि वैद्यकशास्त्र अशा गहन विषयांवर अभ्यास आणि संशोधन चालत असे आणि अशा माहितीची देवाण-घेवाणही चालत असे. परंतु अशी ज्ञानकेंद्रे भारतात सर्वात जास्त प्रमाणात होती

ती म्हणजे - नालंदा (बिहार), तक्षशीला (सध्या पाकिस्तानात), विक्रमशीला (बिहार), वल्लभी (सौराष्ट्र), पुष्पगिरी (ओदिशा), ओदन्तपुरी (ओदिशा).

बिहार आणि ओदिशा - जी भारताची सन्माननीय ज्ञानकेंद्रे होती - ती आज भारतातील सर्वात मागास राज्ये म्हणून गणली जातात हा दैवदुर्विलासच म्हणावा लागेल नाही का?



प्रख्यात चीनी विद्वान ह्युऐन स्वंग याने आपल्या ज्ञानार्जनासाठी दोन ठिकाणी वास्तव्य केल्याचे नमूद केले आहे - नालंदा आणि वल्लभी.



विक्रमशीला हे असेच प्रसिद्ध विश्वविद्यालय. त्याचे विस्तृत वर्णन तत्कालीन तिबेटी अभ्यासू आणि विद्वान "तारानाथ" याने केले आहे. या विश्वविद्यालयातील शिक्षक आणि विद्वान इतके प्रसिद्ध होते की तिबेटच्या राजाने आपले अभ्यासू प्रतिनिधी विक्रमाशीलेला पाठवून भारतीय संस्कृती आणि ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विद्यापीठाच्या कुलगुरूंना आग्रहाचे निमंत्रण दिले. परंतु त्यांनी तसे केले नाही. अखेरीस तिबेटच्या राजाने नालंदा विद्यापीठाचे आचार्य कमलशील यांना निमंत्रण दिले आणि ते त्यांनी मान्य केले. ओदन्तपुरीचे विद्वान ज्ञानभद्र आणि त्यांचे दोन पुत्रदेखील तिबेटला स्थलांतरित झाले आणि त्यांनी ओदन्तपुरीच्या धर्तीवर ल्हासा येथील मठाची स्थापना केली.

नंतर अकराव्या शतकात बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली विक्रमशीला विद्यापीठाचे तत्कालीन प्राचार्य, आचार्य अतिश (किंवा दीपंकर श्रीज्ञान) तिबेटला गेले आणि त्यांनी तिबेटमध्ये बौद्ध धर्माची स्थापना केली. तिबेटचा मंत्री "थोन्मी संभुत" याने नालंदा विद्यापीठामध्ये शिक्षण घेतले आणि तिबेटमध्ये जाऊन बौद्ध धर्माचा प्रसार केला. तिबेटच्या राजाने देखील बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि बौद्ध धर्म राजधर्म म्हणून घोषित केला.

चीन आणि इतर देशांची कहाणी पुढच्या भागांमधून .....

("राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान" यांच्या पाठ्यक्रमावर आधारित)

# मातीची परिक्रमा



अजय मोकाशी

वेचूनी मातीचे अंश,

आप तेज वायू स्वरस,

ओतीले प्राण, जटील रचनेस,

आले सजीव आकारास.



धडपडती मग जगण्यास,

वाचविण्या शरीरास,

वरदान बुद्धीचे, खास,

मानीती खरा, आभास.

विद्या कला ज्ञान, घातले जन्मास,

'मी माझे' हा, वाढविला ध्यास,

मातीच्या मूर्तीत, मानीले देवास,

पूजीती कल्पना, अन पाषाणास,

केली शस्त्रास्त्रे विकसित,

लाविली बुद्धी पणास,

कुरघोड्या एकमेकांस,

भेदण्या, मातीच्या रुपांस.

माझी माती, तुझी माती, प्रत्येकास,

वाटून घेतले, महत्व आपणास

अधिक चांगली माती, देऊ पुढच्या पिढीस,

खटाटोप सारा, माती जमिविण्यास.

शब्दरूप आले, मज जाणीवेस,

अणुरूपे अंतरात, तोच करी वास,

हरविता प्राण अखेरीस,

मातीचे ढिगारे, मिळतील मातीस.

# माती- आपली आपली



अरुण मनोहर

ठरल्याप्रमाणे सकाळी आठ वाजता पंधरावीस प्रवाशांना घेऊन हो चि मिन्ह शहरातून बस तीस किलोमिटर अंतरावर असलेल्या चू ची टनेल्सकडे निघाली.



विएतनामच्या लढाईत अमेरिकन बॉम्ब वर्षावापासून बचाव करण्यासाठी विएतनामी सैनिकांनी हे बोगदे खणले होते. युद्धनितीसाठी अतिशय महत्वपूर्ण असा हा प्रदेश होता. कंबोडियात प्रवेश करायला, मेकॉंग नदीचा वापर करण्यास सोयीचा, आणि अमेरिकन्सच्या दबावातल्या राजधानी सायगावपासून जवळ. घनदाट जंगलांनी व्यापलेला हा प्रदेश. युद्धातले ह्या जागेचे महत्व ओळखून विएतनामींनी ह्या जंगलात १२० किमी लांबीचे जमिनीतल्या बोगद्यांचे जाळे खणले. त्यात राहून त्यांनी गनिमी कावा वापरून अमेरिकन्सला सळो की पळो करून सोडले होते. त्याच ह्या चू ची टनेल्स! आता शांततेच्या काळात विएतनामने ह्या ऐतिहासिक बोगद्यांचे जतन करून प्रवासी आकर्षण बनविले आहे.




त्या बघण्यासाठी म्हणून आजची ही ट्रीप होती.

चू ची

बोगद्यांची ट्रीप तर उत्तमच झाली. विएतनामच्या इतिहासातली क्लेशदायक पाने अचानक उलगडून आपण त्यात प्रवेश केल्यासारखे वाटले. छत्रपति शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्यापासून प्रेरणा घेऊन त्यावेळच्या विएतनाम लष्करी नेतृत्वाने ह्या बोगद्यांची योजना केली होते असे म्हणतात. उंदरांसारखे अंधा-या बिळांमधे लपून, वेळोवेळी बाहेर येऊन शत्रूला नामोहरम करणे हे ये-यागबाळयाचे काम नव्हे! ते देखील सतत होणा-या हवाई हल्ल्यांना चूकवीत . असे ऐकले होते की युद्ध जिंकल्यावर विएतनामची विदेश मंत्री भारतात आली होती. त्यावेळी तिने शिवाजी महाराजांच्या समाधीला भेट देण्याचा आग्रह केला. तिथली चार चिमूट माती कपाळाला स्पर्शून तिने पर्समधे ठेवली होती. विएतनामच्या मातीत अशा वीर पुरूषाची माती मिळवून असेच स्वदेशप्रेमी पराक्रमी वीर आमच्या मातीत देखील जन्माला येवो अशी मी प्रार्थना करीन असे तिचे उद्गार होते! चू ची बोगद्यांच्या मातीमधून फ़िरतांना, अमेरिकेसारख्या बलाढ्य ताकदीवर विजय मिळविणा-या युद्धामागे कुठेतरी छत्रपतिंची प्रेरणा देखील असेल, ह्याचा गर्व वाटला.

ग्रुपमधे फ़िरत असतांना सहप्रवाशांची टिप्पणी ऐकून कधी कधी नवीन आणि आश्चर्यकारक असे देखील अनुभव येतात. आपण जिथे जिथे जातो, तिथे फ़िरतांना आपल्या पायांना चिकटलेली माती कळत नकळत तिथे घेऊन जात असतो. त्या आपल्या मातीचा वास आपण अभावितपणे अवतीभोवती पसरवीत असतो. चू ची टनेल्सच्या ह्या ट्रीपमधे देखील दोन वेगळाले मृद्गंध अनुभवायला मिळाले.

****************************

अधूनमधून फ़ालतू कमेंट्स करणा-या दोघा तरुणांनी माझे लक्ष मधेच एकदा वेधून घेतले.

“अरे यार फ़ार बोर केले ह्या ट्रीपनी. दीड तास प्रवास करून काय बघायला मिळाले, तर जमिनीतले बोगदे!”

“आणि बोगदे देखील नाही, तर नुसती आत नेणारी भोके!”




“आंत खरंच बोगदे आहेत की नाही कुणास ठावूक!”

“आहेत नां! अगदी तीन मजले बोगदे आहेत! खोटे वाटत असेल तर हे चित्र पहा!”

“ हे! असले चित्र तर कोणीही बनवू शकतो!”

“आणि चित्र पहायला येवढे पैसे खर्च करून इथे उन्हात भाजायला कशाला यावे लोकांनी?” “हो ना गुगल केले की चू-ची चा-ची सगळ्या टनेल्सची चित्रे आणि इतिहास बघायला मिळतो, फ़ुकटात!”

"हो रे! समज आपल्याकडे, प्रत्येकी १५०० रुपये घेऊन बसनी जंगलात नेले, आणि उन्हात पायपीट करवून चार उंदरांची भोके आणि दोन पुतळे दाखवून पाणी देखील न पाजता सहा तासांनी परत आणले असते, तर लोकांनी प्रवासी कंपनीची हजामतच केली असती!"

असो! आपण टिप्पणी न करणेच उत्तम! अपना अपना खयाल अपनी अपनी मिट्टी!

---

विएतनाम लढाई जिंकणे तर दूरच, पण आपली अपरिमित हानी आणि नामुष्की टाळून यातून तोंड वाचवून बाहेर पडणे देखील अमेरिकेला कठीण झाले होते. घरी आणि बाहेर, सारे जग ह्या दादागिरीच्या विरुद्ध झाले होते. दुर्गम जंगलात विएतकॉंगचे लोक केंव्हाही, कुठूनही प्रकट होऊन अमेरिकन सैनिकांना कापून काढायचे. जंगलात खुबीने पेरलेल्या सापळ्यांमधे अडकून




कित्येक अमेरिकन सैनिकांना मृत्युमुखी पडावे लागले किंवा जिवघेण्या यातना सोसून अपंग व्हावे लागले. हरणा-या लढाईत बदल्याच्या भावनेने अमेरिकेने सगळी ताकत पणाला लावली. नेपाम सारख्या प्रचंड यातना देणा-या बॉम्ब्सची वृष्टीच त्या प्रदेशावर केली होती. अर्थात विएतनामचे असंख्य लोक त्या विषारी वर्षावात मृत्युमुखी पडले किंवा अपंग झाले होते. विषारी रसायनांच्या प्रभावाने तिथली माती आणि मेकॉंगचे पाणी दूषित झाले. त्यामुळे

पुढची पिढी देखील युद्धाचे दुश्परिणाम भोगीत होती.

युद्धात अपंग झालेल्या लोकांचा उदरनिर्वाह व्हावा म्हणून सरकारने तिथली स्थानिय कला- म्हणजे शिंपले किंवा अंड्यांच्या टरफ़लापासून चित्रे बनविण्याची कला संवर्धन केली आहे. अशाच एका कार्यशाळेत आम्ही गेलो होतो. किती विविध आणि सुंदर दृष्य साकारली होती त्या चित्रांमधून! ते अपंग कलाकार काम करीत असतांना एक फ़िलिपिनो म्हातारा खूप तल्लीन होऊन ते पहात होता. शेवटी न राहवून त्याने पांगळ्या विएतनामी कलाकाराला म्हटलेच- "तुझ्या सारखाच माझा पाय देखील त्या युद्धात जखमी झाला होता."




मला वाटते, विएतनामी कलाकाराला त्याचे फ़िलिपिनो इंग्लीश काही समजले नसावे. ते एक प्रकारे बरेच झाले! एकाच युद्धात दोघेही पांगळे झाले असले तरी त्यावेळी ते एकमेकांचे शत्रु होते! आणि

अमेरिकेच्या बाजुने तिथे लढायला येऊन कदाचित ह्याने देखील त्या कलाकाराची किंवा त्याच्या मित्रांची दुर्दशा करण्याचा प्रयत्न केला असेल!

नंतर ट्रीपमधे मी बराच वेळ फ़िलिपिनो म्हाता-याशी गप्पा केल्या. कार्लोस नांव त्याचे. आता त्याचे वय ८३ वर्षे आहे. आपल्या बायको, मुलगी आणि जावयासोबत इतक्या वर्षांनी विएतनामच्या आठवणीं साठी इथे आला होता. त्यावेळी केवळ उदरनिर्वासाठी अमेरिकेच्या सैन्यात भरती होऊन म्हणून विएतनाममधे लढायला आला. अगदी तरूण होता. लग्न देखील नुकतेच झाले असावे. आयुष्याची ऐन भरारीची तीन चार वर्षे त्याने ह्या जंगलात काढली होती.

कोण कुठले विएतनामी. कोण कुठले अमेरिकेन्स! वर्चस्वाच्या ह्या लादलेल्या परकी खेळात असे कित्येक कार्लोस भरडून निघाले असतील!

अमेरिकेनी त्या प्रदेशावर वेगळाल्या बॉम्ब्सचा



अगदी वर्षाव केला होता. नापाम हा सर्वात घाणेरडा प्रकार त्यात होता. महाविनाशकारी शक्तीचे बॉम्ब्स तबाही पसरवीत. त्या स्फ़ोटांत झालेल्या जखमांचे क्लेश सहन करण्यापेक्षा मरण बरे अशी स्थिती होती. बॉम्बने पडलेले एक मोठे विवर आपणाला तेथे दाखवितात. ते बघून कार्लोस उद्गारला " ह्या प्रचंड बॉम्बनी विएतनामीच काय, पण आमच्या सैनिकांना देखील सोडले नाही."

आकाशातून होणा-या गोळाबारीपासून विएतनामी वाचू शकत नव्हते. पण त्या प्रचंड हानीचा सुड त्यांनी जंगलात लढणा-या हजारो अमेरिकन सैनिकांना कंठस्नान घालून केला. तो पूर्ण परिसर जमिनीतल्या बोगद्यांनी व्यापून काढला. त्या १२० किमी



जाळयांच्या आत एका वेळी जवळजवळ १०,००० विएतनामी लढवय्ये "उंदीर" दोन तीन आठवडे लपून रहायचे. आतमधे रहायचे म्हणजे सरपटत किंवा बसलेल्या स्थितीमधेच. पूर्ण उभे रहायला उंचीच खूप ठिकाणी नव्हती. आणि आत मिट्ट काळोखातच रहायचे. आतली दूषित हवा बाहेर जाण्यासाठी मधे मधे पुंगळीदार झरोके होते. त्या पुंगळ्या सफ़ाईदारपणे मुंग्यांच्या वारुळासारखे दिसणारे ढीग करून लपविल्या होत्या. गाईडनी एक मजेदार गोष्ट सांगितली. अमेरिकन्सनी हे हवेचे झरोके शोधण्यासाठी कुत्र्यांचा वापर केला. मुंग्यांची वारुळे दिसली की हे कुत्रे तिथे जाऊन वास घेत. जर माणसाचा वास आला तर

भुंकायचे. मग अमेरिकन्स तो भाग नष्ट करायचे. पण पुढे विएतनामींना हे समजल्यावर त्यांनी लाल मिरच्या तिथे लपवून ठेवायला सुरवात केली. मिरचीचा खकाणा लागून कुत्रे तिथून दूर जायचे. ही युक्ती फ़ार काळ चालली नाही. कारण खकाण्याने कुत्रे कधी कधी खोकायचे, व अमेरिकन्सला बोगद्याचा पता लागायचा. नंतर मात्र विएतनामी वारुळाच्या आंत अमेरिकन शांपू ठेवायला शिकले. ओळखीचा वास आला की कुत्रे काही न दाखविता तेथून जायचे. असा उंदरा-कुत्र्यांचा खेळच सुरू होता म्हणाना!

बोगद्यांत रहाणा-या लोकांना एकदा सराव झाला की हवेच्या झरोक्यांमधून झिरपणा-या अंधुक उजेडात काही दिसले तर दिसायचे. एरवी, अगदी आंधळयासारखे वावरायला ते सगळे शिकले. बाहेर सैनिकांची चाहूल लागली, किंवा सापळयांमधे अमेरिकन अडकले आहे असे कळले की बाहेर येऊन त्यांची कत्तल करायची.



बोगद्यांचा प्रवेश आणि बोगद्यांची रुंदी फ़क्त सडपातळ विएतनामी सैनिक आत जाऊ शकेल येवढीच होती. आतील रस्ते सरळसोट नव्हतेच. शरीर एकदा डावीकडे थोडे वळवून पुढे सरकावयाचे, मग लगेच उजवीकडे वळवून आणखी पुढे. असा द्राविडी प्राणायाम होता. लठ्ठ शरीराच्या अमेरिकन्सला ही कसरत अशक्यच होती. ही प्रवेश बिळे झाडांच्या पानांनी झाकलेली असत. बाहेरून मुळीच कल्पना यायची नाही. आमच्या टूर गाईडनी विचारले, आत जाऊन बघायला कोण तयार आहे? सगळे एकदम चूप्प! तेव्हा कार्लोस पुढे सरसावला. अगदी सरळ उभे राहून आत जात जायचे. डोक्यावर झाकण धरून आपल्या मागे ते सरळ भोकावर बसेल असे करायचे.



“आमच्या ट्रुप लिडरनी मला एकदा एका बिळात प्रवेश करून आतमधे हेंड ग्रेनेड फ़ेकायला पाठविले होते. मी भितभित कसाबसा आत गेलो आणि दोन चार मिटर पुढे जाऊन हेंडगेनेड्स फ़ेकून लगेच बाहे आलो होतो! जर येता आले नसते, तर आतच माझी कबर बनली असती!” कार्लोसने नंतर आठवण सांगितली.



एका ठिकाणी स्वयंचलित पुतळे

करून त्यावेळची विएतनामी कार्यशाळा दाखविली आहे. न फुटलेले नापाम बॉम्ब्स आरीने हळू हळू कापून त्यातली बारूद मिळवायचा उद्योग विएतनामींना करावा लागायचा. आरीने बॉंब कापतांना घर्षणाने गरम होऊन तो फुटू नये म्हणून एक माणूस त्यावर सतत पाण्याचा फ़वारा सोडीत असे. "अशा कापण्यातून स्फ़ोट होऊन भयानक जखमी झालेले विएतनामी मी पाहिले आहेत." कार्लोस दु:खाने सांगत होता. "त्या वेळीस बंदुकीने उडवून त्यांना यातनांमधून सोडविणे येवढेच माझ्या हातात होते!"

वानगी दाखल एका ठिकाणी आपण देखील ट्रेनेल्समधे एका बाजुने आत जाऊन दुसरीकडून बाहेर येऊ शकतो. आतमधे खरच आपण पूर्ण आंधळ्यासारखे आणि सरपटतच जात असतो. असे फ़क्त वीस मिटर गेल्यावर आपण ताबडतोब बाहेर येण्याचा मार्ग शोधतो. तसे तर तेथे प्रवाशांसाठी चाळीस किंवा ऐंशी मिटर लांब जाऊन बाहेर येण्याचे देखील पर्याय आहेत. पण तो पर्याय कोणीच घेतला नाही!




अशा भयंकर ठिकाणी तीन चार आठवडे काढायचे, वर येऊन लढायचे, जीव वाचलाच तर पुन्हा लपायचे! आंत मिट्ट काळोखांत साप, विंचूंसोबत वावरायचे! कसे असेल ते जीवन! कशी असतील ती माणसे? आपल्या मातीची आन बान शान जपण्यासाठी आगांतुक शत्रुला त्याच मातीत कंठस्नान घालणारी कशी असतील ती माणसे?



आणि तिस-याच्या जिवावर दुस-याच्या जिवांची माती करणारी ही कोण होती अमेरिकन माणसे?

माणूस म्हणायला पात्र तरी होती कां ती?

# खादाड खाऊ जावई



माधव देशिंगकर

"चिमण" फार खादाड खाऊ होता. तो इतका खादाड होता की, त्याला मोकळा असा कोणी कधी पहिला नसावा. होम करताना सुध्दा तो वाटीमध्ये काहीतरी घेऊन बसत असे. त्याच्या या खादाडपणामुळे शाळेत त्याला "खा. खा. चिमण" म्हणजे खादाड खाऊ चिमण म्हणत. घरातल्या खाऊ ठेवलेल्या डब्यांवर त्याच्या हाताचे ठसे उमटलेले असायचे. त्याच्या ह्याच गुणांमुळे त्याचे आई- बाबा त्याला बाहेर पाहुण्यांकडे नेत नसत.





चिमणची आई त्याला नेहमी सांगे, " अरे बाळा, जरा सावकाश चावून चावून खात जा. अन्नपचन चांगले होते आणि भुकेपेक्षा दोन घास कमी खात जा." पण हे ऐकायला चिमणचे चित्त थाऱ्यावर असेल तर ना! अर्जुनाला जसा फक्त पोपटाचा डोळाच दिसत होता, तसे या चिमण ला फडताळातील डब्यात असलेले लाडू अन चिवडा असे खाण्याचेच पदार्थ दिसत.

चिमणच्या अश्या खाण्यामुळे त्याचे अभ्यासाकडे लक्ष कमीच लागायचे आणि त्यामुळे परीक्षेत मात्र एक दोन भोपळे हमखास मिळायचेच. गुरुजी म्हणत, "लेका चिमण, तुझ्या खाण्यातला भोपळ्यासारखा या पेपरात भोपळाच आहे पहा." सगळा वर्ग त्यावर खळखळून हसायचा. चिमण त्यावेळी खजील व्हायचा. मात्र त्याचे खाण्याचे वेड काही केल्या कमी होत नव्हते.




चिमण वयाने वाढला की, त्याचा हा खा खा चा सोस कमी होईल, असे त्याच्या आई- बाबांना वाटायचे,

पण कसले काय? त्याचे हे वेड वाढतच चालले आणि आहारही वाढतंच चालला !

आई-बाबांना आणखी एक आशेचा किरण दिसत होता , तो म्हणजे चिमणचे दोनाचे चार हात करणे आणि त्याच्या सहचारिणीमार्फत त्याच्या या आहार आणि आकारवाढीला आला बसवत येतो का ते पाहणे.



वधू-संशोधन सुरु झाले आणि लवकरच कुमारी चिमूताई चि. सौ. कां. चिमूताई झाल्या. परंतु आपण जे काही पदार्थ करु, ते आपला नवरा चवीने खातोय, हे पाहून सौ. चिमु अत्यंत उत्साहित होत असे आणि तिने त्या काळातील "रुचिरा", "सकाळची न्याहारी" अशा पुस्तकांतून दिलेल्या कृतींचा सरळपणे वापर करून नवनवे पदार्थ करण्याचा आणि "चिमणला" पोट भरून खाऊ घालण्याचा सपाटा चालविला.

नव्याची नवलाई संपली आणि आता सौ. चिमूताईना दुसरीच काळजी वाटू लागली. "खा खा चिमणराव" असेच खात राहिले तर त्यांना आपल्या माहेरी न्यायचे कसे? दिवाळसण जवळ आलेला आणि चिमणराव असेच जर खा खा करायला लागले तर आपले माहेरचे नातलग, घराचे लोक आपली आणि चिमणरावांच्या खादाडपणाची चेष्टा करतील आणि आपणाला जीव नकोसा होईल. हाच विचार फिरून-फिरून तिच्या मनात घोळू लागला आणि मग हे टाळायचा उपाय म्हणून चिमणरावांना वारंवार बजावले की, "अहो, खा - खा जर कमी करा, कारण असेच खात राहिलात, तर घराचे सर्वचजण हसतील. जावईबापूंना फराळाचा तोबरा द्या, असे म्हणतील. आणि जेवताना सुध्दा पुरे पुरे नको नको असे म्हणत कमी जेवावे." अशा सूचनांचा भडीमार केल्यामुळेच चिमणरावांवर परिणाम झाला. सासुरवाडीस आगमन झाल्यापासून



त्यांनी हात आवरता घेतला. फराळ काय आणि जेवण काय? त्यांनी तर चहाला सुध्दा नको नको केले. सौ. चिमूला सगळे विचारू लागले की, " काय ग चिमणराव फारच कमी जेवतात गं." सौ. चिमूला तिची आई म्हणाली की, "इथे आल्यापासून मी पाहते आहे, जावी बापू खायला सारखे नाही नाही म्हणतात कदाचित ते लाजत असावेत." त्यावर सौ. चिमू आईला म्हणे, " नाही गं, तसं काही नाही, त्यांचे जेवणच कमी आहे." आणि ती मनोमन सुखावत असे.

आज तर दिवाळी पाडव्याचा सण, मग आनंदाला उधाण आले होते. जेवणाची पंगत रांगोळ्या काढून सुरेख सजवली होती. उदबत्तीचा सुवास सर्वत्र दरवळत होता. जावईबापूंच्या ताटाभोवती छानशी कमान काढली होती.

पंगत बसली, वाढप्यांचे सत्र सुरु झाले. सर्वांनाच आग्रह होत होता. चिमणरावांना तर फारच आग्रह होता. आणि "नको हो नको" म्हणत जावई बापू निग्रहाने आग्रह परतवून लावत होते. जिलेबी हा त्यांचा सर्वात आवडीचा पदार्थ असूनसुध्दा सूचनांचे पालन करत ताट माघारी पाठवत होते. पंगत उठली. चिमणराव अर्धवट जेवून उठले. त्यांनी विचार केला, सायंकाळी जेवताना हात थोडा सैल करावा. पण त्यांचा हा उपायाच मुळापासून उखडला गेला. दुपारचे जेवण उशिरा आणि इतके पोटभर झाले होते की सगळ्यांनी किरकोळ फराळ आणि चहा कॉफी वर आटपायचे ठरवले. "हा हन्त हन्त नलिनीम गज उज्जहार !" अशी त्यांची अवस्था झाली.

रात्री चिमणराव आपल्या बिछान्यावर पडले. पण भूकेपोटी त्यांना झोपच येईना. एकदोनदा पाणी पिऊन पाहिले. पण ते काही जमेना. शेवटी मनाचा हिय्या करून त्यांनी आपला मोर्चा स्वयंपाकघराकडे वळविला आणि अंधुक उजेडात ते झाकणी उघडून पातेल्यांतून खाण्याकरीता काही मिळते का ते पाहू लागले. जिलेबी कुठे मिळेना. कदाचित, एखाद्या डब्यात असावी म्हणून फडताळात पाहू लागले. पण कोणास ठावूक कसा त्यांचा धक्का लागून, एक डबा फडताळातून खाली जमिनीवर पडला आणि रात्रीच्या शांत वातावरणात एकदम आवाज आला. तशा मधल्या घरात झोपलेल्या सासूबाई जोरात ओरडल्या. "चोर, चोर ! स्वयंपाकघरात चोर आहे चोर." त्यांचे ओरडणे ऐकताच सासरेबुवा काठी घेऊन धावतच आले, ते चिमणरावांनी कंदिलाच्या अंधुक उजेडात पाहिले आणि त्यांच्या छातीत धस्स झाले. आपली आता फजिती होणार हे पाहून त्यांनी स्वयंपाकघरातील उघड्या जिन्यातून पडवीत उडी मारली. आणि माडीवर जाण्याचा जिना त्यांनी क्षणार्धात गाठला. पण या गडबडीत उडी मारताना त्यांचे डोके पडवीतील शिंकाळ्यातील काकाविच्या मडक्याला आपटले आणि मडके फुटले. चिमणराव काकवीने पुरते न्हावून निघाले. तशा अवस्थेतच ते जिना भर भर चढून माडीवर पोहोचले. कोणीतरी ओरडले, "पळाला, पळाला ! चोरटा खिडकीतून उडी मारून माडीवर गेला पहा."



एव्हाना सगळे घरच जागे झाले होते. चोराकडे धारदार सुरा असेल ह्या भितीने सगळेच लांब होते. पण सासरेबुवा धीट होते. चोर माडीवर गेला, म्हटल्यावर त्यांनी आपला मोर्चा तिकडे वळविला. सासरेबुवा येत असल्याचे पाहून चिमणराव खोलीत ठेवलेल्या कापसाच्या ढिगात लपले. चिकट काकवीने त्यांच्या अंगाला कापूस चिकटला आणि ते कापसाने झाकले गेले. " आता भीती नाही" असा विचार मनात येईपर्यंत सासरे माडीवर येउन चोरास शोधू लागले. चोर कोठेच दिसेना , कोठे लपला असावा ? म्हणून सासरेबुवांनी कापसात काठी खुपसुन पाहण्यास सुरुवात केली. आता मात्रे इथून पळण्याशिवाय पर्याय नाही, हे ओळखून चिमणरावांनी कापसाच्या ढिगातून बाहेर उडी मारली आणि धूम ठोकली.

चिमणरावांचे कापूस लागलेले ते ध्यान बघून घरच्यांना वाटले "हे भूतच आहे" त्यामुळे प्रथम त्यांच्यामागे कोणी लागले नाही, पण दोघे-तिघे धीर करून थोडे फार चोरामागे पाळले, कुठे पळाले हे काही दिसले नाही. थोडे फार पळत जाउन "चोर निसटला रे" म्हणत सर्व माघारी फ़िरले. सर्वजण नंतर जागेच राहिले न जाणो ह्या चोराचा साथीदार परत यायचा. रात्र चोर विषयीच्या गप्पांनी रंगत होती. सर्वांना वाटले , " चिमण राव इतके गाढ झोपले आहेत त्यांचा कशाला उठवा?"

इकडे चिमणराव मात्र जीवाच्या आकांताने पळत होते. त्यांना भीती होती ती सासरेबुवांची काठी पाठीत बसेल याची आणि आपले बिंग फुटले तर आपल्या फजितीला पारावर राहणार नाही ह्याची. शिवाय सौ. चिमूला सगळेजण खा खा ची बायको म्हणून चिडवतील ते वेगळेच.



बऱ्याच वेळाने चिमणरावांनी मागे वळून पहिले, पाठलाग थांबलं होता. त्यांच्या जीवात जीव आला. अद्याप रात्र होती अन सारा गाव झोपेत होता. पळण्याचा वेग थोडा कमी करत गावापासून दूर एका वनराईत जाऊन ते एका झाडावर जाऊन बसले. चिमणरावांनी परस्पर आपल्या गावी परतण्याचा विचार केला. पण अजून उजाडायचे होते. तोपर्यंत विसावा घ्यावा म्हणत म्हणत पहाटेच्या गारव्यात चिमणरावांना झोप लागली. थोड्या वेळाने त्यांना जाग आली. तेव्हा झाडाखाली कोणीतरी कुजबुजत होते. चिमणरावांनी तशा अंधारात डोळे फाडफाडून पहिले. खाली ४-५ चोर चोरीच्या चीजवस्तूंची आपापसात वाटणी करत होते. चोर म्हटल्यावर चिमणराव लटलट कापू लागले. अजून एक नवे संकट त्यांच्या पुढे उभे होते. चिमणराव भीतीने थरथरत होते आणि त्यांच्या अंगावर चिकटलेला कापसातून थोडा- थोडा कापूस खाली चोरांच्या कोंडाळ्यात पडू लागला.



चोरांनी चमकून वर पहिले, एक पांढरीशुभ्र वेडी वाकडी आकृती त्यांना झाडावर दिसली. "भूत ! भूत !" म्हणत सर्व चोर भीतीने माल तिथेच टाकून पळाले.

आता चिमणरावांच्या जीवात जीव आला एव्हाना पाहत होत होती. झुंजूमुंजू झाले होते. चिमणराव झाडावरून खाली उतरले आणि प्रथम जवळच्या विहीरीत जाऊन अंग साफ करून घेतले. वर येऊन चोरीचा माल व्यवस्थित पोत्यांमध्ये भरून ठेवले आणि तेथेच वाट पाहत बसले आपले नातेवाइक शोध घेत येण्याची.

इकडे सकाळी सौ. चिमू चिमणरावांना उठवून रात्रीच्या चोराची हकीगत सांगावी म्हणून त्यांच्या खोलीत शिरली. पण पाहते तो तेथे चिमणरावांचा पत्ताच नाही. ती घाबरून ओरडली "अगंबाई, हे कुठे आहेत?" पुन्हा गोंधळ, आणि शोधाशोध सुरु झाली. कोणीतरी शंका व्यक्त केली " चोरामागोमाग पळालेल्यांमध्ये जावई बापू तर नव्हते? आणि ते चोरांच्या तावडीत तर नाही न सापडले?" मग काय गावात शोधाशोध सुरु झाली आणि आणि शोधमोहीम वनराई पर्यंत पोचली. चिमणराव वनराईतच तर होते. शोध घेणारी मंडळी त्यांच्यापर्यंत पोहोचली. चिमणरावांनी चोराशी चार हात करून ऐवज सोडवलेला सर्वांना दाखविला आणि नंतर तो ज्यांच्या घरात चोरी झाली होती त्यांना परतही केला. आणि अशाप्रकारे "खा - खा" चिमणरावांचे "धाडसी" चिमणराव असे नामांतर झाले.

दुपारच्या पंगतीत त्यांना जो तो आग्रह करत होता आणि ह्यावेळेस चिमणरावांना तो मोडवत नव्हता. सौ. चिमू मात्र गालातल्या गालात हसत होती. तिला काही गुपित कळले होते काय कोणास ठावूक?

# चित्र संगती















वर्धिनी पेंढारकर

वय वर्ष १०



रिद्धिमा पाटिल

वय वर्ष ६



पालवी तडवळकर

वय वर्ष ८

माझे पहिले सुवर्ण पदक
माझा My 1st 3D कडेचा प्रवास



हे सगळे चालु झाले जेव्हा मी एका सध्या "Enrichment class" जिथे "यांत्रिकी विद्या" शिकणे हे मजा व सोपे केले आहे अश्या ठिकाणी जाऊ लागलो. त्याचे नाव थोडे वेगळे होते - म्हणजेच My 1st 3D. मी त्या Class ला ६-७ महिन्यांसाठी जात होतो. येथे मला खरच वाटले की "यांत्रिकी विद्या" मजेशीर होते.
येथे "यांत्रिकी विद्येचे" वेगवेगळे भाग वापरुन शिकुन स्वतः चे नवीन नवीन "यांत्रिकी उपकरणे" बनवु लागलो माझे शिक्षक अँडी आणि अॅन्थनी यांनी आम्हाला विविध अडचणीच्या परिस्थितीतुन यांत्रिकी उपकरणांची उत्तरे शोधण्याचे मार्ग शिकवले

आणि आली NJRC 14 स्पर्धा
जुलै मध्ये मी जेव्हा यांत्रिकी विद्येची ३री कक्षा पुर्ण केली तेव्हा मला हे संधी मिळाली. माझे शिक्षक माईकल माझ्या बाबांकडे NJRC 14 स्पर्धे बद्दल विचारायला आले. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले की सिंगापुरची राष्ट्रीय यांत्रिकी विद्या स्पर्धा, 2014 मध्ये पहिल्यांदा खाजगी "Enrichment class" ना भाग घेण्यासाठी खुली आहे. तसेच माईकल शिक्षकांनी मला - वैदेहीला भाग घेण्यासाठी प्रस्ताव मांडला. मी खुप उत्साहीत झालो. स्पर्धेच्या ६ आठवडे आधी आमची तयारी सुरु झाली

Scanned by CamScanner

Date:

आम्हाला दिले
अंतरिक्ष संकल्पना
आमचे आव्हान होते "एक अंतरिक्ष प्रगतिक यांत्रिकी उपकरण" बनवण्याचे जे काही वस्तु उचलुन विशिष्ठ/ठराविक जागी नेऊन ठेविल. आम्ही घडवणुक, बांधणी, संघटन सुत्रे व चाचणी अशी कामाची विभागणी केली. आणी आमच्या चार जणांच्या गटातील प्रत्येकाने आपला भाग आपापल्या वेळे नुसार केला. हा एक सांघिक कार्य करण्याचा, एकमेकां पासुन शिकण्याचा व आमचे आव्हान पुर्ण करण्याचा अनुभव मोठा जबरदस्त होता.
८-सप्टेंबर-२०१४ या दिवशी तेथे स्पर्धेत भागघेण्यासाठी आलेल्या ३०० संघांपैकी शेवटच्या ४० संघांमध्ये आमचा संघ यशस्वी रित्या निवडला गेला.

जागच्या जागी (सोडवण्याचे) आव्हान
१२-सप्टेंबर-२०१४ रोजी सिंगापुर मधील सर्वोत्तम संघ राष्ट्रिय यांत्रिकी स्पर्धा लहान वयोगट २०१४ च्या स्पर्धा स्थानी जमा झाले होते. लहान वयोगटाला एक असे आव्हान दिले होते की यांत्रिकी उपकरणाने काही वस्तु उचलुन बिना पाडवता, ~~बिना~~ परत-चालु न करता, कोणताही हस्तक्षेप न करता विशिष्ठ वेळे मध्ये ठराविक जागे मध्ये नेऊन ठेवायचे होते. आमच्या यांत्रिकी उपकरणाची घडवणुक अतिशय कारकसरी होती. मी संघडवणुकीची सुत्रे लिहीली. आमच्या यांत्रिकी उपकरणाने नेमुन दिलेली जवळ जवळ सर्व कामे बिनचुक पार पाडली.

Scanned by CamScanner

सुवर्ण व कांस्य पदके
आश्चर्य सर्वात शेवटी बाहेर आले जेव्हा संयोजकांनी आमच्या संघाचे नाव सर्वोत्तम घडवणुकीसाठी प्रथम स्थानी व सर्वतोपरी कार्यक्षमतेसाठी तृतीय स्थानी जाहिर केले. आमच्यासाठी हे एक स्वप्न खरे झाल्यागत घडले होते. पहिल्या वहिल्या यांत्रिकी उपकरणे बनवण्याच्या स्पर्धेमध्ये एक सुवर्ण व एक कांस्य पदक मिळण्याची कामगिरी आमच्या कडून घडली होती.


राष्ट्रीय यांत्रिकी स्पर्धा लहानगट २०१४ बाबतीत अजुन माहिती साठी येथे भेट द्या
www.njrc.com.sg

My 1st 3D बाबत अजुन माहिती साठी येथे भेट द्या
www.my1st3d.sg

- वैदेह विवेक साठे
युवा भारती आंतरराष्ट्रीय शाळा (YBIS)
इ-६ वी "ब"

Scanned by CamScanner

# खवय्येगिरी



**मृणाल मोडक**

## बेबी -कॉर्न कबाब

साहित्य -

८ बेबीकॉर्न उभे दोन भागात चिरलेले, २५० ग्राम पनीर किसलेले, हिरव्या मिरच्या बारीक चिरलेल्या, १ चमचा आलं लसूण पेस्ट, १/२ वाटी बारीक चिरलेली कोथिंबिर, १ चमचा कश्मीरी लाल तिखट, १ चमचा गरम मसाला, २ चमचे चाट मसाला, ४
ब्रेड स्लाईस पाण्यात भिजवून चुरलेल्या, तेल व मीठ.

कृती -
बेबी कॉर्न गरम पाण्यात १० मिनिट ठेवून ब्लांच करा .

इतर सगळ साहित्य एका बोल मधे एकत्र करून चांगले मळा. ह्या मिश्रणाचे १६ भाग करा. बेबी कॉर्नच्या अर्ध्या भागाला हे मिश्रण चारी बाजूनी दाबून चिकटवा.

हे लांबट कबाब च्या आकाराचे दिसले पाहिजे. आता तव्यावर तेल टाकून त्यावर हे कबाब दोन्ही बाजूनी शेलो फ्राय करा . गरम गरम कबाबसॉस किंवा चटणी बरोबर खायला द्या



## स्पेनिश भात (व्हेज)


साहित्य -

१/४ छोटा चमचा केशराच्या काड्या , २ मोठे चमचे ओलिव तेल , १ मोठा कांदा लांब -लांब चिरलेला, २ लसणीच्या पाकळ्या ठेचलेल्या, ८ चेरी टोमाटो अर्धे-अर्धे चिरलेले, ४ बेबी कॉर्न उभे-उभे चिरलेले, लाल-हिरवी-पिवळी भोपळी मिरचीचे चौकोन तुकडे, लिंबाच्या फोडी, १ वाटी तांदूळ, ८-१०
काळे मिरे आणि मीठ

कृती -

एका वाटीत थोडा गरम पाणी घ्या आणि त्यात केशराच्या काड्या टाकून ठेवा. एका भांड्यात ओलिव ओईल गरम करा . त्यात लसून घालून परता. मग त्यात कांदा घाला व परता. आता एक-एक करून सगळ्या भाज्या घाला व २ मिनिट परता. त्यात तांदूळ घालून २ मिनिटे परता. आता ह्यात २ वाट्या पाणी, भिजवलेले केशर, काळ्या मिर्याची पूड व चवी प्रमाणे मीठ घालून ढवळा आणि झाकण ठेवून शिजवा . गरमा -गरम एका वाडग्यात मधे वाढा आणि लिंबाच्या फोडींनी सजवा.





श्यामल भाटे

## खव्याच्या पोळया

सारणाचे साहित्य –

२ कप खवा, २ कप पिठीसाखर, १ चमचा वेलची पूड

थोडी जायफळ पावडर, ४ चमचे खसखस ( ऐच्छिक )

पोळी साठी लागणारे साहित्य –

कप कणीक, १/४ कप तेल, १/२ कप मैदा, १/२ कप रवा, १ चिमुट मीठ, पाणी

कृती

सर्व प्रथम कढईमध्ये खवा तूप घालून चांगला भाजून घ्यावा. परतलेला खवा मिक्सर मधून बारीक करून घ्यावा. खव्यात गाठी राहिल्या तर पोळी फुटण्याची शक्यता असते. खसखस भाजून घ्यावी. खव्यात खसखस,पिठीसाखर,वेलची/जायफळ पावडर घालून चांगले मळून घ्यावे. खवा मुठीत घट्ट दाबला तर चांगली मुठ तयार झाली पाहजे इतपत खवा मळून घ्यावा.



कणकेमध्ये रवा, मैदा आणि चिमुटभर मीठ घालावे. तेलाचे कडकडीत मोहन घालून पीठ घट्ट भिजवावे. २ तास कणी क भिजल्यावर हाताने भरपूर मळून घ्यावी. कणकेचा लिंबाएवढा गोळा घेऊन त्यात साधारणपणे तेवढाच खव्याच्या सारणाचा गोळा भरून तोंड बंद करावे. तांदुळाच्या पिठीवर हलक्या हाताने पोळी लाटून तव्यावर गुलाबी रंगावर भाजून घ्यावी. गरमगरम खव्याची पोळी तयार आहे. साजूक तुपाची धार सोडलेल्या खव्याच्या ह्या पोळीची चव खाणाऱ्याच्या जीभेवर रेंगाळत राहील ह्यात शंकाच नाही .



मेघना असेरकर

<u>ब्रोकोली पराठा</u>

साहित्य

१ लहान ब्रोकोली, तिखट, मीठ , हिंग, हळद, धन्या, जिऱ्याची पूड, (चवी प्रमाणे, अंदाजाने), आलं, लसूण पेस्ट (optional), कणीक, तेल.

कृती

ब्रोकोली स्वच्छ धुऊन, पुसून कोरडी करावी व लगेच किसावी. म्हणजे पराठा लाटताना त्रास होत नाही. पराठ्या करता कणीक नरम मळून घ्यावी. ब्रोकोली च्या किसा मधे सर्व मसाले घालावे. कणकेची मध्यम गोळी करून त्याला थोडे तेल लावावे. व पुरण पोळी करतो तशी मसाला ब्रोकोली स्टफ करावी. मग हलक्या हातानी पिठी वर पराठा लाटावा. नंतर मध्यम आचेवर तेल किवा तूप सोडून छान शेकावा. दही, sauce, लोणचे ह्याबरोबर गरमच सर्व करावा. ब्रोकोली अतिशय पौष्टीक असते. त्यामुळे हा एक हेल्दी नाश्ता होऊ शकतो.



## आलू टिकिया

साहित्य

४ मध्यम आकाराचे उकडलेले बटाटे. ५,६ स्लाईस ब्रेड (कडेचे ब्रेड जास्ती चांगले),तळणी करता तेल , तिखट अर्धा चमचा, मीठ चवीप्रमाणे, आलं, लसूण पेस्ट १ टी स्पून, कोथिंबीर बारीक चिरून, १ हिरवी मिरची बारीक चिरून.

कृती

बटाटे हातानी कुस्करावे. ब्रेड चुरून घ्यावी. दोन्ही मिक्स करावे. व त्यात सगळे मसाले नीट मिसळावे. तळहातावर तेल लावून ह्या मिश्रणाच्या चपट्या टिकिया बनवून घ्या. मध्यम आकाराच्या बनवणे म्हणजे आतपर्यंत तळल्या जातील. नंतर कढई मधे तेल चांगले तापवून टिकिया डीप फ्राय करणे. पेपर वर काढणे, म्हणजे जास्तीचे तेल निघून जाईल. हिरवी चटणी, tomato sauce बरोबर गरम सर्व्ह करावे.



# श्रीमद्भागवत महापुराण - लेखांक



श्रीकांत जोशी



श्रीकृष्ण शरणं मम |

## भागवतपुराण रचण्यामागील हेतू

मागील लेखात आपण नारदांचे पूर्वचरित्र पाहिले. नारदांशी झालेल्या संवादाने व्यासांना भगवत चरित्र लिहिण्याची प्रेरणा मिळाली. सरस्वती नदीच्या पश्चिमतटावर 'शम्याप्रास' नावाचा व्यासांचा



आश्रम आहे. तेथे पवित्र आणि एकाग्र मनाने व्यासांनी ध्यान केले. सरस्वतीच्या पश्चिम तट ब्रह्माकार वृत्तीचा प्रवाह तर शम्याप्रास आश्रम शमदमादी षट्संपत्ती दर्शवितो. अशा पवित्र स्थानी व्यासांनी ज्यामध्ये चंचलतेचे तरंग नाहीत आणि वासनांची मलीनता नाही अशा आपल्या मानस-

सरोवरात, अर्थात आपल्या अंत:करणात आदिपुरुष परमात्मा आणि त्याच्या आश्रयाने राहणाऱ्या मायेला पाहिले. श्रीमद्भागवतामध्ये निर्गुण-निराकार ब्रह्म, सगुण निराकार मायापती ईश्वर, प्रत्येक कल्पात ईश्वराने मायेच्या साहाय्याने केलेली जगाची उत्पत्ती, संचित कर्मानुसार जीवांचे त्या त्या योनीमध्ये जन्म आणि त्यांच्या पालनासाठी, भक्त आणि धर्म रक्षणासाठी घेतलेले ईश्वराचे सगुण-साकार अवतार यांचा उल्लेख पुन्हा पुन्हा येणार आहे. भगवंतांच्या सत्तेवर माया त्रिगुणात्मक जगताची उत्पत्ती करते. (माया तु प्रकृतिं विद्यात् मायिनं तु महेश्वरम् |).

निर्गुण निराकार भगवंत अशी विश्वाची पुन्हा पुन्हा उत्पत्ती का करतात? त्याचे एक कारण सांगतात की माया, जीव आणि त्याचे अज्ञान अनादी आहे. कल्पाच्या अंती सर्व जीव आणि जग अव्यक्तामध्ये विलीन होते आणि पुढील कल्पात पुन्हा त्या स्थितीत निर्माण होते. दुसरे असे कारण सांगतात, 'लीलावत्तुकैवल्यं'. ही सर्व भगवंतांची केवळ लीला आहे. आणि त्यातून सुटण्याचा उपायदेखील भगवंतांनी गीतेमध्ये सांगितला आहे.

'मामेव ये प्रपद्यंते, मायामेतां तरंति ते |'

जे सर्वभावाने मला शरण येतात, ते मायानदी तरुन येतात. पण ज्ञानेश्वर महाराज त्याच्याही पुढे जाऊन म्हणतात,

'येथ एकचि लीला तरले | जे सर्वभावे मज भजले |
तयांस ऐलथडीच सरले | मायाजळ ||'

सर्व भावाने जे माझी भक्ती करतात, त्यांच्याकरिता ही मायानदी वास्तविक असतच नाही. मग ती तरुन जाण्याचा प्रश्न येतो कुठे? आपल्याला गीतेमध्ये भगवंतांनी सांगितलेली वचने भागवतात वेळोवेळी आलेली आढळतील.

वास्तविक जीवचैतन्य आणि ब्रह्मचैतन्य एकच आहेत. दोन्ही तीन गुणांच्या अतीत आहेत. 'त्वं गुणत्रयातीत:' असे अथर्वशीर्षामध्ये गणपतीला उद्देशून म्हणतो. आपले आत्मस्वरुपही वास्तविक तेच आहे. (त्वं त्वमेव केवलं कर्तासि. धर्तासि, हर्तासि |) गणपतीच सच्चिदानंद ब्रह्म आणि तोच जगाचा कर्ता, धर्ता, हर्ता असा ईश्वर असल्याचे त्याचे त्याला माहीत आहे. पण त्रिगुणात्मक मायेमध्ये फसलेला जीव मात्र स्वरुपाच्या अज्ञानामुळे स्वत:ला देह समजतो आणि वासनेनुसार कर्मे करून त्यांची सुख-दु:खात्मक फळे भोगण्यासाठी तो पुन्हा पुन्हा जन्माला येतो. या अनर्थाला निवारण्याचे प्रत्यक्ष साधन म्हणजे मायापती भगवंतांची भक्ती. (अनर्थोपशमनं साक्षात् भक्तीयोगं अधोक्षजे |) म्हणून व्यासांनी श्रीमद्भागवताची रचना केली. याच्या केवळ श्रवणाने भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी परम-प्रेममय भक्ती निर्माण होते आणि त्यामुळे जीवाचा शोक, मोह आणि भय नष्ट होतात. भागवत कथा कर्णरंध्रातून हृदयात प्रवेश करते आणि अंत:करणातील वासनांची जळमटे स्वच्छ करते. अनेकांचा असा अनुभव आहे की कथा ऐकू लागले की मोठमोठ्या दु:खांचा मनुष्याला विसर पडतो.

व्यासांनी अनेक कल्पात घडलेल्या इतिहासाचे संशोधन केले आणि भगवद्भक्तीला पुष्टी देणाऱ्या कथा

येथे उधृत केल्या. त्यामुळे काही ठिकाणी महाभारतापेक्षा त्या वेगळ्या आढळतील. हे मुद्दाम लिहिण्याचा उद्देश असा की कथा वेगळी कशी याचा विचार न करता श्रोत्यांनी कथेचा मतितार्थ समजून घ्यावा. ("मंथुनी नवनीता तैसे घे अनंता | व्या व्यर्थ कथा सांडी मार्गु |" असे ज्ञानेश्वर महाराजांनाही सांगावे लागले आहे). अशा प्रकारे १८,००० श्लोक असलेली ही संहिता त्यांनी आपल्या पुत्राला, शुकदेवांना प्रदान केली. अखंडानंद म्हणतात, अध्यात्मिक दृष्टीने व्यास आणि शुक एकच आहेत. नारायण अंत:करणात अंतर्यामीच्या रूपाने सत्वरूप क्षीरसागरात बीजभूत शेषावर विराजमान आहेत. त्यांच्या नाभीकमलामधून चतुर्मुख ब्रह्मदेव म्हणजेच अंत:करण चतुष्टय उत्पन्न होतात. त्यातील मनोरुप पुत्र नारद, नारदांचे वाक्-रूप पुत्र म्हणजे व्यास, आणि त्यांचे शब्दरूप पुत्र म्हणजे शुक.

भगवान शुकदेव



शुकदेव म्हणजे पूर्ण वैराग्य. मायेमध्ये गुंतलेला, प्रपंचात आनंद मानणारा भगवत्प्रेमाचा प्रचार करु शकणार नाही. म्हणून भगवान शंकरांनी व्यासपुत्र शुकाचा अवतार घेतला तो केवळ भागवताच्या प्रसारासाठी आणि परीक्षिताला मुक्ती देण्यासाठी असेच म्हणावे लागेल.

शुकाचार्य जन्मत: निर्विकार होते, योगी होते. बालपणीच ते वनात तपश्चर्येसाठी गेले. ते सतत निर्गुण ब्रह्मचिंतनात मग्न असत. मग त्यांना परत कसे बोलवायचे? त्यासाठी व्यासांनी युक्ती केली. आपल्या शिष्यांना श्रीकृष्णाचे अद्भुत स्वरुप सांगणारे भागवतातील श्लोक शिकविले आणि वनात, जेथे शुक बसले असतील तेथे जाऊन मोठ्याने म्हणावयास सांगितले. ते श्लोक ऐकून शुकाचार्यांचे चित्त आकर्षित झाले. त्यांनी त्या शिष्यांना विचारले की हे तुम्हाला कोणी शिकविले? शिष्य सांगतात, आमचे आचार्य व्यासांनी अशा अठरा हजार श्लोकांचे भागवत पुराण व्यासांनी रचले आहे. शुकाचार्य व्यासांकडे आले आणि भागवताचा प्रचार कसा होईल ही व्यासांची चिंता दूर झाली.

शौनकादिक ऋषीं विचारतात, 'अत्यंत विरागी असे शुकाचार्य, जे केवळ गायीचे दूध काढायाला जेवढा वेळ लागतो तेवढा वेळ कुणा गृहस्थाच्या घरी थांबत, ते सात दिवस परीक्षिताला कथा सांगण्यासाठी एका ठिकाणी कसे थांबले?' सूत सांगतात, 'भगवंतांचे गुण आणि लीला इतक्या मधुर आहेत, की जे ज्ञानी आहेत, ज्यांची अविद्येची गाठ सुटली आहे, जे केवळ आत्मचिंतनामध्येच मग्न असतात, ते देखील भगवंतांच्या लीलामाधुर्याने आकर्षित होतात आणि सगुण भगवंतांची निष्काम भक्ती करतात. भगवंतांच्या कथामृताचे पान करताना तहानभूक हरपून जाते. व्यास भूक लागली की केवळ बोरे खाऊन राहात (म्हणून त्यांना बादरायण असे नाव पडले), पण शुकमुनींनाच काय, पण कथामृताचे पान करताना परीक्षिताची भूक-तहान देखील हारपली. समर्थांच्या वैराग्याचे वर्णन करताना 'शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे' असे म्हणतात तर त्यांच्या श्रवण भक्तीचे वर्णन करताना 'श्रवणी जसा

गूण परीक्षितीचा' असे वर्णन करतात. अशी ही जी थोर वक्ता आणि श्रोत्याची जोडी, त्या परीक्षिताच्या वंशाची थोरवी सविस्तर वर्णिली आहे. परीक्षिताची महति कळावयाची असेल तर त्याच्या वंशाची थोरवी देखील पाहणे आवश्यक आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असे म्हणतात. पूर्वजन्मातील किंवा अनेक पिढ्या चालत आलेली तपश्चर्या अशा पुत्र-कन्यांच्या रूपाने फळाला येत असते. पहिल्या स्कंदाच्या ७-११ या पंचाध्यायीत ज्या पांडवांच्या कथा आल्या आहेत त्या वंशशुद्धी, पितृ-शुद्धी, मातृ-शुद्धी, अन्नशुद्धी, आत्मशुद्धी अशी पाच प्रकारची शुद्धी दाखविणाऱ्या आहेत असे डोंगरे महाराज म्हणतात.

द्रौपदीपुत्रांची अश्वत्थाम्याने केलेली हत्या

महाभारत युद्ध संपत आले होते, पण अश्वत्थाम्याच्या मनात पांडवांचा सूड घेण्याचे विचार होते. एकदा त्याने पांडव झोपले असताना त्यांचा वध करण्याचा बेत आखला. पण प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण ज्यांचे रक्षण करीत होते त्यांचा वध कोण करील? भगवंतांनी झोपलेल्या पांडवांना जागविले आणि गंगातीरी चला म्हटले. पांडवांचा कृष्णावर पूर्ण विश्वास होता. पण प्रभूने सांगूनही पांडवपुत्र आले नाहीत. परिणामी अश्वत्थाम्याने द्रौपदीच्या पाचही पुत्रांना अंधारात पांडव समजून ठार केले. हे जेव्हा पांडवांना कळले तेव्हा अर्जुनाने अश्वत्थाम्याला मारून त्याचे शीर आणून द्रौपदीला देण्याची प्रतिज्ञा केली आणि भगवान श्रीकृष्णांना बरोबर घेऊन रथ घेऊन निघाला. अर्जुन आपला पाठलाग करीत आहे असे पाहून अश्वत्थामा पळू लागला. शेवटी थकल्यावर घाबरून जाऊन जीव वाचविण्याचा शेवटचा उपाय म्हणून त्याने अर्जुनावर ब्रह्मास्त्र सोडले. पण त्याला ते परत घेण्याची विद्या ठाऊक नव्हती. आता अर्जुनाच्या प्राणांवर बेतले तेव्हा अर्जुनाने श्रीकृष्णाची प्रार्थना आरंभिली. श्रीकृष्णाने या ब्रह्मास्त्राचे निवारण करण्यासाठी अर्जुनालाही ब्रह्मास्त्राचा प्रयोग करण्यास सांगितले. दोन्ही अस्त्रे एकमेकांना भिडल्याने प्रलयकाळ आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. शेवटी श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून अर्जुनाने दोन्ही ब्रह्मास्त्रे परत घेतली आणि अश्वत्थाम्याच्या मुसक्या बांधून तो त्याला शिबिराकडे नेऊ लागला. भगवान श्रीकृष्ण म्हणाले या अधम ब्राह्मणाला सोडून देणे योग्य नाही. रात्री झोपलेल्या निरपराध मुलांची त्याने हत्या केली. शिवाय त्याला मारण्याची प्रतिज्ञा देखील तू केली आहेस. तेव्हा तू याला ठार कर.

भगवान श्रीकृष्णानी खरे तर अर्जुनाच्या धर्माचरणाची परिक्षा घेण्यासाठी अशी प्रेरणा दिली. अर्जुनाचे ह्रदय विशाल होते. त्याची हत्या केल्याने ब्रह्महत्येचे पाप लागेल हे तो जाणत होता. त्याने आपल्या मृत पुत्रांचा शोक करीत असलेल्या द्रौपदीवर तो निर्णय सोपविला. त्याला द्रौपदीसमोर आणून उभे केले. इथे द्रौपदी आणि अर्जुन या दोघांच्या धर्माचरणाची परीक्षा आहे.



गुरुपुत्राला असे बांधून आणल्याचे पाहून द्रौपदीच्या ह्रदयात देखील करुणा

उत्पन्न झाली. तशा परिस्थितीतही तिने अश्वत्थाम्याला नमस्कार केला आणि हा ब्राह्मण तसेच गुरुपुत्रही आहे तेव्हा याला सोडा असे सांगितले. ज्यांच्या कृपेने आपण धनुर्विद्या शिकलात ते द्रोणाचार्य पुत्राच्या रूपानेच जणू आपल्यापुढे उभे आहेत. त्यांची पत्नी सती गेलेली नाही. जशी आपली मुले गेल्यामुळे मी रडत आहे तसे त्याच्या पवित्र मातेने रडू नये. राजांनी आपल्या कृत्याने जर ब्राह्मण कुलाला राग आणला तर ब्राह्मणांचा कोप राजांचे कूळ भस्म करतो.

द्रौपदीचे वचन कसे होते? सूत वर्णन करतात, 'धर्म्यं न्यायं सकरुणं निर्व्यलीकं समं महत् |' द्रौपदीचे बोलणे धर्म आणि न्यायाला धरून, निष्कपटी, करुणा आणि समदृष्टी दर्शक होते. स्वत:च्या पुत्रांची हत्या करणाऱ्या विषयी असे उद्गार द्रौपदीच काढू शकते. भीम सोडल्यास भगवान श्रीकृष्ण, धर्मराज युधिष्ठिर, अर्जुन आणि इतर सर्वांनी द्रौपदीच्या म्हणण्याला पुष्टी दिली. पण भीम क्रुद्ध झाला. भगवंतांनी त्याला शांत केले आणि अर्जुनाकडे पाहून म्हटले, 'पापकृत्य केलेल्याही ब्राह्मणाचा वध करु नये आणि आततायीला तर ठार मारले पाहिजे. या दोन्ही गोष्टी मीच शास्त्रात सांगितल्या आहेत. म्हणून माझ्या दोन्ही आज्ञांचे पालन कर. द्रौपदीचे सांत्वन करताना तू याला मारण्याची प्रतिज्ञा देखील केली होतीस ती पूर्ण कर. तसेच तिला, भीमाला आणि मला जे प्रिय असेल तेही कर' अर्जुनापुढे आता पेचप्रसंग उभा राहिला. पण भगवद्भक्त अर्जुनाने श्रीकृष्णांचा अभिप्राय जाणला. त्यांनी अश्वत्थाम्याच्या डोक्यावरील मणी फक्त काढून घेतला आणि त्याला निष्प्रभ करून सोडून दिले. अशा प्रकारे ब्राह्मणाचा शारीरिक वध तर झाला नाही म्हणून अर्जुन ब्रह्महत्येच्या पातकापासून वाचला आणि अवमानित आणि निष्प्रभ झाल्याने अश्वत्थाम्याला मृत्यूहून भयंकर शिक्षा झाली. अश्वत्थामा चिरंजीव आहे त्यामुळे डोक्यावरच्या जखमेच्या दु:खातून त्याची सुटका नाही.

या प्रसंगात अर्जुन आणि द्रौपदी दोघांची महानता दिसून येते. व्यास द्रौपदीचे वर्णन करताना म्हणतात, 'वामस्वभावा' म्हणजे सुंदर स्वभावाची. अपकाराचा बदलाही उपकाराने घेणारी द्रौपदी सुंदर स्वभावाची आहे म्हणून भगवंतांना प्रिय आहे. द्रौपदी दयेची मूर्ती आहे. युधिष्ठिर धर्म होय, भीम बल, नकुल सहदेव बुद्धी आणि ज्ञान या चार गुणांचा जीव अर्जुन होय. हे गुण तेव्हाच शोभून दिसतात जेव्हा त्यांचा दयारूप द्रौपदीशी विवाह होतो. जेव्हा धर्माला तुम्ही श्रेष्ठ मानाल तेव्हा द्रौपदी मिळेल आणि श्रीकृष्ण सारथी होईल.

उत्तरेच्या गर्भावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग

पण अश्वत्थामा इथेच थांबला नाही. पांडवांचा पुन्हा बदला घेण्यासाठी त्याने अभिमन्यूची पत्नी उत्तरेच्या पोटात वाढणाऱ्या पांडवाच्या उत्तराधिकारी असणाऱ्या गर्भावर आणि पांडवांवर पुन्हा ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला. उत्तरा व्याकूळ झाली. भगवान श्रीकृष्ण द्वारकेला जाण्यासाठी रथावर आरुढ झाले होते. तेवढ्यात उत्तरा तेथे आली आणि आर्त स्वरात भगवंतांची प्रार्थना करु लागली. 'जगदीश्वरा आपण माझे रक्षण करा. या जगात प्रत्येकजण दुसऱ्याच्या मृत्यूला कारण होत आहे. अशा परिस्थितीत आपल्यासारखा मला अभय देणारा कोणीच नाही'.

भगवंतांनी जाणले की हा अश्वत्थाम्याचा ब्रह्मास्त्राचा परिणाम आहे. त्यांनी आपल्या सुदर्शन चक्राने त्यांचे रक्षण केले. हा उत्तरेच्या गर्भात वाढणारा पांडवांचा वंशज म्हणजेच परीक्षित. उत्तरेने पांडवांकडे धाव न घेता श्रीकृष्णांकडे धाव घेतली. संत सांगतात, आपले दु:ख इतर कोणाला सांगण्यापेक्षा भगवंतांना सांगावे.

'सुख देवासी मागावे | दु:ख देवाला सांगावे ||'

कुंतीचे अलौकिक मागणे

भगवान द्वारकेला जाण्यासाठी निघाले. भगवंतांचे जाणे कुणालाच सहन होणारे नव्हते. आता त्यांना कुंतीने अडविले. ब्रह्मास्त्राच्या संकटातून मुक्त करणाऱ्या भगवंतांची तिने स्तुती करण्यास सुरुवात केली. कुंती म्हणते,

“हे भगवंता आपण सर्व जीवांच्या आत आणि त्यांच्या बाहेरही व्यापून आहात. तरी सुद्धा आपण प्रकृतीच्या पलीकडे असल्यामुळे प्रकृतीचे विकार असणाऱ्या इंद्रियांनी किंवा अंत:करणवृत्तींनी जाणले जात नाही. इंद्रिये आपल्या सत्तेवर बाह्य वस्तू जाणू शकतात. पण आपण मायेच्या पडद्याने झाकले असल्याने माझ्या सारखे अज्ञानी तुम्हाला जाणू शकत नाहीत. (सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त' आणि 'नेति नेति' शब्दे न ये अनुमाना' असे आपणदेखील आरतीमध्ये दत्तत्रेयांना म्हणतो पण अर्थ न जाणता.)

“हे देवकी नंदना, वासुदेवा, नंदनंदना, गोविंदा, आपणास आमचा पुन्हा पुन्हा नमस्कार. आपण दुष्ट कंसाला मारून देवकीचे जसे रक्षण केलेत तसेच माझे, माझ्या पुत्रांचे आपण वेळोवेळी रक्षण केलेत. वनवासातील अनेक आपत्ती, लाक्षागृहाला लावलेली आग, विषप्रयोग आणि युद्धात प्रतिद्वंद्वीयांच्या अस्त्रां पासून आणि आता अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून आपण आमचे रक्षण केलेत.

“उच्च कुळात झालेला जन्म, विद्या आणि संपत्ती यांनी गर्विष्ठ झालेली माणसे आपले नाव घेऊ शकत नाहीत कारण आपण स्वत:जवळ प्रापंचिक वस्तू व वासना न ठेवणाऱ्यांनाच दर्शन देता. आपण अनादी, अनंत, सर्वव्यापक, सर्वांचे नियंते काळस्वरुप असलेले परमेश्वर आहात. भेदभावामुळे आपापसात कलह करणाऱ्या सर्वांमध्ये आपण समानरूपाने संचार करता. आपण विश्वाचे आत्मा आहात, आपण वास्तविक जन्म घेत नाही की कर्म करत नाही. तरीही पशु, पक्षी, ऋषी, इत्यादी योनीमध्ये जन्म घेऊन दिव्य कर्मे करता असे दिसते ती आपली लीलाच होय. जगाचे स्वामी असूनही यशोदामाते करिता आपण बाळ लीला केल्यात त्या तर सर्वांनाच मोहून टाकतात. गोकुळात दह्याचा डेरा आपण फोडलात तेव्हा यशोदा माता रागावली आणि आपल्याला बांधायला हातात दोरी घेऊन आली. त्यावेळी घाबरून जाऊन बावरेल्या डोळ्यांनी आणि मान खाली घालून आपण उभे होतात. त्या छबीची आठवण होताच मी मोहित होते. खुद्द भय ज्याला भीते त्याची काय ही अवस्था !

आपल्या जन्माची कारणे सांगताना महापुरुष असे म्हणतात, आपला प्रिय भक्त पुण्यश्लोक राजा यदूची कीर्ती पसरावी म्हणून त्याच्या वंशात आपण अवतार घेतलात. काही म्हणतात, वासुदेव देवकीने पूर्वजन्मी (सुतपा आणि पृश्नी) आपल्याकडून आपण

पुत्ररूपाने पोटी यावे असा वर मागितला होता म्हणून आपण अजन्मा असूनही दैत्यांचा नाश आणि जगाचे कल्याण करण्यासाठी त्यांचे पुत्र झालात. तर दुसरे म्हणतात, पृथ्वीचा भार हलका करण्यासाठी ब्रह्मदेवाने आपली प्रार्थना केल्याने आपण प्रकट झालात. पण मला तर खरे कारण वेगळे असावे असे वाटते. जे लोक या संसारात अज्ञान, वासना आणि कर्मबंधात जखडल्यामुळे पीडित झाले आहेत त्यांनी श्रवण आणि स्मरण करण्यायोग्य लीला करण्यासाठी आपण अवतार घेतलात. आपल्या चरित्राचे श्रवण, गायन, कीर्तन करणाऱ्या भक्तजनांना आपल्या चरणाचे दर्शन होते आणि त्यामुळे त्यांचा जन्ममृत्यूचा प्रवाह कायमचा थांबतो.

भक्तांच्या इच्छा पुरविणाऱ्या प्रभो, आपल्या आश्रयाला आलेल्या आणि आपले सोयरे असणाऱ्या आम्हाला सोडून जाणार काय? युद्धात राजांच्या वधाचे पाप केलेल्या पांडवांना आपल्याखेरीज कोणताही आश्रय नाही. जीव नसेल तर इंद्रिये क्षीण होतात त्याप्रमाणे आपल्याशिवाय पांडव किंवा यदुवंशीयांना काय किंमत आहे?

अशी भगवंतांची स्तुती करून कुंती भगवंतांकडे आणखी एक मागणे मागते. सर्व संकटे दूर होऊन सुखाचे दिवस आले असताना असे मागणे विपरीतच नव्हे तर अलौकिक आहे. ती म्हणते, 'विपद: संतु न: शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो | भवतो दर्शनं यस्यादपुनर्भवदर्शनम् ||' १.८.२५ हे जगद्गुरो आमच्या जीवनात पावलापावलागणिक संकटे येवोत कारण संकटाच्या वेळीच आपले दर्शन नक्की होते आणि दर्शनानंतर तर जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होते. आपले नेहमी दर्शन व्हावे यासाठी वारंवार दु:खे आली तरी चालेल कारण त्यावेळी आपण जवळ असता आणि आता सुखाच्या प्रसंगी आपण आम्हापासून दूर जात आहात. हे मला सहन होत नाही". निष्काम भक्तीचे हे सूत्र आहे. आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात, आपली संकटे दूर व्हावीत यासाठी प्रार्थना करतो. भगवंत त्या गोष्टी पूर्ण करतो पण तो मात्र आपल्यापासून दूरच राहतो. त्याकरिता 'निष्काम' भक्ती असावी असा संत आणि शास्त्राचा आग्रह आहे. त्याने भगवंतांची, आत्मस्वरूपाची प्राप्ती होते.

"आपण विश्वाचे स्वामी, आत्मा आणि विश्वरूप आहात, यदुवंशी आणि पांडव यांचे विषयी माझ्या मनात असलेले स्नेहपाश आपण तोडून टाका. माझी बुद्धी सैर-भैर न होता अखंड आपल्या चिंतनात आणि आपल्यावर प्रेम करीत राहो. हे योगेश्वरा मी आपल्याला वंदन करते".

कुंतीने केलेली स्तुती आणि अशी मागणी केलेली पाहून भगवंतांनी नुसते स्मित केले आणि तिची बुद्धी आपल्या मायेने मोहित केली. आतापर्यंत ती श्रीकृष्णाला भाचा समजत होती आणि श्रीकृष्ण रोज तिच्या पाया पडत असत. आता तिला त्यांचे ईश्वरस्वरुप जाणवले. भगवंतांना आपले ईश्वर स्वरुप अज्ञात ठेवून आपले मूळचे आत्या-भाच्याचे नाते कायम राहावे असे वाटत असावे. यशोदेलाही मुखात ब्रह्मांडाचे दर्शन करविल्यावर त्यांनी तिचे बुद्धी मोहून टाकली जेणेकरून त्यांचे माता-पुत्राचे नाते कायम राहील.

पितामह भीष्मांचे देहविसर्जन

आता युधिष्ठिर पुढे होऊन भगवंताना राहण्याचा आग्रह करु लागला. आपले बांधव मारले गेल्याने तो अजूनही दु:खी होता. युद्धात सर्वांना मारल्याचा अपराध त्याला जाचत होता. तो म्हणाला, ‘माझे अज्ञान तर पाहा ! कोल्ह्या कुत्र्यांचा आहार असलेल्या या शरीरासाठी मी अनेक अक्षौहिणी सैन्याचा नाश केला. बालक, मित्र, सगे-सोयरे, गुरुजन यांचा मी द्रोह केला. राजाने प्रजेचे पालन करण्यासाठी धर्मयुद्धामध्ये शत्रूंचा वध केला तर पाप लागत नाही या शास्त्र वचनाने माझे समाधान होत नाही. यज्ञयागांनी या पापांचे परिमार्जन होणार नाही. कोट्यावधी वर्षांनंतरही नरकातून माझी सुटका होणार नाही.’ (असे म्हणणारा धर्मराज युधिष्ठिर हा एकमेव पांडव स्वर्गात प्रवेश करु शकला असा महाभारतात उल्लेख आहे.)

व्यास महर्षी आणि स्वत: भगवंतांनी अनेक प्रकारे त्याची समजूत काढावयाचा प्रयत्न केला. पण



त्याचे समाधान होईना. शेवटी त्याची समजूत पटण्यासाठी एक उपाय म्हणून भगवंतांनी शरशय्येवर असलेल्या भीष्माचार्यांकरवी त्याला धर्माचा उपदेश करविला. खरे तर भगवंतांना थांबण्याचे आणखी एक कारण होते ते म्हणजे त्यांची प्रतीक्षा करीत असलेला आणि उत्तरायणाची वाट पाहात असलेला त्यांचा परमभक्त भीष्म. भीष्मांनी त्यांच्याकडून वचन घेतले होते की तुमच्या समक्ष, तुमचे दर्शन घेत मी प्राण सोडू इच्छितो तेव्हा मृत्यूसमयी आपण मला दर्शन द्या.

भीष्माचार्यांचा मृत्यू किती मंगल होता. भगवंतांबरोबर त्यावेळी त्यांच्या भेटीला ब्रह्मर्षी, राजर्षी, देवर्षी, नारद, धौम्य, व्यास, भारद्वाज, वसिष्ठ, परशुराम, असित, गौतम, अत्रि, विश्वामित्र, बृहस्पती, शुकदेव इत्यादी भरतवंशाचे भूषण असणाऱ्या पितामहांना भेटण्यासाठी उपस्थित होते. पडल्या पडल्या मनानेच भीष्मांनी सर्वांचा यथायोग्य सन्मान केला. स्वलीलेने मनुष्यरूप धारण केलेल्या भगवंतांचा प्रभाव ते जाणत होते. त्यांची त्यांनी मनोमन पूजा केली. श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून युधिष्ठिराला सर्वांच्या समक्ष धर्माचा उपदेश करु लागले. स्वत: आणि व्यासादिकांनी केलेल्या उपदेशाने युधिष्ठिराचा शोक दूर झाला नाही आणि आता मृत्यूशय्येवर असलेल्या परमभक्ता कडून ते त्याला उपदेश करवीत आहेत ही भगवंतांची एक लीलाच आहे. भीष्माचार्य म्हणतात,

“हे धर्मपुत्रांनो, तुम्ही सर्वजण ब्राह्मण, धर्म आणि भगवंतांचे आश्रित आणि त्यांच्या आज्ञा पाळत असूनही तुमच्यावर केवढा अन्याय झाला. तुम्हाला एवढे कष्ट भोगावे लागले. प्रत्यक्ष धर्मपुत्र राजा युधिष्ठिर, गदाधारी बलभीम, गांडीव धनुष्यधारी शस्त्रास्त्रवेत्ता अर्जुन, आणि स्वत: सन्मित्र श्रीकृष्ण एकत्र असताना तुमच्यावर एवढ्या विपत्ती याव्यात ना ?

राजा, यावरून असे सिद्ध होते की या काळरुप ईश्वराची इच्छा कोणीच जाणू शकत नाही. ज्ञानी पुरुष सुद्धा याबाबत मोहित होतात. म्हणून संसारातील या

घटना ईश्वरेच्छेच्या आधीन आहेत असा विचार करून तुम्ही अनाथ प्रजेचे पालन करा.

हे भगवान श्रीकृष्ण साक्षात् आदिपुरुष नारायण आहेत आणि आपल्या मायेने लोकांना मोहित करून गुप्तरूपाने लीला करीत आहेत. तुम्ही त्यांना आपला मामेभाऊ, मित्र, हितकर्ता मानता आणि त्याला आपला दूत, मंत्री एवढेच काय आपला सारथीदेखील केलेत. हे श्रीकृष्ण सर्वात्मा, समदर्शी, अद्वितीय, अहंकाररहित आणि निष्पाप असून यांचे अत्यंत गूढ स्वरुप फक्त भगवान शंकर, देवर्षी नारद आणि स्वत: भगवान कपिल हेच जाणतात. आपल्या अनन्यप्रेमी भक्तांवर ते अनंत कृपा करतात. केवळ याच कारणास्तव माझ्या प्राणत्यागाच्या वेळी त्यांनी मला साक्षात् दर्शन दिले. योगी पुरुष भक्तीभावाने आपले मन यांच्यात गुंतवून आणि वाणीने यांचे नामसंकीर्तन करीत शरीराचा त्याग करतात आणि कर्मबंधनातून, जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होतात".

यानंतर भीष्माचार्यांनी वर्णाश्रमानुसार स्वभावविहित धर्म, वैराग्य व आसक्तीमुळे होणारे निवृत्ती आणि प्रवृत्तीरूप द्विविध धर्म, दानधर्म, मोक्षधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म आणि भगवद्धर्म याचे वर्णन केले. धर्म अर्थ काम मोक्ष हे पुरुषार्थ, त्यांच्या प्राप्तीची साधने याविषयी अनेक उपाख्याने आणि इतिहास सांगितला. सुप्रसिद्ध विष्णूसहस्रनामस्तोत्र याच वेळी त्यांनी युधिष्ठिराला सांगितले. त्याचे पठण आणि भगवंतांचे स्मरण हा भगवद्धर्म आहे. (आद्य शंकराचार्यांनी यावरच आपले पहिले भाष्य लिहिले आहे.)

अशा प्रकारे उत्तरायण सुरु होई पर्यंत युधिष्ठिराला उपदेश केल्यावर त्यांनी आपले मन आपल्या समोर असलेल्या पीतांबरधारी चतुर्भुज भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी एकाग्र केले. आपल्या इंद्रियांच्या सर्व वृत्ती रोखून धरल्या आणि मोठ्या प्रेमाने भगवंतांची स्तुती करण्यास आरंभ केला. त्यांनी ११ श्लोकात केलेली भगवंतांची स्तुती मुळातून वाचण्यासारखी आहे. विस्तार भयास्तव इथे देत नाही. अशा प्रकारे आत्मस्वरुप भगवंतांच्या ठिकाणी आपल्या सर्व वृत्ती लीन करून, अंत:करणात आणि प्रत्यक्ष दृष्टीसमोर भगवंतांचे दर्शन घेत असताना आपल्या आत्म्याला भगवंतांमध्ये लीन करून घेतले. त्यावेळी देवतांनी पुष्पवृष्टी केली.

उत्तरायणातील मृत्यूचा अर्थ आहे ज्ञानाच्या किंवा भक्तीच्या परिपक्व अवस्थेत मृत्यू येणे. भीष्म महाज्ञानी होते तरीही ते प्रभूप्रेमात तन्मय होऊन त्यांनी प्राणत्याग केला. ही घटना हेच पटविते की केवळ ज्ञान नव्हे ज्ञानोत्तर भक्ती श्रेष्ठ आहे. (तेषां ज्ञानी नित्ययुक्ता एकभक्तिर्विशिष्यते | गी. ) सर्व जीवन ज्याच्या ध्यासात जाते त्याचेच अंती स्मरण होते आणि 'अंते मति सा गती'. सर्व जीवन भगवंतांच्या स्मरणात गेले तर त्याला अंती भगवान विसर पडू देत नाहीत. भीष्मांनी आपल्या ज्ञानावर विश्वास ठेवला नाही ते भगवंतांना शरण गेले. भीष्मपितामहांचा मृत्यू मंगलमय करण्यासाठीच की काय युधिष्ठिराचे निमित्त करून भगवान तेथे गेले.

युधिष्ठिराने त्यांची यथायोग्य अंतक्रिया करविली. भगवंतांची स्तुती करीत कृष्णमय हृदयाने सर्व ऋषिवर आपल्या आश्रमात परत गेले. श्रीकृष्ण आणि

भीष्म यांनी केलेल्या उपदेशाच्या श्रवणाने युधिष्ठिराचे सर्व संशय फिटले आणि अंत:करणात विज्ञानाचा उदय झाला. भगवंतांच्या आज्ञेत राहून आपल्या बंधूसह इंद्राप्रमाणे पृथ्वीचे राज्य ते करु लागले. काही महिने हस्तिनापुरात राहून भगवान श्रीकृष्णांनी द्वारकेकडे प्रयाण केले.

अर्जुन, उत्तरा, कुंती आणि भीष्माचार्यांनी वेगवेगळया परिस्थितीमध्ये केलेली भगवंतांची स्तुती आपण पाहिली. डोंगरे महाराज म्हणतात, भगवंतांची स्तुती त्रिकाळ करावी. सकाळ, दुपार ,संध्याकाळ तसेच सुखात, दु:खात आणि मृत्यूसमयी. (सुखावसाने, दु:खावसाने, देहावसाने). त्याकरिताच शंकराचार्यादिकांनी आणि संतांनी अत्यंत गेय अशी अनेक स्तोत्रे रचली आहेत. अर्जुन आणि उत्तरा दु:खात, कुंती सुखात तर भीष्म अंतकाळी स्तुती करतात. सामान्य माणूस सुखात देवाला विसरतो. सर्व जीवांवर भगवंत अनंत उपकार करीत असतो. दु:खात माणसाला देवाचे स्मरण होते म्हणून विपत्ती खरी संपत्ती होय म्हणून कुंती असा वर मागते. जगातील महापुरुषांच्या जीवनात दु:खे प्रथम येतात. तारुण्यमद, विद्यामद, द्रव्यमद आणि अधिकारमद या चार प्रकारच्या मदामुळे माणूस देवाला विसरतो. त्याला कीर्तनात टाळी वाजविण्याची लाज वाटते. त्याचे पाप माणसाच्या जिभेवर परमेश्वराचे नाव येऊ देत नाही. कुंतीच्या स्तुतीच्या या २६ श्लोकात सांख्यशास्त्राची २६ तत्त्वे सांगितली आहेत.

या लेखात आपण पांडवांच्या दिव्य वंशाचा इतिहास पाहिला. अशा वंशात जन्मलेला थोर राजा परीक्षित, ज्याला भागवत सांगणे हेच शुकाचार्यांच्या अवताराचे एकमेव उद्दिष्ट होते त्याची कथा आपण पुढील लेखात पाहू.

मूळ भागवत, भागवत दर्शन आणि भागवत रहस्य या ग्रंथांतील कथानक व विचार केवळ लेखनीक म्हणून आपल्यापुढे मांडण्याचा आणि कथेतील बारकावे पाहण्याचा केलेला हा अल्प प्रयत्न आहे. ही लेखमाला आपल्याला कृष्णकथेची गोडी लागण्यास साहायक ठरो हीच त्या श्रीकृष्णाजवळ प्रार्थना.

|| श्रीकृष्णार्पणमस्तु ||

# विषाणू



**अरुण मनोहर**

मनोगत

दूरच्या काळात, मंगळावर घडलेली ही कथा. अर्थात त्यावेळी मराठी किंवा इतर भाषा नव्हत्या. थांबा, तुम्ही नीट समजावून घेतले नाही बहुधा! इतर भाषा नव्हत्या म्हणजे भाषाच नव्हत्या. माणसे होती पण ती देखील आज आपल्याला समजणार नाहीत अशी! जेथे ही कथा घडली तेथे माणूस होता पण त्याला ना मन होते, ना भाषा! जे काही होते, ते कालच्या काळापेक्षा खूपच वेगळे, आपल्या समजण्याच्या बाहेरचे. म्हणून आजच्या वाचकांसाठी ही कथा त्यांना समजेल अशी सादर केली आहे.

उपोद्घात

मनोबुद्ध्यहङ्कार चित्तानि नाहं

न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे ।

न च व्योम भूमिर्न तेजो न वायुः

चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ॥

आत्मा जेव्हा ज्ञान आणि भावना ह्या दोन्हींचा संपर्क तोडतो तेव्हा त्याला एक असीम शांतीची अनुभूती होते. अशी अनुभूती भगवान बुद्धांना महापरिनिर्वाणाच्या एका क्षणात झाली. मानवाला बंधक करणा-या दोन गोष्टी - ज्ञान आणि मन - ह्यांवर पूर्णत: विजय मिळविणे म्हणजेच महापरिनिर्वाण. मर्त्य मानवांमधे फक्त भगवान बुद्धांनाच ते साधले होते.

विषाणू निवारक केंद्रात सिंतूर आणि गेबी हे दोन विशेष अधिकारी एका महत्त्वाच्या चर्चेसाठी एकत्र आले होते. एरवी सगळे काम घरी बसूनच व्हायचे. पण गुप्तता पाळायची असली की भेटीमधूनच चर्चा होत. मंगळमानवाच्या अस्तित्वालाच धोका पोहोचू शकेल अशा काही शक्यता समोर आल्या होत्या. त्या विषयी अधिक संशोधन करण्यासाठी म्हणून पृथ्वीवर काही पेशंटसना पाठवून तिथल्या वातावरणात काही नोंदी करणे आवश्यक होते. हे सगळे कसे करायचे ह्याचे planning करण्यासाठी आजची मिटींग होती.

“तू पेशंटची यादी तयार केली आहेस ना” सिंतूरनी गेबीला विचारले.

गेबीने सगळी नावे सिंतूरमधे उलगडली.

एकेक करून त्या पेशंटसची सगळी माहिती सिंतूरनी तपासली. मेंदूचक्रवात निवारक फवारे घेणारे लोक. कमी अधिक प्रमाणात त्रास होणारे. सगळे व्यवस्थितच होते.

आता ह्यामधे कंट्रोल ग्रुप म्हणून हा त्रास नसणारे दोन तीन लोक घातले की की लिस्ट पूर्ण होईल. “कंट्रोल ग्रुप म्हणून निरोगी अशा कोणाचे नांव सुचविले आहेस कां?” सिंतूरनी विचारले.

“नाही अजून. पण तो काही प्रॉब्लेम नाही. पृथ्वीवर इतक्या कालानंतरची पहिलीच ट्रीप ही! पुष्कळ लोक तयार होतील...” खिडकीकडे पहात थोड्याशा तंद्रीमधेच गेबी म्हणाला...”मी देखील तयार आहे!”

सिंतूरने त्याच्याकडे रोखून पाहिले. महत्त्वाचे काम समोर पडले असतांना गेबीचा असला विनोद त्याला आवडला नाही. “ हे पहा, हे धोक्याचे काम आहे. तिथून आल्यावर तुला काही त्रास सुरू झाला तर?”

चाचणी ग्रुप संबंधित इतर तयारी झाल्यावर दोघांनी मिळून कार्यवाहीसाठी अहवाल पाठविला.

*************************

इरा सत्तराव्या मजल्यावरील बाल्कनीत शांतपणे डोळे मिटून बसली होती. खाली वेगळाल्या उंचींवर जोडलेल्या इमारतींचे जाळे पसरले होते. त्या जाळ्यामधून सुळकन इकडून तिकडे जाणारी हवाई वाहने. त्यामधून आपापल्या कामाच्या जागी जाणारे लोक. नेहमीचेच दृश्य! वर संपूर्ण आकाशावर कायम संरक्षक चादर पांघरलेली. त्यातून अंधुक दिसणारे बाहेरचे आकाश! आणि कायम खुणावणारा पृथ्वीचा बारीक निळा ठिपका!



इतक्यात मंगळ समाचारचे पत्रक डोक्यात उलगडले गेले. “खूप काळानंतर पृथ्वीवर प्रवासी यात्रा सुरू करण्याची परवानगी सरकारने दिली आहे. पूर्वी तेथे काही अपघात झाले होते. प्रवासी कंपन्यांनी पृथ्वीवर यात्रा सुरू कराव्या अशी संघटित विनंती केली होती. सरकारने अपघातामागील कारणे पुन्हा तपासली. काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे निवडक प्रवासी कंपन्यांना तेथे मोहिमा नेण्याची परवानगी देण्यात आली आहे.”



मेंदूमधे उमटलेल्या स्रोतांनी इराच्या न्युरल वेब मधे जुने वादळ भणाणले. तीच गच्चपणाची भावना! जणू प्रचंड भोवरे गच्चपणाचा बांध तोडून बाहेर उसळायला लागणार आहेत. इराने पटकन उठून नाकात न्युरल स्प्रे मारला. न्युरॉन्सला शांत करणारे द्रव्य काम करू लागले. इराला लगेच बरे वाटले. इराला अधुनमधून “मेंदूचक्रवाताचे” झटके यायचे. मंगळावरील साधारण १० टक्के लोकांना मेंदुचक्रवाताचा त्रास होता. आदिम मानवाच्या जीन्समधील बाधित भाग काही लोकांमधे मधूनच प्रभाव दाखवायचा. डॉक्टरांनी इराला सांगितले होते त्रास झाल्याबरोबर न्युरल स्प्रे नाकात फवारला की ताबडतोब बरे वाटेल. फवारा मारताच इरा सावरली. पृथ्वीवर प्रवासी मोहीम घेऊन जायला मिळू शकेल ह्या विचाराने ती खूप उत्साहित झाली.



**************************

“आकाशगंगा पर्यटन” ही मंगळावरची एक यशस्वी पर्यटन कंपनी होती. कंपनीच्या व्यवस्थापकांमधे ईरा ही जास्त अनुभवी होती. पृथ्वीवर पुढची सहल नेण्याचा ब्रेनोग्राम इरात उमटला. तिच्या अत्याधुनिक जीवाट्रॉनिक्स वेगाने काम करू लागल्या. “पुरातन मानवाचा इतिहास” हा तिचा विशेष अध्ययनाचा विषय होता. पृथ्वीवर प्रवासी घेऊन जायला तिला आवडले असते. पण मंगळाच्या अधिपती रुद्रमणीने पृथ्वीवर प्रवासी मोहिमा नेण्यास बंदी घातली होती. आधी अशा प्रवासी मोहीमा निघायच्या. एका मोहिमेत अपघात झाल्यानंतर अधिपतींनी पृथ्वी मोहिमांवर पूर्ण बंदी घातली होती. अपघाताची सगळी माहिती लष्करी कायद्यांनुसार गुप्त ठेवली गेली होती.



इराने आजचा ब्रेनोग्राम पुन्हा उलगडला. “पृथ्वीवर पंधरा प्रवाशांची सहल न्यायची आहे. उद्या संध्याकाळी उड्डाण केंद्रात हजर व्हा. प्रवासाचे माहिती पत्र आणि सुरक्षेच्या सूचना गाभ्यातील नेहमीच्या ठिकाणी आहेत. तो उलगडून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.” याचा अर्थ हा होता की

पर्यटन कंपन्यांच्या लॉबिंगला दाद देऊन अधिपती रुद्रमणी-संकुलाने पृथ्वी पर्यटनाला परवानगी दिली होती.

इरा भराभरा तयारीला लागली. खूप कामे समोर पडली होती. पृथ्वीवर पहिली प्रवासी मोहीम नेण्याच्या जबाबदारीचे नियोजन कसे करायचे ह्याची तिला पूर्ण कल्पना होती. पण अचानक समोर ठाकलेल्या कार्यभाराने तिच्या पोटात खड्डा पडला. पौष्टिक कारंज्यामधून ऊर्जा भरून घेताच तिला तरतरी आली. मोहिमेत येणा-या प्रवाशांना सूचना पाठवून झाल्या. मोहिमेच्या आवश्यक माहितीची कार्डे अधिपतींच्या कक्षात फाईल केली. तिने बॉसला अल्फा-नळी जोडली. त्याच्याशी सगळा संवाद नेहमीप्रमाणे घरी बसूनच साधता येणार होता. पण तो म्हणाला, "माझ्या ऑफिसमधेच ये."

हे ऐकताच इराला थोडे आश्चर्यच वाटले. ऑफिसमधे कामाला जाण्याची वेळ फारच थोड्या प्रसंगी यायची. आज बॉसने अल्फा-नळीवर सूचना न देता भेटायला बोलावले, म्हणजे महत्त्वाची मिटींग असणार. इराने कबर्डमधे टांगलेला वेलीपानांपासून बनवलेला झगा निवडला. पृथीवर म्हणे अशा वेली, फुले जमिनीवर उगवावी लागायची! किती मागसलेले आणि अडाणी लोक होते ते! इथे तर पाहिजे तशी फुले, वनस्पती, अगदी मोठाले वृक्ष देखील अणुछापकामधून दहा मिनिटांत छापून मिळतात. प्लास्टोफ्लाबनी छापलेली विविध आकाराची रंगीबेरंगी फुले, वेली. घराघरात आणि बाहेर मॉल्समधे, रस्त्यावर - सगळीकडे हीच वनराई पसरलेली. महिन्यापूर्वीच इराने सभारंभासाठी असावा म्हणून फुलापानांचा इविनींग झगा आणला होता.

“हे पहा इरा, मला काहीही घोटाळे नकोत. ही पहिली मोहीम अगदी छान झाली पाहिजे. कंपनीचे भवितव्य ह्यावर विसंबून आहे. पृथ्वी पर्यटनातून अमाप निधी उपलब्ध होणार आहे. कंपनीसाठी तसेच अधिपतींसाठी तो फार महत्त्वाचा आहे. मला प्रवाशांकडून कुठल्याही तक्रारी नकोत. तसेच अधिपतींकडून देखील नियम मोडले गेल्याची पत्रे नकोत. प्रवासी खूष व्हावेत म्हणून आपण एक खास परवानगी घेतली आहे. अंभिक सरोवराला लागून असलेल्या रिसॉर्टमधे तुमची उतरण्याची सोय आहे. हा भाग फक्त सरकारी अधिका-यांसाठी राखून ठेवलेला आहे. पण केवळ आपल्या कंपनीसाठी तो मिळविण्यात मी यशस्वी झालो. पाचव्या वैश्विक युद्धात नष्ट होण्याआधीची पर्वतराजी, सरोवरे आणि वनराई तिथे खास प्रवाशांसाठी निर्माण केली आहे. आसपास दीड हजार अंतराघ्रांपर्यंत आदिवासींचा मागमूस देखील नाही. पुरातन काळातील राहणी कुठल्याही धोक्याशिवाय बघता येईल. तसेच जमिनीत लागवड केलेल्या पदार्थांपासून आदिवासी पद्धतीने शिजविलेली ऊर्जा तुम्हाला तिथे घेता येईल. आपल्या ऊर्जा कारज्यांपेक्षा हा वेगळा प्रकार प्रवाशांना नक्कीच आवडेल.”

शिजविलेले अन्न तोंडाने चावून आदिम मानवाप्रमाणे ऊर्जा मिळवायच्या कल्पनेने इराला हसू फुटले. एरवी कारंज्यामधून ऊर्जा घेऊन तरतरी मिळविणारे दहा-पंधरा मंगळमानव कुठलासा हिरवा

चोथा चघळून पोटात ढकलताहेत. कसे वाटेल? पण पुरातन काळात थोडावेळ डोकावण्यापुरते ठीक आहे! “सर, तुम्ही काळजी करू नका. मी सगळे व्यवस्थित बघेन.”

“माझा तुझ्यावर विश्वास आहे म्हणूनच मी तुला पाठवित आहे. मात्र माझा विश्वास धुळीस मिळवू नकोस. तिथून काहीही वस्तू इथे आणायची नाही हा महत्त्वाचा नियम तू आणि सगळे प्रवासी पाळतील ह्याची जबाबदारी तुझी आहे. कुठलेही विषाणू इथे येऊ नयेत ह्यासाठी अधिपती मंडळ जागरुक आहे.” इराने पुन्हा एकदा कंपनी अधिका-यांना खात्री दिली की ती सगळ्या नियमांचे काटेकोर पालन होते आहे ह्याकडे लक्ष देईल.

************************************



पृथ्वी यात्रा सुरू झाली. इराने आपला सगळा प्रवासी गट नीट बघून घेतला. पाच तरुण, चार तरुणी, दोन वरिष्ठ नागरिक आणि चार किशोरवयीन असे सहकारी प्रवासी होते. यानात बसल्या बसल्या सगळ्यांचा एकमेकांशी अल्फा सुरू झाला. प्रवासी नेता ह्या अधिकाराने इराला सगळ्यांचे संवाद नीट उलगडता आले. त्यांची उत्सुकता, पुरातन भूमीवर जाण्याचे थोडेसे भय आणि डोक्यात कितीतरी प्रश्न! इराने हे बरेचदा बघितले होते. तिने वेळ न दवडता आपले प्रास्ताविक भाषण त्यांच्यात उलगडायला सुरवात केली.

“सुस्वागतम. आकाशगंगा पर्यटनाच्या पृथ्वीयात्रेत आपले स्वागत. आपले नारदभ्रमरी यान फक्त तीन चंडतासांत पृथ्वीवर पोहोचणार आहे. पाचव्या विश्वयुद्धात नष्ट होण्याआधीची पुरातन पृथ्वी आपणास बघायला मिळेल. प्रवाशांसाठी केलेल्या खास रिसॉर्टवर आपण रहाणार आहोत. आसपासचा निसर्ग बघायला आपण जाऊ आणि फिरून थकल्यावर आदिम जेवणाचाही आनंद घेता येईल.”

“हॅ हॅ! म्हणे आदिम जेवणाचा आनंद!” एका किशोर मुलाने त्याच्या मित्राला अल्फा केला. “मी तर असले काहीही खाऊन बघणार नाही. मागे एकदा पिकनिकमधे ऊर्जा कारंजे बिघडले होते तेव्हा असला चोथा चघळला होता. मला तर उलटीच झाली होती.”



त्यांचा हा संवाद झाल्या झाल्या इराला बाकीच्यांचे देखील अल्फा उलगडू लागले. तो गलबला उलगडून इराचे डोके भणभणले. तिने अल्फा स्वीकार बंद केला आणि आपले भाषण पुढे सुरू केले.

“तुमच्यापैकी काही जणांना माहित असेल पण सहलीसाठी पुन्हा सांगते. पाचव्या विश्वयुद्धात पृथ्वीवरील मानवाची प्रचंड हानी झाली आणि ते पुन्हा आदिवासी अवस्थेत पोहोचले. विश्वयुद्धात सर्व नष्ट होणार हे जाणून विविध क्षेत्रातील निवडक तज्ञ व्यक्तींनी आधीच खबरदारी घेऊन ठेवली होती. एक हजार

नागरिक त्यावेळचे तंत्रज्ञान आणि संस्कृती घेऊन मंगळावर वस्तीला आले. इथे सर्व क्षेत्रात मानवाने प्रचंड प्रगती केली. पुरातन मानवांना ग्रासणारे दोन विषाणू- भाषा आणि मन ह्यांचे संपूर्ण उच्चाटन करण्यात मंगळनिवासी मानवाला यश आले. सर्व प्रकारच्या भाषा आपोआपच नष्ट झाल्या. थेट मेंदूत अल्फा करण्याची सोय झाल्यामुळे कुठल्याही शब्दांची गरजच राहिली नाही. सर्व संवाद थेट न्यू न्यूरल लहरींनी होऊ लागले. मन नावाच्या भयानक विषाणूसमुहाचा डीनएमधून संपूर्ण नायनाट केल्यामुळे सर्व मंगळ निवासी मानव एकसंध झाला. आज आपण ह्या प्रगत अवस्थेत पोहोचलो आहोत. आदिवासी मानवापासून आपण सगळ्याच अर्थाने खूप दूर आलेलो आहोत. तरीही आपल्याला आपले मूळ ठिकाण बघण्याची आतुरता आहे. तिथे पोहचल्यावर पुरातन सृष्टी आपल्याला दिसेल. तिचा फक्त तेथेच आनंद लुटा. तेथून कोठलीही वस्तू आणणे हे धोक्याचे आहे. काहीही आणायला परवानगी नाही हे लक्षात ठेवा.”

***********************************

पृथ्वीवर पोहोचल्यानंतरचे सगळे सोपस्कार होऊन मंडळी आपापल्या कक्षांमधे विसावली. थोडा आराम झाल्यावर सगळ्यांचे आलिशान हवाई वाहनामधून आजूबाजूच्या पर्वतराजीभोवती उड्डाण झाले. सरोवराच्या बाजूने भटकंती झाली. मंगळाच्या आकाशासारखी तेथे धूसर संरक्षक चादर नव्हती तर स्वच्छ निळा, नितळ रंग वर सर्वत्र पसरला होता. संरक्षक कवच नसल्यामुळे तिथून सूर्य देखील फार प्रखर आणि भाजणारा वाटला. तसल्या प्रकाशाची मंगळवासींना सवय नसल्याने प्रत्येकाने युव्हीसारक कपडे आणि डोळ्यांवर आवरणे लावली होती. इराने प्रवासी पत्रक वाचलेलेच होते. त्यामुळे काही उत्साही प्रवाशांना घेऊन अगदी पहाटे ती सरोवराच्या काठावर गेली होती. तिथून सूर्योदय खूप वेगळा दिसतो म्हणे आणि तसा तो त्यांना बघायलाही मिळाला. मंगळावर संरक्षक चादरीमधून दिसणारा सूर्य एक छोटासा फिक्कट गोल असतो. पृथ्वीवर मोठा केशरी गोलाकार उगवता सूर्य सगळ्यांनी बघितला. सरोवरात पृथ्वीवरचे काही जीव तरंगत होते. उंच शुभ्र माना वाकवून वाकवून ते ह्या पाहुण्यांकडे बघत होते. त्यांचा क्वॅक क्वॅक आवाज कोणालाच समजला नाही. पण काही अनाकलनीय अल्फा मात्र मेंदूत उलगडल्या. नक्कीच त्यांना काहीतरी सांगायचे असेल. पण फ्रिक्वेंसी जमत नसल्याने इलाज नव्हता. पुढच्या वेळेस ह्यांचा अल्फा कन्वर्टर आणायला हवा! पिवळ्या ओठांचे तरंगते विचित्र जीव बघून सर्वांनी वेगळे काहीतरी पाहिल्याची नोंद केली. “ह्यांना बदक असे म्हणतात,” इराने माहिती पुरविली.

थकूनभागून रिसॉर्टवर परत आल्यावर अन्न शिजवून चावण्याचा आदिवासी सोहळा पार पडला. बहुतेकांनी ते नाममात्रच चाखले. त्यानंतर सगळी मंडळी घाईघाईने आपापल्या कक्षात ऊर्जा कारंजी फवारायला पळाली. इराने मात्र पर्समधून छोटे ऊर्जाकारंजे काढून थोडासाच वाफारा घेतला. थोडाच - कारण तिने ताटलीमधले शिजविलेले सगळे अन्न चवीने खाल्ले होते. कितीतरी विचित्र प्रकार होते त्यात! अगदी आदिमानव करीत असावेत तसेच! पोट एकदम जडजड भासू लागले. म्हणून थोडा उर्जा फवारा घेतला आणि

एकटीच भटकायला ती बाहेर पडली.

रिसॉर्टच्या बागेत जमिनीत उगवली जाणारी कित्येक विचित्र फुले, वेली आणि झाडे होती. त्यासाठी केवढी तरी जमीन व्यापली गेली होती. ही अकारण उधळपट्टी पाहून इरा अचंबित झाली. मंगळावर जमिनीचे मोल सगळ्यांनाच माहित होते. अणुछापकासारखा स्वस्त आणि तडक उपाय असतांना अशी वनराई उगविण्यासाठी प्रचंड जमीन आणि वेळ वाया घालविणे म्हणजे खरोखर मूर्खपणाचे होते. पण हे केवळ प्रवासी केंद्र असल्यामुळे इथे हे मुद्दाम खर्च करून उभारले आहे. प्रवासी उत्पन्नाचे ते मोठे साधन आहे हे इराला माहीत होतेच.

पुष्पवाटिकांमधे खूप वेगवेगळ्या रचना होत्या. मागे सरोवराच्या निळाईचा पडदा. त्यासमोर ही कुठेही न पाहिलेली चमत्कारिक पुष्पवाटिका! इरा क्षणभर मोहून गेली. पुन्हा एकदा डोक्यात प्रचंड गच्चपणा आणि त्यात कोंदलेल्या वादळाचा दबाव तिला छळू लागला. मेंदूचक्रवाताचा झटका होता पुन्हा! इराने घाईने पर्स धुंडाळली. पण न्यूरल फवारा कक्षातच राहिला असावा. गच्चपणा अतिशय वाढला. डोके फुटते की काय असे वाटले. ह्या विचित्र पुष्पवाटिकेचा हा परिणाम असावा! विचारांच्या त्या भरात इराने झपाटल्यासारखी पुष्पवाटिकेतली चार फुललेली रोपे मुळापासून उपटून पर्समधे कोंबली आणि ती कक्षाकडे वळली. टेबलवर पडलेला न्यूरल फवारा नाकात मारताच ती पुन्हा भानावर आली. वेडाचा जोर ओसरताच तिने पर्समधील रोपे बाहेर काढून पाहिली. आपण हे काय केले! तिला माहीत होते की मातीबाहेर ही रोपे मरतात. परंतु बाहेर जाऊन पुन्हा ती मातीत रोपण्याची तिला फार भीती वाटली. कोणी पाहिले तर त्याला काय उत्तर द्यायचे? रोपे मरू नयेत म्हणून तिने एका बाटलीत पाणी घेऊन त्यात मुळे बुडवून ठेवली. पण दोन तासांमधे ती मलूल झालेली वाटली. रात्री बाहेर जाऊन इराने पुष्पवाटिकेतली माती एका पिशवीत भरून घेतली आणि रोपे त्या पिशवीत खोवून ठेवली.

सहल संपली. दुस-या दिवशी परत निघायचे होते. पिशवीमधली रोपे आता ताजीतवानी दिसत होती. कालच्या कळ्यांनी फुलून मखमली पाकळ्या उघडल्या होत्या. तो गहिरा निळा रंग पाहून इरा पुन्हा भोवरली. तोच गच्चपणा जाणवू लागला. नाकात स्प्रे मारता मारताच इराने पुष्परोपे मंगळावर परत नेण्याचा वेडा निर्णय घेतला. सहलीसाठी नेलेले कंपनीचे बरेच सामान होते. एका डब्यामधे तिने सफाईने रोपांची पिशवी दडविली. त्यात पाणी शिंपडायला ती विसरली नाही. परतीच्या सफरीत कंपनीचा शिक्का असलेला तो डब्बा तिने स्वत:जवळच ठेवला.

****************************

अप्रतिम सहल झाल्याबद्दल सर्व प्रवाशांनी इराला तोंडभरून धन्यवाद दिले. यानस्थानकावर सगळ्यांच्या सामानाची तपासणी झाली तेव्हा इरा टेन्स होती. पण कंपनीचा शिक्का असलेला तो डबा कोणी उघडायला लावलाच नाही. इराची पुष्परोपे सुखरुप घरी पोहोचली.

****************************

घरी आल्यावर इराने घाइघाईने एका

प्लास्टोफ़ेबच्या कुंडात ती रोपे लावली. फुले, कळया सगळी गळून गेलेली. ती रोपे जगणार नाहीत असे तिला वाटून गेले. पण प्रयत्न करायला हवा होता. तिने अल्फावेबवर नायट्रोजन खुराकांची ऑर्डर दिली. त्या गोळ्या लगेच तिच्या घरी पोहचत्या झाल्या. चार-पाच दिवस खुराक देताच सगळी रोपे एकदम तरारली. पंधरा दिवसात फांद्यांवर कळयाही डोकावू लागल्या. इरा खूपच थरारून गेली. छापलेली फुले घरात सजविण्याऐवजी स्वत: जोपासलेली ही मखमली फुले तिला मिळणार होती! तिने तर वाचले होते की अशा रोपांना स्वत:ची पिल्ले देखील होतात. इरा त्या दिवसाची वाट पाहू लागली. आणि खरोखरच एक दिवस कोवळया अंकुरांनी मातीमधून डोके वर काढले! वाहवा! म्हणजे माझी स्वनिर्मित बाग मी फुलवू शकते! पुन्हा डोक्यात गच्चपणाचा विस्फोट. पुन्हा नाकात न्यूरल फवारा! आता इराला मेंदूचक्रवाताचा झटका देखील हवाहवासा वाटू लागला होता. आपल्याला वेड तर लागले नाही ना? डॉक्टरकडे जाऊ या का? पण नकोच. ते वेड मजला हवेहवे........

****************************



विषाणू निवारक केंद्रामधे सिंतूर आणि गेबी ह्या दोन विशेष अधिका-यांमधे अल्फा-शून्य पातळीवर गुप्त चर्चा सुरू होती. अल्फा-शून्य म्हणजे नेहमीप्रमाणे हवेमधून अल्फा लहरी ग्रहण न करता ते दोघे वायरमधून अल्फा लहरी एकमेकांकडे पाठवित होते. ही चर्चा एवढी गुप्त ठेवण्याचे कारण म्हणजे मंगळाचे भवितव्य यावर अवलंबून होते.

बसून थोडे अवघडल्यासारखे झाले तेव्हा सिंतूरनी डोक्यावरचा अल्फा टोप काढून ठेवला आणि तो खिडकीपाशी गेला. संरक्षक आकाशात बाहेर पृथ्वीचा निळसर छोटा गोल उगवतांना दिसत होता. उंच इमारती असलेला भाग सोडला तर बाहेर सर्वत्र लाल माती पसरली होती. चाचणी ग्रूप जेव्हा पृथ्वीवर गेला, तेव्हा असे काय झाले असेल की सगळया पेशंटसना कमी अधिक प्रमाणात मेंदूचक्रवाताचे झटके आले होते? इथली लाल माती त्या झटक्यांना काबूत ठेवीत असेल कां? की आणखी काही? असेही कानावर आले होते की आदिम मानवी जीन्स मधून काढून टाकलेले विषाणू पृथ्वीवरील मातीच्या सान्निध्यात जोर धरून उफाळतात. पण मग कंट्रोल ग्रुपच्या तिघांवर काहीच परिणाम का नव्हता? निळया पृथ्वीगोलकाला एकटक बघतांना सिंतूर थोडावेळ स्वत:ला विसरला. पण लगेच स्वत:ला सावरून तो टेबलाकडे गेला आणि त्याने अल्फा टोप डोक्यावर चढविला.

“मला तर फार धक्का बसला आहे. म्हणजे आपण पर्यटनाच्या नावाखाली चाचणी ग्रूप पृथीवर पाठविला, तेव्हा मला कल्पना नव्हती की मेंदूचक्रवाताने पीडित लोकांपैकी एखाद्याला एवढा तीव्र झटका येईल! नाही, आपण सौम्य झटक्यांची कल्पना केली होती.” सिंतूर म्हणाला.

“होना! गेबीने मान डोलाविली. “मेंदूचक्रवात नेहमीच

फवारा घेतला की काबूत येतो. पण अर्थात आतापर्यंत आपण हे सगळे मंगळाच्या सुरक्षित दुनियेत राहून पाहिले. आता अधिपतींना उत्पन्नासाठी पृथ्वी पर्यटन सुरू करायचे आहे तर ही चाचणी आवश्यकच होती. मात्र मानवाच्या डीएनए मधूनच हद्दपार केलेला "मन" हा भयानक विषाणू पृथ्वीवरील वातावरणाच्या सांनिध्यात एवढा उफाळून येईल असे वाटले नव्हते."

सिंतूरने हातातली कुलूपबंद पेटी उघडली. त्याने की-कोडेड अल्फा अहवाल बाहेर काढला. फक्त निवडक लोकच तो उलगडू शकतील अशी तरतूद त्यात होती. गेबीची इलेक्ट्रॉनिक संमती जोडली की अधिपतींकडे तो अहवाल पोहचवायचा.

*********************************

सिंतूरचा अहवाल-

"पुरातन पृथ्वी कलहांनी पछाडली होती. तिथली ९० टक्के युद्धे, कलह योग्य संवादाअभावी व्हायचे. संवादाचे वाहन म्हणून तिथे विविध प्रकारच्या भाषा वापरायचे. लिखितभाषा, बोलीभाषा, चित्रभाषा व देहबोली असे अनेक प्रकार होते. यापैकी कुठल्या ना कुठल्या भाषेमधे विचार मांडल्याखेरीज ते दुस-यापर्यंत पोहचविता न येणे ही त्या मानवजातीची दुर्दैवी अक्षमता होती. ह्या कमतरतेमुळेच अगदी आरंभापासून मानवजात आपापसातील कलहांनी पीडित होती.

याच कमतरतेचा दुसरा भाग देखील होता. संवाद ऐकणा-याच्या बुद्धीचा भाग. आणि हा भाग तर संवाद देणा-या पहिल्या भागापेक्षाही जास्त कमकुवत होता! कुठल्याही प्रकारची भाषा असो, ती कितीही कौशल्याने वापरून देणा-याने संदेश दिला तरी संदेश घेणारे आपापल्या मनाप्रमाणे त्या संदेशाचा अर्थ लावण्यास मोकळे होते. त्यावेळी मानवाला "मन" हा त्यांच्या डीएनए मधे शिरून बसलेला एक मोठा विषाणू आहे हे माहीत नव्हते. मानवी डीएनए मधेच मन नावाचा विषाणू म्हणजेच आपापसातील कलहाचे मूळ रोपले गेले होते. संवाद वाहणारी भाषा आणि त्याचा अर्थ लावणारे मन हे दोन प्रचंड मोठे मूलदोष मानवजातीच्या वाट्याला आले होते. ह्याचाच परिपाक म्हणजे पाचवे वैश्विक महायुद्ध. त्यात पृथ्वीवरील बहुतांश मानवजात नष्ट झाली. उरलेले मानव आदिवासी अवस्थेत पोहोचले. आपल्या काही दूरदर्शी पूर्वजांनी आधीच तरतूद करून ठेवली होती म्हणून आज मंगळावर अतिशय प्रगत अशी मानवजात जिवंत ठेवण्यात आपण यशस्वी झालोय.

पुढचा भाग सगळ्यांना माहीत असलेला मंगळाचा इतिहासच आहे. अहवालाच्या पूर्णतेसाठी येथे देणे आवश्यक आहे. पुरातन मानवाला ग्रासलेला विषाणू - म्हणजे संवादासाठी भाषेची आवश्यकता. ह्या विषाणूचा नायनाट आपण अल्फा उलगडणी साधून केला. आता आपल्या डीएनए मधेच मेंदूत अल्फा उलगडले जाण्याची सूत्रे आहेत. त्यामुळे शब्दातीत विचार एकमेकांना कळून अर्धी समस्या दूर झाली आहे.

परंतु पुरातन मानवात सगळ्यात भयानक विषाणू म्हणजे व्यक्तिगत मन हा होता. अनेक प्रकारच्या भावना नावाच्या विघातक प्रवृत्तींना जन्म देऊन हे "मन" विषाणू कोठलेही संघटक कार्य असफल करायचे. यामुळेच मानवजात प्रगती न करता एकमेकांत भांडत राहिली.

मंगळावर आपण पद्धतशीर वैज्ञानिक उपाय करून डीएनए मधून मन विषाणू नष्ट केला ... म्हणजे अगदी समूळ नष्ट करता आला नाही, पण मेंदूतले मन केंद्र निष्प्रभ करण्यात आपण यशस्वी झालो. मात्र पुढे काही थोड्या लोकांमधे मेंदूचक्रवात रोगाची लागण दिसू लागली. हा मेंदूचक्रवात म्हणजे दुसरे तिसरे काही नसून मन विषाणूंचाच प्रादुर्भाव होता ही गोष्ट आपण गुपित ठेवली. ताबडतोब उपाय करणारा नाकात घ्यायचा फवारा तयार करून आपण ह्या उचल खाल्लेल्या मनावर पुन्हा मात देखील केली.

मात्र आता इराच्या उदाहरणावरून असे सिद्ध झाले आहे की पृथ्वीवरील वातावरणाच्या सान्निध्यात मेंदूचक्रवाताच्या रोगींना पुन्हा मनाची लागण होऊ शकते. मंगळमानवाचे भवितव्य सुरक्षित रहावे म्हणून काही गंभीर पावले उचलण्याची अत्यंत आवश्यक्यता आहे.

1) इरा सारख्या विषाणू वाहकांना शोधून त्यांचा ताबडतोब बंदोबस्त करावा.

2) पृथ्वीवरील प्रवासी यात्रा तहकूब कराव्यात. मिळणा-या उत्पन्नापेक्षा कितीतरी पटींनी जास्त धोका त्यात आहे.

अहवाल वाचून गेबीने संमती नोंदविली. ठीकाय. हे झाले. आता इराला इस्पितळात धाडण्याचे महत्त्वाचे कार्य मी स्वत:च्या देखरेखीत पार पाडले की माझ्यासाठी हे प्रकरण संपले.

**********************************

सकाळीच इराच्या दारावरची बेल वाजली. बेल वाजविणारे असे आगंतुक कोणीच येत नाहीत. इराला खूपच आश्चर्य वाटले. दार उघडताच काळे गणवेष घातलेल्या दोन व्यक्ती अधिकाराने आत शिरल्या. दटावणीच्या अल्फात इराला संदेश उलगडला गेला. “इरा इब्लोन, तू मेंदूचक्रवाताच्या अंतिम स्थितीत गेली आहेस. मंगळवासियांच्या सुरक्षेसाठी तुझ्या मेंदूवर सुधारक शस्त्रक्रियेची अतिशय आवश्यकता आहे. तेव्हा ताबडतोब तू आमच्या बरोबर येत आहेस.” गेबीने चपळाईने इराच्या दंडात सुई खुपसली.

रुग्णवाहिकेत बसण्याअगोदर पृथीवरच्या रोपांचे कुंड चपळाईने स्वत:च्या बॅगेत भरायला गेबी विसरला नव्हता!

शुद्ध हरपलेल्या इराला स्ट्रेचरवर झोपवून रुग्णवाहिका वि वॉ वि वॉ करीत वेगाने इस्पितळाच्या दिशेने निघाली. आपला सहकारी बघत नाही असे पाहून गेबीने हळूच नाकात फवारा मारला, तेव्हाच त्याच्या डोक्यातला गच्चपणा थोडा कमी झाला!



# प्रतिबिंब - अतुल टेमुर्णिकर



**शब्दांकन:निरंजन नगरकर**

**१. आपली पूर्वपिठीका सांगाल का? जसे आपले भारतातील वास्तव्य, शिक्षण आणि आपले सिंगापूरात कसे आगमन झाले?**



भारतात माझं बालपण नागपूरमध्ये गेलं. १९९१ मध्ये एचसीएल टेक्नॉलॉजिज इंडिया या कंपनीमार्फत माझी नेमणूक झाली तेव्हापासून मी सिंगापूरमध्ये राहात आहे. १९९७ मध्ये मी आयबीएम कंपनीसाठी काम करु लागलो. आयबीएम आणि एचसीएलसारख्या कंपन्यांमध्ये चौदा वर्षे काम केल्यावर मी सिंगापूरमधील ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल नावाचे पहिले भारतीय आंतरराष्ट्रीय विद्यालय स्थापन केले.

**२. इथे शाळा काढावी असे का वाटले? शाळा सुरू करतांना आपल्याला कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले?**

भारतीय मूल्ये अंतर्भूत असलेला आणि तरीही स्थानिक समाजाच्या पद्धतींशी जुळणारा व स्थानिक गरजा पूर्ण करणारा अभ्यासक्रम देऊ शकेल अशी दोन्हीकडच्या उत्तम गोष्टींचे संतुलन साधणारी संस्था तयार करणे हा हे विद्यालय स्थापण्यामागचा हेतू होता. १९९० मध्ये जेव्हा मी सिंगापूरमध्ये आलो तेव्हा इथली शिक्षणपद्धती भारतीय परदेशस्थ समाजासाठी आणि विशेषत: दोघेही नोकरी करणार्या पालकांसाठी चिंतादायक अशी होती. एका भारतीय शिक्षणसंस्थेची निकड प्रकर्षाने जाणवत होती.

सिंगापूर सरकारच्या मदतीमुळे, आधारामुळे आणि अविरत प्रोत्साहनामुळे आम्ही अनेक आव्हाने समर्थपणे पार करू शकलो आणि मुख्यत: अभ्यासक्रम व परिपूर्ण शिक्षणासाठी GIIS समाकुळात सहभागी होण्यासाठी

पालकांना उद्युक्त करेल अशी संस्था उभारण्यात यशस्वी झालो.

**३. सद्य स्थितीत शाळेच्या प्रगतिबद्दल आणि भविष्यातील योजनांबद्दल काही सांगाल का?**

आज वेगवेगळ्या सात देशांमध्ये GIISची एकूण वीस आस्थापने आहेत. आमच्या व्यवसाय संवर्धन योजनेत आम्ही सध्या जिथे दर्जेदार शिक्षणाची गरज आहे आणि जिथे सामाजिकदृष्ट्या GIIS महत्त्वपूर्ण कामगिरी करु शकेल अशा काही जागांवर लक्ष केंद्रित केले आहे. जिथे उच्च दर्जाच्या शाळांसाठी भरपूर मागणी आहे अशा बाजारपेठांमध्ये भारतातली काही निवडक शहरे आणि कतार, सौदी अरेबिया व ओमान हे देश आहेत. सर्वोत्कृष्टतेसाठी कटिबद्ध असतील असे उद्याचे अद्वितीय नेते घडवण्याचा आमचा वसा आहे आणि त्याच्याशी आमची शैक्षणिक मूल्ये अनुरुप अशीच आहेत. GIISमध्ये शिक्षण म्हणजे फक्त शालेय वा पुस्तकी ज्ञानाइतकेच मर्यादित नाही तर संपूर्ण जगात बदल घडवून आणू शकतील असे विचारपूर्वक व सूज्ञ निर्णय घेऊन त्यावर जबाबदार कृती करण्यापर्यंत त्याची व्याप्ती आहे.

४. आपण महाराष्ट्र मंडळाचे एक सल्लागार म्हणून मंडळाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?

एक जबाबदार आणि उत्स्फूर्त संस्था म्हणून महाराष्ट्र मंडळ समितीने सिंगापूरची सामाजिक व सांस्कृतीक मूल्ये आपलीशी करण्यास व स्थानिक लोकांमध्ये मिसळण्यास सभासदांना प्रोत्साहन दिले पाहिजे. इतर समाजगटांशी सौहार्दपूर्णतेने व्यवहार सिंगापूरस्थित भारतीय व सिंगापूरचे नागरिक यांच्यात अधिक मेळ घालण्यासाठी व एकमेकांना अधिक चांगल्या रितीने समजून घेण्यासाठी आवश्यक आहे. या प्रकारेच एकमेकांबद्दल आदरभाव आणि विश्वास प्रकट केला जाऊ शकतो.

**५. या शाळेद्वारे तुम्ही सिंगापूर मधील भारतीयांना एकप्रकारे आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवत आहात त्याबद्दल काही सांगाल का?**

ग्लोबल इंडियन फाऊंडेशन नावाची GIISची एक संलग्न संस्था २००२ मध्ये ना-नफा तत्त्वावर स्थापन करण्यात आली. या संस्थेअंतर्गत ग्लोबल इंडियन कल्चरल सेंटर (GICC) हे केंद्र आग्नेय आशियातील वैविध्यपूर्ण समाजांना भारतीय उपखंडातील समृद्धतेने नटलेल्या सांस्कृतिक परंपरांची माहिती करून देण्यासाठी एक आदर्श वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करते. एक सर्मसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी आपल्या सामाजिक-सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे परदेशस्थ भारतीय व स्थानिक नागरिक या दोन्हींना एकत्र आणून एकमेकांबद्दलची सामाजिक व सांस्कृतिक ओळख दृढ करण्याचा प्रयत्न ग्लोबल इंडियन फाऊंडेशनमार्फत केला जातो.

सांस्कृतिक केंद्राने सुरु केलेला योगाभ्यासक्रम सिंगापुरी व भारतीय लोकांमध्ये सारखाच लोकप्रिय आहे.

महात्मा गांधी विचार व मूल्य केंद्रामार्फत (MGCUV) महात्मा गांधींच्या आजच्या परिस्थितीत अधिकच लागू असलेल्या मूल्यांबद्दल व शिकवणुकीबद्दल सखोल जाणकारी उपलब्ध केली जाते.

गेल्या वर्षी ग्लोबल इंडियन फाऊंडेशन (GIF) व सिंगापूर इंडियन डेव्हलपमेंट असोसिएशन (SINDA) या दोन संस्थांनी संयुक्त उपक्रम सुरु केले आणि SINDAच्या STEP व Project Teach या दोन मुख्य शैक्षणिक उपक्रमांसाठी GIF ने दहा लाख डॉलर्सची देणगी जाहीर केली.

**६. आपले छंद कोणते?**

गेल्या काही वर्षांमध्ये माझे छायाचित्रणकलेबद्दलचे प्रेम स्पष्टपणे बहरुन आले आहे. मला यंत्रोपकरणांबद्दलही जन्मजात आकर्षण वाटत आलेले आहे. श्रमपरिहार करण्यासाठी तो माझ्यासाठी एक अतिशय चांगला मार्ग आहे. कामानिमित्त बराच बहुमूल्य वेळ घराबाहेर जात असल्याने मला माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवायला, मुलांसोबत खेळायला आणि संगीत ऐकायला आवडते. ध्यानधारणा मला माझ्या एकाग्र होण्यासाठी व दररोज नवनवीन आव्हाने स्विकारण्यासाठी मदत करते.

**७.एखादा संदेश?**

विविधतेचे महत्त्व ओळखा आणि विविधतेतून एकता जपण्याचा निश्चय करा.

**मुलाखत: मुक्ता पाठक शर्मा**

# राशी भविष्य

## नववर्षाभिनंदन

### मेष



मेष राशीच्या व्यक्तींवर त्यांच्या स्वामीकडून, गुरूकडून कृपादृष्टीचा वर्षाव होणार आहे. तुमच्या नवव्या घराचा स्वामी (भाग्येश) तुमच्या चौथ्या आणि पाचव्या घरात असणार आहे. त्यामुळे 2015 सालातील पहिले सहा महिने कौटुंबिक आयुष्य सुखाचे राहील. तुम्ही परदेशात जाण्यासाठी प्रयत्न करत असाल तर हा काळ तुमच्यासाठी अनुकूल आहे. नवीन कार किंवा घर घ्यायची आहे? थोडेसे प्रयत्न करा आणि तुमची इच्छा पूर्ण होईल. दुसऱ्या सहामाहीचा काळ प्रेम आणि लग्नासाठी एकदम योग्य आहे. ज्या दांपत्यांना अपत्य हवे आहे त्यांना या कालावधीत अपत्यप्राप्ती होईल. उद्योजक त्यांच्या कामाची व्याप्ती वाढवतील. तुम्ही एखाद्या नवीन योजनेसह नवे काम सुरू कराल. राशी भविष्य 2015 अनुसार तुम्हाला या काळात वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक वृद्धीसाठी हा सुयोग्य काळ आहे. असे असले तरी आठव्या घरात असलेला शनि आणि सहाव्या घरात असलेला राहू यामुळे तुमच्या कौटुंबिक आणि आरोग्याच्या आघाडीवर तुम्ही स्वस्थ नसाल. तुम्ही याबाबत वेळोवेळी विचार करायला हवा. १२ व्या घरात असलेल्या केतू हेच दर्शवतो की, तुम्ही अडचणीत सापडून अतिउत्साहीपणे वागण्यापेक्षा दुसऱ्यांचा सल्ला घेणे चांगले. विद्यार्थ्यांच्या कष्टाचे चीज होईल

## वृषभ



2015 साला गुरू तुमच्यावर खुश असल्याचे दिसत आहे. गुरूच्या अनुकूलतेमुळे तुम्ही योग्य दिशेने प्रवास कराल आणि तुम्हाला यशही मिळेल. तुम्ही तुमचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडालच, त्याचबरोबर तुम्हाला आदर, सन्मान मिळेल आणि तुमची प्रशंसा होईल. असे असले तरी वृषभ राशी भविष्य 2015 सालच्या कुंडलीनुसार शनि आठव्या घरात असल्यामुळे आर्थिक उत्पन्न मिळण्यात थोडे अडथळे निर्माण होतील. पण काळजी करू नका, सुखाचे मूल्य तुम्हाला जाणवावे यासाठीच आनंदाच्या क्षणांआधी तुम्हाला थोडे कष्ट सोसावे लागतील. त्याचबरोबर तुमच्या खासगी आयुष्यात अनुरूपतेचा अभाव निर्माण होईल. पण थोडेसे प्रयत्न करून तुम्ही सगळे अडथळे पार करत विजयी व्हाल. तुमच्या खासगी आयुष्याबाबत बोलायचे झाले तर पाचव्या घरात असलेला राहू हेच दर्शवतो की, प्रेमात सत्यता आणि प्रामाणिकपणा हे घटक अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामुळे तुम्ही तुमच्या जोडादाराशी प्रामाणिक राहाल, याची काळजी घ्या. संपत्तीविषयी सांगायचे झाल्यास, हे वर्ष अत्यंत उत्तम असणार आहे. फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या उपकरणांवर थोडासा खर्च होईल. वृषभ राशीच्या विद्यार्थ्यांना 2015 सालात काही अनपेक्षित निकाल पाहावयास मिळतील.

## मिथुन



मिथुन राशीच्या व्यक्तींसाठी 2015 सालात जादूचा पेटारा उघडणार आहे. हे वर्ष तुमच्यासाठी आश्चर्यकारक ठरणार आहे. तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तींसाठी काही करण्याची इच्छा मनात बाळगली असेल तर तुमच्या प्रयत्नांना निश्चितच यश मिळणार आहे. याला आपण सकारात्मक अर्थाने ‘सोन्याहून पिवळं’ असं म्हणू शकू. 2015 सालात तुम्हाला नाव, प्रसिद्धी, संपत्ती आणि एखाद्याची जे जे मिळविण्याची इच्छा असते, ते सर्व तुम्हाला मिळेल. या पेक्षा अजून तुमची मागणी काय असेल? 2015 सालच्या मिथुन राशीच्या भविष्यानुसार आरोग्यसुद्धा स्थिर राहील. तुम्ही खूप वर्षांपासून एखाद्या आजाराचा सामना करत असाल तर त्यात या वर्षी सुधारणा झालेली दिसून येईल. एकूणच या काळात तुम्हाला जॅकपॉट मिळेल. संपूर्ण वर्षच प्रेमाप्राप्तीसाठी अनुकूल आहे. तुम्ही एखाद्या कंपनीत काम करत असाल आणि तुम्हाला बदल हवा असेल तर काही अधिक चांगले मिळविण्यासाठी हा योग्य काळ आहे. त्यामुळे एखादी नवीन संधी चालून आली तर अजिबात सोडू नका. दुसरीकडे, व्यावसायिकांना थोडे अधिक कष्ट करावे लागतील, पण लक्षात ठेवा, कष्टांचे फळ हे चांगलेच असते. त्यामुळे 2015 सालच्या मिथुन राशीची कुंडली हेच सांगते की, कष्ट करण्यात अजिबात कचरू नका. विद्यार्थ्यांबाबत सांगायचे झाले तर त्यांना चांगले निकाल मिळतील.

## कर्क



कर्क राशीच्या व्यक्तींसाठी 2015 हे वर्ष काही बाबतीत अत्यंत अनुकूल असणार आहे. तुमचे वय विवाहायोग्य झाले असले तर या वर्षी तुमचा लग्नयोग आहे. त्यामुळे तयार राहा! तुम्ही स्वतः लग्न कराल किंवा तुमच्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे लग्न होईल, त्यामुळे तुमचे घर हे लग्नघर असेल, हे निश्चित आहे. कर्क राशी भविष्य 2015 अनुसार प्रेमप्रकरणांमध्ये पिच्छा पुरवून काहीही साध्य होणार नाही. त्यामुळे संयमी आणि काळजीपूर्वक वागा. कामच्या बाबतीही 2015 साल हे उत्तम असेल. कामात बढती मिळण्याची शक्यता आहे. हा कालावधी तुमच्यासाठी अत्योत्तम असणार आहे, असे दिसते. कामाच्या निमित्ताने तुम्हाला प्रवास करावा लागेल. पण हा प्रवास बहुधा निष्फळ ठरेल. पण एकूणच 2015 हे वर्ष कर्क राशीच्या व्यक्तींसाठी आरामदायी असेल. तुमची आर्थिक बाजू या वर्षाय बळकट असली तरी आंधळेपणाने गुंतवणूक करणे योग्य राहणार नाही. शेवटी तुमच्यासाठी एक काळजीच कारण आहे. तुमच्या प्रकृतीमध्ये उतार-चढाव दिसून येतील. याचा अर्थ तुम्ही आजारी पडालच असे नाही. फक्त तुम्हाला थोडीशी काळजी घेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांसाठीसुद्धा हे वर्ष शुभ असेल. वर्षातील ९० टक्के कालावधी कर्क राशीच्या व्यक्तींसाठी अनुकूल असेल.

## सिंह



सिंह राशीच्या 2015 सालच्या कुंडलीनुसार हे वर्ष संमिश्र असेल. गोंधळून जाऊ नका. काही काळ खूप चांगला असेल तर काही काळ थोडासा उतार-चढावांचा असेल. 2015 सालातील पहिल्या सहा महिन्यांमध्ये गुरू तुमच्या १२ व्या स्थानात आहे आणि शनि चौथ्या स्थानात आहे. त्यामुळे तुम्हाला थोड्या अडथळयांचा सामना करावा लागेल. पण वैतागून जाऊ नका, हा तुमच्या क्षमता तपासण्याचा काळ आहे. तुमच्या आप्तेष्टांच्या वागणुकीचा तुम्हाला त्रास होऊ शकेल, पण तुलनेने वर्षाचा उत्तरार्ध अधिक चांगला दिसून येत आहे. तुमचे त्रास या कालावधीत हळुहळू कमी होतील. असे असले तरी या काळात तुम्हाला कुणी काही बोलले तरी फार मनावर घेऊ नका. 2015 सालातील सिंह राशीच्या कुंडलीनुसार या काळात स्थिर आणि शांत राहिलेले योग्य राहील. तुमच्या अचूनक योजनेमुळे तुम्ही कठीण परिस्थितीवर मात कराल. तुम्ही अत्यंत बुद्धिमान आहात. एकूणच या वर्षी अनेक औत्सुक्यपूर्ण घटना घडतील. 2015 या वर्षाच पुरेपूर वापर करून घ्या आणि तुम्हाला तुमच्या आत दडलेल्या क्षमतांचा शोध लागेल, ज्यामुळे तुम्ही कदाचित एक असामान्य व्यक्ती होऊ शकाल.

## कन्या



कन्या राशीच्या कुंडलीमध्ये 2015 सालाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये राहू ११ व्या स्थानात असेल. त्यामुळे तुम्हाला बराच फायदा होईल. हा तुमच्यासाठी अनपेक्षित घटनांचा काळ असणार आहे. या काळात कुटुंबातील सदस्यांचीसुद्धा भरभराट होणार आहे. पण राहू पहिल्या घरात असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे आवश्यक राहिल. पण यात काळजी करण्यासाठे फार कारण नाही. केवळ सतर्क राहा आणि प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घ्या. त्याचप्रमाणे या वर्षातील पहिले सहा महिने प्रेमसंबंध, विवाह आणि मुलांसाठी चांगले असतील. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणाच्या दृष्टीनेसुद्धा हा काळ अनुकूल आहे. कन्या राशी भविष्य 2015 अनुसार या वर्षात तुम्हाला खूप संधी मिळणार आहेत आणि जल्लोष करण्यासारखे खूप क्षण येतील. पण या वर्षाच्या उत्तरार्धात मात्र काळजी घेण्याची गरज आहे. तुम्हाला फक्त सतर्क राहण्याची गरज आहे, फार गंभीर घटना घडण्याची शक्यता नाही. खर्चात काही प्रमाणात वाढ होईल आणि प्रकृतीच्या कुरबुरी सुरू राहतील. काळजी करू नका, तुमच्याबद्दल फार वाईट काहीही होणार नाही. त्यामुळे संयमाने आणि विचाराने वागणे योग्य राहील.

## तुळ



तुळ राशींच्या व्यक्तींसाठी 2015 हे वर्ष लाभकारक आहे. तुळा राशींच्या व्यक्तींच्या कौटुंबिक आयुष्याबाबत सांगायचे झाले तर थोडे फार गैरसमज होण्याची शक्यता आहे. असे असले तरी एकोप्याला फार धक्का लागणार नाही. आरोग्याचा विचार करता 2015 साल उत्तम आहे. तुम्ही घर किंवा कार घेण्याचा विचार करत असाल तर आता त्या द्विधा मनस्थितीतून बाहेर पडा. ठोस निर्णय घ्या. 2015 चा उत्तरार्ध हा तुमच्यासाठी गुलाबी काळ असणार आहे. खासगी बाबतीत तुम्हाला अनेक आनंदाचे क्षण लाभणार आहेत. त्यामुळे या गुलाबी वातावरणाचा आस्वाद घेण्यासाठी तयार राहा. तुळा राशीच्या कुंडलीनुसार या वर्षभरात तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी काहीतरी विशेष करून दाखवणार आहात. तुम्हाला नवी उर्जा मिळाली आहे, असे वाटत आहे. नोकरीमध्ये बढती होण्याची खूप शक्यता आहे. लोकांकडून सहकार्य मिळे आणि तुमच्याविषयी असलेल्या आदर आणि सन्मानात वाढ होईल. शनि दुसऱ्या घरात आल्यामुळे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. तुम्हाला खर्च करताना हात थोडासा आखडता घेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष सकारात्मक राहील.

## वृश्चिक



2015 साली बहुतेक ग्रह तुम्हाला अनुकूल असतील. तुम्ही पूर्णपणे सुरक्षित असाल. त्यामुळे 2015 हे वर्ष तुमच्यासाठी खूप चांगले असेल. वृश्चिक राशीच्या कुंडलीनुसार फक्त शनिच्या स्थानामुळे थोडेसे उतार-चढाव असतील, बाकी सर्व एकदम उत्तम राहील. कारण सगळंच सुरळीत राहिलं तर जगण्यात मजा नाही, थोडे खाचखळगे, अडथळे असतील तर जगण्यातील लज्जत वाढते. कौटुंबिक सौख्य राहील. प्रेमाच्या संदर्भात 2015 हे वर्ष उत्तम राहील. शनि प्रथम स्थानात आल्यामुळे वैवाहिक आयुष्यात काही अडचणी निर्माण होतील. काही वेळाप्रेमासाठी झुरणेही चांगले असते. त्याचप्रमाणे तुम्हाला काही आरोग्याच्या तक्रारी सतावतील. काळजी करू नका, काहीही गंभीर घडणार नाही. हा काळ कामासाठी चांगला आहे. त्यामुळे कामाचा ध्यास घेणाऱ्यांसाठी हा काळ खूपच चांगला असेल. 2015 सालच्या वृश्चिक राशीच्या कुंडलीनुसार आर्थिक स्थिती चांगली राहील. त्यामुळे काय काय खरेदी करायचे आहे, याची एक यादी करून ठेवा. दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांच्या कष्टाचे चीज होईल. या वर्षाच्या उत्तरार्धात व्यवसायाशी निगडीत शिक्षण घेणाऱ्यांची प्रगती होईल.

## धनु



2015 सालाच्या सुरुवातील गुरू धनु राशीच्या आठव्या घरात आहे, ही फार सकारात्मक बाब नाही. असे असले तरी फारशी नकारात्मकही नाही. त्याचबरोबर शनि १२ व्या घरात आहे, त्यामुळे आर्थिक बाबी विचारपूर्वक हाताळाव्या लागतील. या सगळ्याचे व्यवस्थापन करताना घाबरून जाऊ नका. तुम्हाला माहीत आहे की, आर्थिक बाबतीत ओढाताण झाल्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. या समस्या सोडविण्यासाठी कष्ट करा. धनु राशी भविष्य 2015 अनुसार शांत आणि स्थिर मनोवृत्तीच्या व्यक्ती हे साध्य करू शकतात. त्याचप्रमाणे तुमच्या कुटुंबियांचा वागणुकीतही बदल झालेला तुम्हाला दिसून येईल. या बदलामुळे तुम्ही व्यथित होऊ शकता. प्रत्येक दृष्टिकोनातून तुम्हाला खंबीर करायचे, असे या वर्षाने मनावर घेतल्यासारखे वाटते. तुमच्यात असुरक्षिततेची भावना वाढीस लागेल, त्याचा तुमच्या प्रकृतीवरही परिणाम होईल. प्रेमप्रकरणांमध्येही फारसे समाधान लाभणार नाही. पण लक्षात ठेवा, जे होते, ते चांगल्यासाठीच होते. दुसऱ्या बाजूला 2015 सालाच्या उत्तरार्धात तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण होऊ लागतील. तुमच्या आयुष्यात पुन्हा एकदा आनंद निर्माण होईल. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल आणि विद्यार्थ्यांना अनुकूल निकाल मिळतील. हे वर्ष म्हणजे तुमच्यासाठी साहसी प्रवासच असणार आहे!

## मकर



मकर राशीच्या व्यक्तींसाठी 2015 सालातील पहिले सहा महिने उत्तम असतील. तुमच्या अचूक योजनांचे फळ या काळात तुम्हाला मिळेल. तुम्ही बुद्धिमान आहात. तुमच्या राहत्या जागी कार्यक्रमांची रेलचेल राहील. कामाच्या ठिकाणी सर्व काही सकारात्मक राहील. हा तुमच्यासाठी जल्लोष साजरा करण्याचा काळ आहे. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. तुम्हाला सगळीकडूनच सहकार्याचा हात मिळेल. तुमचे लग्नाचे वय झाले असेल तर 2015 सालात या बाबतीत काही सकारात्मक घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी खूपच अनुकूल आहे. त्यांचे प्रयत्न निश्चित यशस्वी होणार आहेत. असे असले तरी 2015 सालातील उत्तरार्ध मात्र काहीसा कठीण असेल. त्यावेळी गुरू तुमच्या आठव्या घरात असेल. परिणामी, आर्थिक समस्या उद्भवतील. त्यामुळे काहीही करताना विचारपूर्वक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. पण काळजी करू नका, अशा प्रकारचे गंभीर परिस्थिती उद्भवल्यावर तुम्ही सक्षमपणे तिचा सामना कसा करता हे चाचपण्याचा हा काळ आहे. त्याचप्रमाणे 2015 या वर्षात कोणत्याही ठिकाणी गुंतवणूक करताना दोन वेळा विचार करावा, असे ही कुंडली सांगते.

## कुंभ



कुंभ राशीच्या व्यक्तींसाठी 2015 हे वर्ष समिश्र घटनांचे राहील. 2015 या वर्षाच्या कुंभ राशीच्या कुंडलीनुसार तुमच्या जवळच्या व्यक्तींशी तुमचे संबंध काहीसे ताणलेले राहतील. पण लगेचच त्याने व्यथित होऊ नका, कारण जे काही होते ते चांगल्यासाठीच होते. तुमची काहीशी फटकळ भाषा हे त्यासाठीच एक कारण असू शकेल. त्यामुळे शक्य तितके विनम्रपणे वागा. कुटुंबातील व्यक्तीच्या आरोग्याच्या तक्रारींमुळे काहीसे तणावाखाली राहाल. पण खूप काळजी करण्याचे कारण नाही, कारण ही काळ पटकन निघून जाईल. तुम्ही कोर्टाकचेरीमध्ये व्यस्त राहाल. पण काळजी करण्याचे कारण नाही, कारण तुम्ही विरोधकांना नेस्तनाभूत कराल. या वर्षाच्या उत्तरार्धात तुमच्या जवळच्या नात्यांमध्ये जवळीक निर्माण होईल. वैवाहिक आयुष्य आनंदी असेल. तुम्हाला स्वर्ग केवळ दोन बोटे शिल्लक असेल. कामाच्या ठिकाणीसुद्धा सुधारणा होतील. ही जल्लोष करण्याची वेळ असेल. आर्थिक उत्पन्न आणि शिक्षण यात वाढ होईल. या कालावधीत तुम्ही सगळ्याच बाबतीत सक्रिय असाल.

## मीन



मीन राशीच्या व्यक्तींसाठी 2015 हे वर्ष उत्तम प्रकारे सुरू होईल. मीन राशी भविष्य 2015 अनुसार या वर्षात तुमच्या घरी धार्मिक शुभकार्य पार पडेल. तुमच्या घरी समारंभ साजरे करण्याचा हा काळ आहे. असे असेल तरी एखाद्या कौटुंबिक सदस्याच्या उद्धट वागणुकीचा तुम्हाला त्रास होईल. पण त्याकडे दुर्लक्ष करा, असा माझा तुम्हाला सल्ला राहील. केतूचा प्रभाव वाढता राहिल्यामुळे तुमच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे. अशा वेळी तुमच्या आहाराच्या सवयींवर लक्ष ठेवणे आवश्यक राहील. मीन राशीची कुंडली सांगते की, या काळात तुम्ही काळजीपूर्वक वाहन चालवा. प्रेम प्रकरणांसाठी हा कालावधी अनुकूल आहे. पण सातव्या घरात असलेला राहू हे फार चांगले चिन्ह नाही. त्यामुळे प्रेम आणि विश्वास हे दोन घटक नेहमीच अत्यंत महत्त्वाचे राहतील. तुम्हाला चांगली नोकरी मिळू शकेल. त्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण होईल. असे असले तरी कष्ट आणि जबाबदारी यात वाढ होईल. त्यामुळे तयार राहा. त्याचप्रमाणे या वर्षात तुम्हाला आर्थिक लाभ, पगारवाढ होण्याची शक्यता आहे. अनेक चांगल्या गोष्टी तुमच्या आयुष्यात घडणार आहे, त्यामुळे हा जल्लोष करण्याचा काळ आहे. शिक्षणासाठी हा अत्यंत अनुकूल असेल, पण 2015च्या उत्तरार्धात काही समस्या उद्भवू शकतात.